# अल्पमुदतीचे तांत्रिक अभ्यासक्रम

…टर -- मेक. ड्राफ्टस्मन -- मोटार रिवा… -- इले…
मेकॅनिक -- टेलिव्हीजन मेकॅनिक -- … अकौन्…
GOVT. / P W. D / I T. E. S. … सेशन.

म.ग्र.स. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा
दा. क्र. ७७४६

IRBK-0107146
IRBK-0107146

भेटा : प्रिन्सिपॉल,

## नवरंग इन्स्टिट्यूट

नवरंग सिनेमा समोर, अंधेरी पश्चिम, मुंबई–४०० ०५८.

टीप : इंग्रजी संभाषण व रेडियो दुरुस्ती पोष्टाने शिकविले जातात.

पुण्यात कोठे उतराल? ' **स्वागत लॉज** ' नटराज सिनेमा स…

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

9 NOV 1973

13 DEC 1973

3 JUL 19

1975

# १ : संत रामदास

## नारायण

गोदामाईच्या कांठीं एक लहानसं गांव आहे. ‘जांब’ त्याचं नांव. त्या गांवीं एक कुळकर्णी होते. त्यांचं नांव होतं सूर्याजीपंत ठोसर.

सूर्याजीपंत श्रीरामाचे भक्त होते. ते नेमानें रामरायाची आराधना करीत. त्यांचें कुलदैवत होतें सूर्यनारायण. त्याची उपासना त्यांच्या कुळांत चालत आली होती. त्यामुळें सूर्यनारायणाचीहि ते उपासना करीत.

सूर्याजीपंतांच्या बायकोचें नांव होतें रेणुकाबाई. त्याहि देवभक्त होत्या. आपल्या पतीप्रमाणें त्यांचीहि श्रीरामावर अन् सूर्यनारायणावर दृढ श्रद्धा होती.

सूर्याजीपंत अन् रेणुकाबाई दोघंहि समाधानी होती. आपलें काम उरकावें अन् उरलेला सर्व काळ देवाकारणीं लावावा, असा त्यांचा नित्यक्रम होता. तो नेहमीं आनंदी असत.

परंतु एखाद्या वेळीं मधूनच तीं अस्वस्थ होत. त्यांच्या मनांत विचार डोकावे, ‘आपल्या घरीं मूलबाळ कोणीच नाहीं, असं कां बरं व्हावं? देव आपल्यावर रागावला तर नाहीं?’

परंतु ‘देव करतो, तें सर्व आपल्या भल्यासाठींच करतो’ अशी सूर्याजीपंतांची अन् रेणुकाबाईची भावना होती. ‘आज नाहीं उद्यां देव आपल्याला सुखाचा दिवस दाखवील’ असा त्यांना पूर्ण विश्वास होता.

अन् तसंच झालें. श्रीरामप्रभूंनीं एक दिवस सूर्याजीपंतांना दर्शन दिलें. सूर्याजीपंतांनीं रामरायाला नमस्कार घातला.

"तुझी चिंता दूर होईल. तुझे मनोरथ पूर्ण होतील. तुला दोन सद्गुणी पुत्र होतील" त्यांना वर उठवून रामरायांनीं आशीर्वाद दिला.

श्रीरामप्रभु अंतर्धान पावले. सूर्याजीपंतांना अपार आनंद झाला. त्यांनीं रेणुकाबाईंना सर्व हकीकत सांगितली.

'आज रामरायानं दर्शन दिलं आपल्याला. आपण पावन झालों. आतां आपण कोणाची चाकरी करायची नाहीं. देवाच्या सेवेशिवाय अन्य कोणतंच काम अंगीकारावयाचं नाहीं.' असं ठरवून त्यांनीं लेखणी खालीं ठेवली.

थोड्याच कालावधीनंतर रेणुकाबाईंनीं एका बाळाला जन्म दिला. त्याचं नांव ठेवलें त्यांनीं 'गंगाधर'.

गंगाधरच्या जन्मानंतर सुमारें दोन वर्षांनीं रामनवमीच्या शुभ मुहूर्तावर 'नारायण' जन्मला.

पाळण्यांत 'ट्याहां ट्याहां' करणारा नारायण हळू हळू मोठा झाला. तो पांच वर्षांचा झाल्यावर सूर्याजीपंतांनीं त्याची मुंज केली मोठ्या थाटानें. अन् मग नारायण गुरुजींकडे शिकण्यासाठीं जाऊं लागला.

नारायण हुशार होता. गुरुजी शिकवीत तें तो पटपट शिके. आत्मसात करून टाकी. थोड्याच दिवसांत त्यानें किती तरी ज्ञान मिळवलें. किती तरी ग्रंथांचें अध्ययन केलें.

नारायण विद्याभ्यासांत हुशार होता तसाच खेळांतहि पण तो पुढें होता. घरांत बसणें त्याला आवडत नसे. हरतऱ्हेचे खेळ खेळत असे तो. झाडांवरून चढावें, रानावनांत भटकावें, नाहीं तर पाण्यांत पोहावें, हे त्याचे आवडते छंद होते.

नारायण घरांतून बाहेर पडला कीं, घरीं कधीं परत येईल

याची रेणुकाबाईंना काळजी लागून राही. पण नारायण परत यायच्या आधींच त्याच्या कागाळ्या घरीं येत.

बरोबरीच्या कुणा मुलाला झाडावरच अडकवून ठेव, तर कुणाला पाण्यांतच बुचकळून काढ, तर कुणाची आपल्या-बरोबर धावत त्रांगडच काढ, असले उपद्व्याप करून नारायण काळाच्या मर्यादेनें घरीं परते.

रेणुकाबाई त्याच्याकडे डोळे वटारून पाहात. त्याच्यावर रागावण्याचा प्रयत्न करीत. पण तो जवळ आला कीं, त्यांचा लटका राग दूर पळून जाई. अन् त्याला जवळ घेऊन त्या म्हणत, " किती वाट पाहायला लावतोस रे नारायणा ! "

★

## श्रीरामदर्शन

गंगाधरपंत नारायणापेक्षां वडील होते. त्यांचा अधिकारहि मोठा होता. त्यांनीं विद्याभ्यास केला होता. तप केलें होतें. अन् म्हणूनच त्यांचं वय लहान होतें तरीहि लोक त्यांना म्हणत ' श्रेष्ठ.'

एकदां श्रेष्ठांनीं एका मनुष्याला गुरुपदेश दिला. नारायण जवळच होता. त्यानें तें पाहिलें. अन् तो मनुष्य निघून जातांच श्रेष्ठांजवळ आग्रह धरला कीं, "मलाहि आपला अनुग्रह व्हावा."


" नारायणा, अजून लहान आहेस तूं. मोठा झालास म्हणजे अनुग्रह देतां येईल."

नारायण पुन्हां पुन्हां सांगूं लागला. परंतु श्रेष्ठांनीं तिकडे लक्षच दिलें नाहीं. अन् शेवटीं तर सांगितलें, " हें बघ, नारायण, मला माझं काम करूं दे ! उगाच गडबड करूं नको. "

नारायण रागावला. तेथून बाहेर पडला. उगाचच्या उगाच बोलणीं ऐकून घ्यायची संवय नव्हती त्याला.

जांब गांवीं एक मारुतीचें देऊळ होतें. तिथें एका बाजूला अगदीं अंधार होता. तेथें जाऊन बसला नारायण. त्यानें आपल्या आराध्य दैवताचं—'श्रीरामाचं अन् मारुतीचं'—ध्यान आरंभलें.

किती तरी वेळ झाला. पण नारायण कंटाळला नाहीं. त्याच्या ध्यानांत खंड पडला नांहीं. मारुतिराय प्रसन्न झाले. त्यांनीं नारायणाला दर्शन दिलें अन् विचारलें,



" नारायणा, काय इच्छा आहे तुझी ? तुला काय पाहिजे तें माग."

"हनुमंता! मला अनुग्रहप्रसाद व्हावा. दुसरं कांहीं नको मला."

मारुतिराय हसले. त्यांनीं श्रीरामप्रभूंच ध्यान केलें. श्रीरामप्रभु प्रकटले. त्यांच्या दर्शनानें नारायण आनंदला. त्यानें प्रभूंच्या चरणाला मिठी घातली.

रामप्रभूंनीं नारायणाला वर उचललें. त्याला 'गुरूपदेश' दिला. अन् ते अंतर्धान पावले. रामप्रभूंनीं अनुग्रह दिलेला नारायण म्हणजेच आपले 'समर्थ रामदासस्वामी'.

नारायण घरांतून निघून गेला. किती तरी वेळ झाला, पण तो घरीं परत आला नाहीं. श्रेष्ठांनीं सर्वत्र त्याचा शोध केला, पण कुठेंही पत्ता लागेना त्याचा.

शोधतां शोधतां श्रेष्ठ मारुतीच्या देवालयांत गेले. नारायण ध्यानस्थ बसला होता. त्याच्या तोंडावर तेज झळकत होतें. श्रेष्ठांनीं ओळखलें कीं, नारायणाला देवानं अनुग्रह दिला. त्यांना आनंद झाला. नारायणाला घेऊन ते घरीं परत आले.

## नवरा पळाला!

नारायणाला बारावं वर्ष लागलं. आतां नारायण मोठा झाला. आतां त्याचं लग्न करावं असं रेणुकाबाईनीं ठरवलं. नारायणासाठीं त्यांनीं वधू पाहण्यास सुरुवात केली. आसन-गांवच्या बोधलापूरकरांची मुलगी त्यांनीं पसंत केली.

नारायणाला लग्नाचा विचार पसंत नव्हता. पण त्याच्या आईनें मुलगी पसंत केल्याची बातमी त्याच्या मित्रांना कळली. 'आतां एका मनुष्याचं लगीन!' ते त्याला चिडवूं लागले.

नारायण चिडून त्यांना धोपटूं लागला. पण ते त्याला थोडेच दाद देणार. त्याच्या खूपच पाठीस लागले ते सगळेजण. तेव्हां

नारायण वैतागला. नदीच्या कांठीं एक वडाचं झाड होतं. त्या झाडावर तो चढून बसला तो कांहीं केल्या खालीं उतरेना.'

श्रेष्ठांना ही गोष्ट कळली. ते त्याला शोधण्यासाठीं निघाले. त्यांना येतांना नारायणानें पाहिलें. अन् वडावरून त्यानें खालीं नदींत उडी टाकली.

सर्व लोक घाबरले. श्रेष्ठ नदीजवळ आले. त्यांनीं नारायणाला हाक मारली, अन् म्हणाले, "नारायणा, वर ये ! तुला कोणी चिडवणार नाहीं."

नारायण नदींतून बाहेर आला. त्यानें पाण्यांत उडी मारली तेव्हां एक खडक त्याच्या डोक्याला लागून टेंगूळ आलं होतं. नारायणाला घेऊन श्रेष्ठ घरीं परत गेले.

एवढें सर्व झालें. पण रेणुकाबाईंची अजूनहि इच्छा होती कीं, 'नारायणाचं लग्न करावं.' त्यासाठीं कसोशीनें प्रयत्न करण्याचें ठरवलें त्यांनीं. त्यांनीं श्रेष्ठांजवळ ही गोष्ट काढली.

श्रेष्ठ नारायणाला ओळखत होते. ते म्हणाले, "आई, तूं या भानगडींत पडूं नको. नारायणाला ही गोष्ट मानवत नाहीं. तूं आग्रह धरून पश्चात्ताप मात्र पावशील !"

पण रेणुकाबाईंना त्यांचें सांगणें रुचलें नाहीं. कसें पटावें आईला तें सांगणें ?

एक दिवस रेणुकाबाईंनीं नारायणाला जवळ बोलावलें. अन् म्हणाल्या,

"नारायणा ! मीं सांगितलेलं ऐकशील तूं ? असं विचारायचं नाहीं. पण तूं कांहीं कांहीं ऐकत नाहींस माझं."

"तूं सांगितलेलं मी ऐकत नाहीं आई ? तूं सांगितलेलं नाहीं ऐकायचं, तर ऐकायचं तरी कुणाचं. पण लग्न करायला

सांगूं नको."

"चालेल. तूं लग्न करूं नको. फक्त अंतरपाट-धरीपर्यंत नीट उभा राहा. मी सांगेन तसा वाग!"

नारायणानें आईच्या म्हणण्याला मान्यता दिली.

नारायणानं कबुली दिली तशा रेणुकाबाई हुरळल्या. त्यांनीं मुलगी तर पसंत केलीच होती. आतां नारायणाचीहि संमति मिळाली. मोठ्या उत्साहानें त्यांनीं लग्नाची तयारी आरंभिली.

वधूपक्षाचे लोक आले. मांडव घालण्यांत आला. लग्नाची तयारी झाली. होमहवनादि सर्व विधि यथासांग पार पडले. जमलेल्या मंडळीला अक्षता वांटण्यांत आल्या. अन् वर-वधूंना समोरासमोर उभीं करून अंतरपाट धरण्यांत आला.

भटजींनीं मंत्राक्षता हातीं घेऊन 'शुभ मंगल साऽवधान' म्हणतांक्षणींच नारायण 'सावध' झाला. मी माझ्या वचनांतून मुक्त झालों' असें म्हणत त्यानें मंडपांतून पळ काढला.

"अरे, नवरा पळाला! नवरा पळाला!" सर्वत्र एकच ओरड उठली. सबंध लग्नमंडपभर एकच गोंधळ माजून राहिला. जाणत्या लोकांनीं नारायणाला शोधून काढण्याचा खूप प्रयत्न केला पण व्यर्थ! सर्वत्र शोध करूनहि त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. नारायणाचा पत्ता लागला नाहीं.

लोक शोध करून करून थकले. दुसरा वर पाहून लग्नकार्य उरकून घेण्यांत आलें.

★

## समर्थांचा आशीर्वाद

लग्नमंडपांतून पळालेला नारायण एका झाडावर लपून बसला होता. सर्वत्र शांत झाल्याचें त्यानें पाहिलें. मग तो

झाडावरून हळूंच खालीं उतरला. आणि नंतर गोदावरीकांठानें तो नाशिकजवळ 'टाकळी'ला आला.

येथें गोदावरी व नंदिनी या दोन नद्यांचा संगम झाला आहे. फार आवडलें हें ठिकाण नारायणाला. 'छान जागा आहे तप करायला' त्यानें मनाशीं विचार केला. अन् एक निवांत गुहा पाहून त्यानें तेथें मठी ठाकली.

रोज सकाळीं लवकर उठायचं, स्नान करायचं अन् कमेरे-इतक्या पाण्यांत जाऊन उभं राहायचं. "श्रीराम जयराम जयजयराम' असा राममंत्राचा जप करायचा. जपानंतर गुहेंत



परतायचं. उपनिषदें, वेद, गीता, भागवत, रामायण आदि ग्रंथांचा अभ्यास करायचा. असा नारायणाचा कार्यक्रम सुरू झाला.

नारायणाचं तेज वाढूं लागलं. तपानं त्याला सामर्थ्य प्राप्त झालं. नारायण 'समर्थ' झाला.

एक दिवस समर्थ रामनामाचा जप करीत नदींत उभे होते. एक ब्राह्मण स्त्री सती जात होती. तिनें समर्थांना पाहिलें. कोणी तरी साधुपुरुष आहे. त्यांना नमस्कार करावा म्हणून ती त्यांच्याजवळ आली. तिनें त्यांना नमस्कार केला.

समर्थांचें सर्व लक्ष जपांत गुंतलेलें होतें. त्यांनीं त्या बाई-कडे नीटसें पाहिलंहि नाहीं. ती आपल्या नवऱ्याबरोबर सती जात आहे हें त्यांच्या लक्षांतहि आलें नाहीं. त्यांनीं. आशीर्वाद दिला 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव!'

बाई चमकली. विषण्णपणें हंसून तीं म्हणाली,

"महाराज, आशीर्वाद दिलात! पण तो या जन्मीं खरा होणार कीं पुढील जन्मीं?"

रामदासांनीं डोळे उघडून पाहिलं, अन् सर्व प्रकार त्यांच्या लक्षांत आला. आपल्या तोंडून अनवधानानें शब्द बाहेर पडल्याचं त्यांच्या लक्षांत आलं.

'आपण रामनामाचा जप करीत असतांना प्रकटलेली वाणी असत्य होतां कामा नये' असें त्यांना वाटलें.

त्यांनीं लोकांना बाईच्या नवऱ्याचें प्रेत जवळ आणण्यास सांगितलें. अन् रामरायाचं स्मरण करून त्यांनीं प्रेताच्या तोंडांत पाणी घातलं.

'राम राम' म्हणत तें प्रेत हालचाल करूं लागलं.

"बाई, याच जन्मीं आशीर्वाद खरा झाला बरं!" समर्थ हसून म्हणाले.

बाईनें अन् तिच्या नवऱ्यानें समर्थांना नमस्कार केला. नंतर

तीं दोघें आपल्या घरीं निघून गेलीं. त्यांना झालेला पहिला मुलगा त्यांनीं समर्थचरणीं अर्पण केला. ह्याचंच नांव ' उद्धव गोसावी '. ★

## घार जिवंत झाली

आणखी कांहीं दिवस समर्थ टाकळीला राहिले. त्यांनीं आपल्या तपश्चर्येचीं बारा वर्षं पूर्ण केलीं. अन् मग त्यांनीं ठरवलें कीं, ' आपण तीर्थ-यात्रा करावी. निरनिराळीं तीर्थक्षेत्रं पाहावीं. आपला देश फिरून पाहावा. आपल्या देशाची स्थिति अवलोकन करावी. आपल्या लोकांच्या स्थितीचं जवळून निरीक्षण करावं.'

अन् असा विचार करून समर्थ तीर्थयात्रेला निघाले. त्यांनीं महादेवाचं काशीक्षेत्र पाहिलं. रामरायाची अयोध्या पाहिली. श्रीकृष्णाची द्वारका पाहिली. अन् याप्रमाणें एकामागून एक तीर्थं घेत त्यांनीं बद्रिकेदारपासून रामेश्वरापर्यंत सर्व तीर्थ-क्षेत्रांचं दर्शन घेतलं. अन् नंतर ते पैठणला आले.

पैठणला समर्थ नाथांच्या वृंदावनापुढं कीर्तन करीत. त्यांच्या रसाळ कीर्तनानें लोकांचें हृदय भक्तिभावानें भरून जाई. त्यांचें मन संतोषे.

पण समर्थांच्या कीर्तनानें कांहीं लोकांच्या पोटात दुखूं लागलें. त्यांनीं त्यांची कांहीं तरी फजिती करण्याचें ठरवलें.

एकदां समर्थ गंगातटाकीं फिरत होते. त्या वेळीं कांहीं टवाळ लोकांनीं त्यांना पाहिलं. अन् त्यांची टवाळी आरंभिली.

समर्थांचा वेषहि जरा चमत्कारिकच होता. अंगांत कफनी, पायांत खडावा अन् खांद्यावर गलोल.

ते टवाळ लोक त्यांच्याजवळ गेले. नमस्कार केला त्यांनीं. अन् साळसूदपणें समर्थांना विचारलं,

" महाराज, आपण साधु पुरुष. अन् ही गलोल कशासाठीं बाळगतां आपण ?"

" मी रघुपतीचा दास. कुठेंतरी रानावनांत भटकतों. सहज खेळण्यासाठीं बाळगली आहे ही गलोल."

" म्हणजे आपण थोडीफार नेमबाजीहि करीत असाल तर ! होय ना !"

" होय !"

" मग ती आकाशांत घार उडते आहे तिला दगड मारूं शकाल तुम्ही ?"

समर्थांनीं गलोल हातीं घेतली. अन् घारीवर नेम धरून दगड मारला. घार टपकन खालीं पडली. अन् थोड्याच वेळांत तिचा प्राण निघून गेला.

आतां तर त्या टवाळांना जोरच चढला. त्यांनीं रामदासांना गराडलं. अन् कोल्हेकुई केली.

" तुम्ही रामाचे दास म्हणवतां, अन् निरपराध प्राण्यांची हत्या करतां ? आतां तुम्हांला प्रायश्चित्त घेतलं पाहिजे."

" पण तुम्हींच सांगितलंत कीं, दगड मारा म्हणून !"

" आम्हीं ढीग सांगितलं ! पण तुम्हीं विचार करायचा कीं नाहीं जरा ? आतां घ्या प्रायश्चित्त !"

काय करतां समर्थ प्रायश्चित्त घ्यायला तयार झाले. प्रायश्चित्ताचा सर्व विधि यथासांग पार पडला. समर्थांनीं गंगेंत स्नान केलें. प्रायश्चित्त देण्यासाठीं जमलेल्या ब्राह्मणांना नमस्कार केला त्यांनीं. अन् म्हणाले,

"आतां तरी शुद्ध झालों ना मी ? कांहीं पाप नाहीं ना उरलं ?"

" नाहीं. आतां कसलं आलं आहे पाप?"

" मग ही घार कां उडत नाहीं अजून?"

" अहो, काय वेड लागलंय् कीं काय तुम्हांला? प्रायश्चित्त घेतलं म्हणून काय कुठं मेलेला प्राणी जिवंत होतो?"

समर्थ हसले. घारीजवळ जाऊन तिच्या अंगावर हात फिरवीत ते म्हणाले, " बाई, येथें निजलेली कां? ऊठ! आकाशामध्यें विहार कर."

ती घार पंख फडफडवीत उठली आणि आकाशांत उडून गेली.

" लोक ओशाळले. त्यांनीं समर्थांचे पाय धरले आणि म्हणाले,

" आम्ही आपले अपराधी आहों. आम्हांला क्षमा करा."

" माझी कसली मागतां क्षमा? श्रीरामाला शरण जा. घार उठली हें त्या रामप्रभूचचं सामर्थ्य."

★

## आईची भेट

समर्थांनीं घार उठविली. लोकांचं संशयनिरसन झालं. त्यांच्या कीर्तनांना खूप गर्दी होऊं लागली.

एक दिवस कीर्तन संपल्यावर एक ब्राह्मण समर्थांजवळ येऊन त्यांना म्हणाला,

"स्वामी, आपण जांबच्या सूर्याजीपंतांचे पुत्र नारायण ना?"

" होय!"

आपल्या मातोश्रींनीं आपला ध्यास घेतला आहे. त्यांना बरं नसतं. शिवाय त्यांचे डोळेहि गेले आहेत. आपण त्यांची भेट घ्यावी. त्यांचं समाधान करावं."


ब्राह्मणाच्या सांगण्याप्रमाणें समर्थांनीं घरीं जायचं ठरवलं.

त्यांनीं ब्राह्मणाला निरोप दिला. ब्राह्मणाला दुसऱ्या गांवीं कांहीं काम होतं. तिकडे तो निघून गेला.

समर्थ पैठणहून निघाले. ते जांबला येऊन पोहोंचले. अन् आपल्या घराच्या अंगणांत येऊन त्यांनीं गजर केला—'जय जय रघुवीर समर्थ.'

समर्थांची वहिनी भिक्षा घेऊन पुढें आली. तोंच समर्थ म्हणाले, "मी भिक्षा मागण्यासाठीं नाहीं आलों."

ओटीवर बसलेल्या रेणुकाबाईनीं नारायणाचा आवाज त्यांनीं ओळखला. त्यांनीं हांक मारली, "नारायण!"



समर्थ घरांत गेले. त्यांनीं आईच्या पायांवर डोकें ठेवलें. रेणुकाबाईच्या आनंदास पारावार राहिला नाहीं.

त्यांनीं समर्थांच्या पाठीवरून प्रेमानें हात फिरवला अन् त्या म्हणाल्या, "नारायणा, किती मोठा झालास रे तूं आतां? किती वर्षांनीं घरीं आलास? डोळे भरून तुला पाहावंसं वाटतं पण काय करूं रे! ही अशी आंधळीं झाल्यें ना मी!

समर्थांनीं आईच्या डोळ्यांवरून हात फिरवला. रेणुकाबाईंना पुन्हा दृष्टि आली. समर्थांच्या भव्य आणि तेजस्वी मूर्तीकडे कौतुकानं पाहात त्या म्हणाल्या,

"नारायणा, तूं कोणी भूत पिशाच्च वश केलं आहेस वाटतं?"

"होय आई! सर्वांत मोठं भूत आपलंसं केलं आहे मीं."

सर्व भूतांचें हृदय। नाम त्याचें रामराय॥
रामदास नित्य गाय। तेंचि भूत गे माय॥

रामदासांनीं पद म्हटलं.

★

## कल्याण

आईची भेट झाली. मग समर्थ घरीं राहिले. समर्थ नेमानें देवाचं ध्यान करीत. स्वतः रचलेल्या ओव्या, अभंग, पदें म्हणून देवाची आराधना करीत. ती आराधना ऐकतांना रेणुकाबाईचं हृदय भरून येई. दिवस कसा जाई हें त्यांना समजत देखील नसे.

एक दिवस समर्थ आईला म्हणाले, "आई, पुष्कळ दिवस घरीं राहिलों. आतां कृष्णातीरीं जातों. अनुज्ञा दे."

रेणुकाबाईच्या डोळ्यांत पाणी उभं राहिलं. "नारायण, पुन्हा जाणार?—" त्यांचा कंठ भरून आला.

"नारायणा, आत्तां तर आलास! अन् लगेच परत चाललास?" त्या म्हणाल्या.

मोठ्या कष्टानें समर्थांनीं आईची समजूत घातली. मग आईचा आणि श्रेष्ठांचा आशीर्वाद घेऊन ते पुन्हा घरांतून बाहेर पडले.

रामदास घरांतून निघाले. तिथून टाकळीला गेले. उद्धवाला बरोबर घेऊन ते कृष्णातीरीं आले. तो सर्व प्रदेश त्यांनीं पायांखालीं घातला. याच वेळीं त्यांनीं तुकाराममहाराज, रंगनाथस्वामी, केशवस्वामी इत्यादि समकालीन साधूंच्या भेटी घेतल्या. अन् मग ते कांहीं दिवस 'मसूर' येथें राहिले.

समर्थांनीं मसूरला 'मारुती'ची स्थापना केली. अन् रामनवमीचा उत्सव मोठ्या थाटानें साजरा करण्याचं ठरलं.

रामनवमीच्या दिवशीं रथांत उत्सवमूर्ति ठेवून रथ निघाला. वाटेंत आंब्याच्या झाडाची एक फांदी रथाला अडूं लागली.

रामदासांनीं आपल्या अंबाजी नांवाच्या शिष्याला सांगितलं, "अंबाजी, फांदी तोड."

अंबाजी झाडावर चढून ती फांदी तोडूं लागला.

"अरे! तूं पुढें बस. अन् मागची फांदी तोड!"

फांदीखालीं एक खोल विहीर होती.

समर्थांच्या आज्ञेप्रमाणें अंबाजीनें उलटें बसून फांदी तोडली. अन् फांदीबरोबरच तोहि खालीं विहिरींत पडला.

बराच वेळ झाला. अंबाजीची हालचाल दिसेना. लोक रामदासांकडे पाहूं लागले. रामदास उठले. विहिरीजवळ जाऊन त्यांनीं विचारलं, "अंबाजी, कल्याण आहेस ना?"

विहिरींतून उत्तर आलं "कल्याण आहे". आणि त्या दिवसापासून अंबाजीचं नांव पडलं 'कल्याण'.

★

## डोहांतील मूर्ती

मसूरला हनुमंताची स्थापना केल्यानंतर रामदास चाफळला आले. हें स्थान त्यांना फार आवडलें. आपल्या रामरायाच्या मूर्तीची येथें स्थापना करावी असें त्यांना वाटूं लागलें. त्यांना तोच ध्यास लागून राहिला.

कृष्णेच्या पश्चिम तीरावर 'शिवनाथ' म्हणून एक प्रसिद्ध क्षेत्र आहे. समर्थ तेथें गेले. कृष्णामाईत स्नान करून ते ध्यानाला बसले. त्या वेळीं त्यांना दृष्टांत झाला कीं, अंगापूरच्या रानांतील डोहांत एक श्रीरामाची अन् एक देवीची अशा दोन सुंदर मूर्ती आहेत.

समर्थांनीं डोहांतील मूर्ती बाहेर काढल्या. कोदंडधारी रामाची नयनमनोहर मूर्ती पाहून आपल्या डोळ्यांचें पारणें फिटल्या-सारखें वाटलें त्यांना. त्यांनीं मूर्ती चाफळास नेण्याचें ठरवलें.

अंगापूरच्या लोकांना कळलं कीं, समर्थ मूर्ती नेतात म्हणून. एवढे दिवस त्यांचं लक्ष नव्हतं त्या मूर्तींकडे. पण आतां मात्र त्या मूर्ति त्यांना अगदीं हव्याशा वाटूं लागल्या.

ते समर्थांकडे आले. अन् त्यांनीं मागणी केली कीं, 'ह्या मूर्ती आमच्या आहेत. आम्हांला हव्यात त्या.'

"वरं आहे! तुम्ही तुमच्या मूर्ती घेऊन जा!" समर्थांनीं मूर्ति खालीं ठेवल्या. लोकांच्या पुढाऱ्यानें सांगितलं, 'मूर्ति उचला.' कांहीं तरुण पुढें सरसावले. आपली सर्व शक्ति त्यांनीं

खर्च केली. पण त्यांना मूर्ति हलेनात. त्यांनीं खूप प्रयत्न केला. पण छे ! त्यांनीं हात टेकले.

शेवटीं ते समर्थांकडे गेले. त्यांनीं समर्थांना विनंति केली, 'आम्ही चुकलों, आपण मूर्ती न्या.'

समर्थांनीं मूर्ती चाफळला आणल्या. नदीच्या दक्षिण तीरावर दाट झाडीची जागा होती. ती त्यांना मिळाली. आपल्या शिष्यांकडून त्यांनीं ती जागा साफ करून घेतली.

त्या जागीं समर्थांनीं छानदार मंदिर बांधलें. रामनवमीच्या मुहूर्तावर त्यांनीं श्रीरामाची मोठ्या थाटानें स्थापना केली.

★

## शिव-छत्रपतींची भेट

चाफळच्या उत्सवासाठीं खूपच लोक आले होते. 'गिरि-गोसावी' नांवाचे एक साधुपुरुष समर्थांच्या भेटीसाठीं चालले होते. वाटेंत त्यांनीं आपल्या उपाध्यायांच्या घरीं मुक्काम केला.

उपाध्यायांना गोसावींच्या दर्शनानें आनंद झाला. त्यांनीं त्यांचें स्वागत केलें. त्यांना कीर्तन करण्याची विनंति केली.

उपाध्यायांच्या म्हणण्याला मान देऊन गिरि-गोसावींनीं कीर्तन केलें. कीर्तनाला छत्रपति शिवराय आले होते. गोसावींचें कीर्तन ऐकून ते प्रसन्न झाले. त्यांनीं त्यांना तीनशें होन दिले.

गिरि-गोसावी म्हणाले, "राजा, आम्ही गोसावी. आम्हांला काय उपयोग या होनांचा? चाफळ गांवीं समर्थ श्रींचें देवालय बांधीत आहेत. तिकडे पोचतं कर हें द्रव्य तूं."

शिव-छत्रपतींनीं होन चाफळला पाठवले. त्यांनीं समर्थांची कीर्ति ऐकलीच होती. आतां तर त्यांच्या मनाला समर्थ-दर्शनाची ओढ लागून राहिली.

" समर्थ कुठें आहेत तें पहा. अन् मला कळवा." महाराजांनीं नोकरांना आज्ञा केली.

नोकरांनीं खूप तपास केला, पण समर्थ एका ठिकाणीं सहसा कधींच राहात नसत, आज या डोंगरांत तर उद्यां दुसऱ्याच डोंगरांत. बरें, डोंगरांत काय चांगल्या जागेवर ते थोडेच राहायचे? कुठल्या तरी अवघड जागीं, आपल्याला कोणी त्रास देणार नाहीं अशा ठिकाणीं असत ते. महाराजांना देता येण्यासारखा पत्ता नोकरांना मिळेना.

सरतेशेवटीं महाराजांनीं स्वतःच समर्थांच्या शोधासाठीं बाहेर पडायचं ठरवलं. अन् त्याच वेळीं समर्थांचा एक शिष्य समर्थांकडून पत्र घेऊन राजांकडे आला.

राजांना फार वाईट वाटलं. अशा सत्पुरुषाची आपण एवढे दिवस दखल देखील घेऊं नये? त्यांनीं पत्र लिहिलं :

" स्वामी, आशीर्वादपत्र पाठवलं तें पाहून परम आनंदातें पावलों. दर्शनाची इच्छा धरून येणं आहे, त्यास कृपादर्शन दिलें पाहिजे, ही विज्ञप्ति, "

पत्र पाठवून शिवराय समर्थदर्शनासाठीं निघाले. चाफळला जाऊन त्यांनीं श्रीरामदर्शन घेतलं. समर्थ शिंगणवाडीस दासबोध लिहीत असल्याचं त्यांना कळलं तेव्हां ते शिंगणवाडीस गेले.

समर्थ औदुंबराखालीं बसून दासबोध लिहीत होते. महाराजांनीं समर्थांना साष्टांग नमस्कार घातला. समर्थांनीं राजांना वर उठवलं.

गुरु-शिष्यांची भेट झाली. समर्थांनीं महाराजांना बोध केला. त्यांना ' लघुबोध ' सांगितला. समर्थांचा आशीर्वाद घेऊन महाराज रायगडीं परतले.

## काम करावं लागतं

समर्थांचा शिष्यगण वाढूं लागला. समर्थशिष्यांना कांहीं फारसं काम करावं लागत नाहीं असं एका शेतकऱ्यानं पाहिलं आणि विचार केला, ' वा ! छान आहे. आपण समर्थांचं शिष्य व्हावं. म्हणजे नुसती मजा. काम नको करायला.'

तो समर्थांकडे आला. समर्थांनीं त्याचा हेतु ओळखला त्याला अनुग्रह केला. अन् घेतलं आपल्या बरोबर. समर्थांबरोबर हिंडतां हिंडतां त्या बिचाऱ्याला नको जीव होऊन गेला.

त्याच वेळीं रंगनाथ स्वामी समर्थांच्या भेटीला येत होते. ते त्याला दिसले. श्रीमंती रुबाबात राहात असत ते. शेतकऱ्यानें रंगनाथस्वामींना विनवणी केली, " मला तुमचा शिष्य करा."

" दुसऱ्या कुणाचा अनुग्रह घेतला आहेस का तूं ? "

" हो ! मीं रामदासस्वामींचा अनुग्रह घेतलाय्. "

" मग तूं तो अनुग्रह परत देऊन ये. नंतर पाहूं आपण काय करायचं तें. "

तो शेतकरी रामदासांकडे आला. अन् म्हणाला, " तुमचा अनुग्रह परत द्या. "

" बरं आहे ! पाण्यानं चूळ भरून तूं त्या दगडावर टाक ती. म्हणजे आमचा अनुग्रह आम्हांला मिळाला. "

शेतकऱ्यानें त्याप्रमाणें केलें. अन् काय ? त्याची वाचाच स्न ।. आतां काय करावं ? त्याला सुचेना.

रंगनाथस्वामींनीं त्याच्याकरितां समर्थांकडे रदबदली केली. का ठा पुन्हा वाणी मिळाली. नंतर रंगनाथस्वामी म्हणाले,

" बाबा रे! समर्थांचा शिष्य व्हायचं म्हणजे कांहीं गंमत नव्हे. कुठंहि फुकट खायला मिळत नाहीं. काम करावं लागतं त्यासाठीं तूं शेतावर जा. नीट काम कर. काम करावं अन् पोटभर खावं. देव तुझं कल्याण करील."

★

## समर्थांचा न्याय

एकदां समर्थ शिष्यांबरोबर चालले होते. चालतां चालतां सर्वजण दमले. 'कांहीं तरी खायला मिळेल तर बरं' असें वाटूं लागलें त्यांना.

वाटेंत त्यांना जोंधळ्याचं शेत लागलं. शिष्यांनीं स्वामींची आज्ञा घेतली. शेतांतील कणसं तोडलीं. अन् तेथेंच विहिरीच्या कांठीं बसून ते 'हुरडा भाजून खाऊं लागले.

शेताचा मालक—देगांवचा पाटील—राखण करीत होता. तो तेथें आला. त्यानें पाहिलें कीं, एक गोसवडा मधोमध बसला आहे. बाजूला त्याचे शिष्य आहेत. आणि सगळे चोर आपल्या शेतांतलीं कणसं तोडून भाजून खात आहेत.

तो चिडला. त्यानें ठरवलं कीं, हा गोसवडा यांचा पुढारी आहे. ह्याला आणि त्याच्या सर्व टोळक्याला चांगलीच शिक्षा केली पाहिजे.

ह्याप्रमाणें विचार करून तो त्या समुदायांत घुसला. अन् हातांतील काठीनें चांगले रट्टे ओढले त्यानें समर्थांच्या पाठीवर.

शिष्य चिडले. त्याला मारूं लागले. पण समर्थांनीं शि[illegible]केला. आवरलें. अन् सर्वांना घेऊन ते तेथून निघून गेले.

शिवरायांना ही गोष्ट कळली. 'स्वामींना मारलं' हें [illegible] घेऊन त फार रागावले. त्यांनीं शेताच्या मालकाला पकडून आ[illegible]

त्याची चौकशी केली. त्याला राजे शिक्षा देणार इतक्यांत रामदासस्वामी तेथें आले.

ते म्हणाले, "राजा, थांब! मी सांगतों काय शिक्षा द्यायची तें!"

"स्वामी, आज्ञा व्हावी!"

शिवराय देखील गोसवड्याला नमस्कार करतात हें पाहून पाटील घाबरला.

"शिवबा, आम्हीं गुन्हा केला. अन् शिक्षा या पाटलाला! छान न्याय आहे! ती शेतजमीन त्याला इनाम दे. आम्ही एवढे लोक असतां त्यानें मला मारलं—आपला न्याय्य अधिकार बजावला. धैर्य दाखवलं त्यानं. त्याच्या धैर्याचं कौतुक व्हायला हवं." स्वामी पाटलाकडे पाहात म्हणाले.

★

## पंढरीची यात्रा

समर्थांच्या ओळखीचा एक ब्राह्मण होता. तो दर वर्षी आषाढी-कार्तिकीची वारी करी. जातांना समर्थांना म्हणे, "स्वामी, तुम्ही या ना पंढरीला पंढरीरायाचं दर्शन घ्यायला."

स्वामी कांहीं तरी निमित्त सांगत अन् तें टाळीत. पण यंदा तो अगदीं खनपटीलाच बसला. रामदासांना बरोबर घेतल्या-शिवाय तो हलेनाच मुळीं.

त्याच्याबरोबर समर्थ पंढरीला गेले. त्यांनीं चंद्रभागेंत स्नान केलें. अन् विठूरायाचें दर्शन घेतलें देवळांत येऊन.

रामदास राममय झाले होते. रामाशिवाय त्यांना दुसरं कांहींच दिसत नव्हत. विठ्ठलासमोर उभं राहून त्यांनीं

'जय जय रघुवीर समर्थ 'चा घोष केला.

देवाचे पुजारी बाजूला होते. आपल्या विठ्ठलासमोर रामाचा जयघोष ऐकून ते चिडले. त्यांनीं रामदासांभोवतीं जणूं कडेच कलं. अन् म्हणाले,

"काय रे दिसत नाहीं तुला ही विठ्ठलाची मूर्ति?"

"होय दिसते आहे! पण सर्व रूप एकच परमेश्वर नटला आहे ना श्रीराम!"

"आम्हाला ब्रह्मज्ञान शिकवतो आहे. म्हणे श्रीराम जयराम जय जय राम. इथें विठ्ठलाचा—पंढरीरायाचा जयघोष करायचा."

रामदासांनीं त्यांना उत्तर दिलं नाहीं. त्यांच्या वटारलेल्या डोळ्यांना भीक न घालतां ते प्रार्थना करूं लागले,

"येथें उभा कां श्रीरामा। मनमोहन मेघश्यामा॥
कुठें गेली सीतामाई। येथें राही रखुमाई॥

"हे श्रीरामा, असा कटेवर हात घेऊन कां बरं येथें उभा राहिलास? ती सीतामाई कुठें आहे? तें वानरदळ कुठें आहे! ती अयोध्यापुरी कुठें आहे? कुठें कुठें आहे तें सर्व?"

रामदासांची प्रार्थना संपली. अन् देवळाचा देखावा बदलला. अयोध्येच्या दरबारांतील नयनाभिराम श्रीराम-सीता येथें प्रकटलीं,

रामदासांनीं श्रीरामप्रभूच्या चरणीं डोई ठेवली. अन् बिचारे पुजारी! ते रामदासस्वामींना शरण गेले.

## दगडांतली बेडकी

समर्थ पंढरपूरला असतांना जांबहून आलेली कांहीं मंडळी त्यांना भेटली. त्यांच्याबरोबर रामदासांनीं आईला पत्र दिलें आणि आपण परत आले.

स्वामी परत आल्याचें शिवबांना कळलें. ते स्वामींच्या दर्शनासाठीं आले. त्या वेळीं स्वामी गुहेंत बसले होते.

शिवरायांनीं समर्थांना विनंति केली, ‘ स्वामी, आपण असे गुहेंत घळींत राहतां, आपलं दर्शन घडत नाहीं. तरी आपण परळीच्या किल्ल्यावर राहावं. ’

शिवबा नेहमींच अशी विनंति करीत. पण रामदास मात्र मान्यता देत नसत. लोकसंग्रह करावा, पण लोकांपासून दूर असावें. कुठें तरी एकांतीं राहावें. अशी त्यांची वृत्ति होती. ह्या वेळीं त्यानीं शिवबाच्या म्हणण्याला मान्यता दिली.

महाराजांबरोबर स्वामी परळीच्या किल्ल्यावर गेले. तेथें त्यांनीं मारुतीची स्थापना केली. देवीची स्थापना केली. किल्ल्याचें नांव ठेवलें सज्जनगड. अन् मग सज्जनगडावर सज्जनांचा मेळावा भरूं लागला.

स्वामींना सज्जनगड देऊन शिवराय परत आपलीं राज्यकारभाराचीं कामं पाहूं लागले.


एकदां एका किल्ल्याचें कांहीं काम चाललें होतें. महाराज तिथें गेले. त्यांनी सर्व कामगारांना काम करतांना पाहिलें. अन् त्यांच्या मनांत विचार आला, ‘ एवढ्या सर्व लोकांना मी काम देतों. मी त्यांना पोसतों. त्यांनीं अभिमानानं सगळीकडे

दृष्टि फेकली. अन त्याच वेळीं 'जय जय रघुवीर समर्थ' असा घोष त्यांच्या कानीं आला.

महाराजांनीं स्वामींना वंदन केलें. स्वामी हसले, अन राजांना म्हणाले, "शिवबा, किल्ल्याचं काम चाललेलं ऐकलं. म्हटलं, स्वतः पाहावं. राजा, एवढे मजूर खपत आहेत येथें. एवढ्या जीवांचं आपण पालनपोषण करतां. कौतुकाची गोष्ट आहे."

"स्वामी आपली कृपा. आपल्याच कृपेनें सर्व गोष्टी होतात." राजे म्हणाले.

अन् याप्रमाणें बोलत बोलत ते चालले. वाटेंत एक दगड



होता. तो दगड रामदासांनीं पाहिला. ते थांबले. अन् जवळ असलेल्या पाथरवटाला म्हणाले,

"शिवबा, या बेडकीचंहि पालन तूंच का केलस. आपण काय करणार? कर्ता करविता सर्व कांहीं श्रीराम आहे."

"अरे, हा दगड भोंवतालून फोड. आणि अखेर नारळा-एवढा दगड राहिला कीं, त्याचीं मधोमध दोन शकलं कर."

पाथरवटानें युक्तीनें तो दगड फोडला. दगडांतून एक बेडकी डरांव डरांव करीत बाहेर आली. त्या दगडामध्यें साधारण अर्धा तांब्या पाणी होतं. तें तिचं जीवन होतं.

बेडकी बाहेर आली. समर्थांनीं शिवरायाकडे सार्थ नजरेनं पाहिलं. जणूं ते म्हणत होते,

आम्ही काय कुणाचें खातों । तो राम आम्हांला देतो ॥

शिवरायांनीं तें जाणलं. त्यांची मान खालीं गेली. त्यांचा अहंकार निमाला.

★

## विषारी करट

एकदां मध्यरात्रीं समर्थ विवळूं लागले. त्यांचं कण्हणें ऐकून शिष्य जागे झाले. 'काय झालं स्वामींना?' म्हणून त्यांनीं चौकशी करण्यास सुरूवात केली.

समर्थ पहिल्यांदा उत्तरच देत ना. 'आई ग ! आई ग !' शिवाय दुसरा शब्द बोलायला ते राजी नव्हते.

सरतेशेवटीं त्यांनीं पायावरचें पांघरूण काढलें. पायाच्या पोटरीवर खूपशीं फडकीं गुंडाळलीं होतीं. तिकडे बोट दाखवून स्वामी म्हणाले,

"हें बघितलंत केवढें मोठं विषारी करट (गळूं) झालंय् तें? आई ग ऽ! जा तुम्ही आतां. मला स्वस्थ पडूं दे.

" महाराज, तुम्हांला फार वेदना होत आहेत. हें करट कशानें बरं होईल, आम्हाला सांगा."

कोणीं कांहीं औषधं सुचविलीं. पण समर्थ पायाला हात लावून देत ना! वैद्याला बोलवावं तर त्याच्याकडून कोणताच उपचार करून घेण्याची त्यांची इच्छा नव्हती.

सर्वजण चिंतेंत पडले. काय करावं आतां?

तोंच समर्थ म्हणाले,

"हें विषारी करट आहे.कशाकशानंहि बरं होणार नाहीं हें."

"काय? याच्यावर कांहींच इलाज नाहीं?"

" एकच उपाय आहे. माझ्यासाठीं दुसऱ्यानें आपला जीव धोक्यांत घालायला हवा. तो उपाय म्हणजे हें करट कुणीं चोखून घेतलं तरच वांचेन मी. पण त्याचं मात्र मरण ओढवेल."

सर्व शिष्य मंडळी चपापली. कांहीं तरी सांगून प्रत्येकानें पाय काढण्यास सुरुवात केली. हो! सुखासुखीं जीव घालवायला कोण तयार होणार? हळू हळू मंडळी कमी होऊं लागली. समर्थ कण्हत तळमळत पडले.

कल्याण बाहेर गेला होता. तो आला. त्याला कळलें कीं, स्वामींच्या पायाला करट झालं आहे. तें चोखून घेतलें तरच स्वामी वांचतील.

कल्याण, धावतच स्वामींजवळ आला. त्यानें समर्थांचा पाय हातीं घेतला. करट चोखण्यासाठीं तो सिद्ध झाला.

"कल्याणा नको रे! नको असं धाडस करूं." समर्थ म्हणाले.

पण कल्याणानें तिकडें लक्ष दिलें नाहीं. त्यानें करट चोखण्याची सिद्धता केली.

"कल्याणा, जरा हळूं बरं का! पाय दुखवूं नको!" समर्थ कळवळून म्हणाले.

अन् त्यांनीं सर्व पट्ट्या उतरवल्या. फक्त शेवटची एक पट्टी तेवढी शिल्लक ठेवली. सर्वजण जमले होते तिथं तें दृश्य पाहायला.

कल्याणानें पाय हातीं घेऊन करट चोखण्यास आरंभ केला. अन् दुसऱ्याच क्षणीं त्याच्या मुखावर हसूं उमललं. तो म्हणाला, "महाराज, दुसऱ्या पायावर पण करट आहे का?"

सर्वशिष्य चमकले. ते कल्याणाकडे पाहूं लागले.

तोंच समर्थहि उठून बसले. त्यांनीं आपल्या पायावरची शेवटचीहि पट्टी सोडून पायावर बांधलेला कलमी आंबा बाहेर काढून कल्याणाच्या हातीं दिला.

★

## विटाळ झाला!

समर्थांची कीर्ति दूरवर पसरली. मध्वाचार्य नांवाचे एक आचार्य होते. त्यांच्याहि कानीं ही कीर्ति गेली. त्यांनीं आपल्या शिष्याला बोलावून सांगितलें,

"तूं महाराष्ट्रांत जा. अन् समर्थ रामदासस्वामींची माहिती काढून आण."

शिष्य निघाला. त्याचें सोवळें फार कडक होतें. दुसऱ्या कुणीं शिवलेलें अन्न देखील त्याला चालत नसे.

जातांना वाटेंत त्याला भूक लागली. त्यानें सर्व स्वयंपाक शिजवला. अन् तो जेवायला बसणार, इतक्यांत एक कुत्रं तिथें आलं. अन पानांत तोंड घालून तें पळून गेलें.

आली पंचाईत! आतां काय पुन्हा स्वयंपाक करायचा?

शिष्यानें आजूबाजूला पाहिलें. तिथें कोणीच नव्हतें. त्यानें विचार केला, 'इथं आपल्या अन्नाला कुत्रं शिवलेलं कोणीं पाह्यलं नाहीं. कां उगाच दगदग करा पुन्हा जेवण करायची?' तो जेवायला बसला.

नंतर मजल दरमजल करीत तो समर्थांजवळ येऊन पोहोंचला. समर्थांनीं त्याचें स्वागत केलें. त्याची चौकशी केली अन् जेवायला राहण्याची विनंति केली.

समर्थांची विनंति त्यानें मान्य केली. अन् तो म्हणाला, "आम्हांला शिधा द्या. दुसऱ्यानें शिजवलेलं अन्न आम्हांला नाहीं चालत."

समर्थांजवळून शिधा घेऊन त्यानें स्वयंपाक तयार केला. अन् तो जेवायला बसला. समर्थ कांहीं कारणासाठीं तिथें आले होते. त्याच्या स्वयंपाकाला त्यांचा स्पर्श झाला.

'विटाळ झाला! विटाळ झाला! आतां मी जेवणार नाहीं!' तो शिष्य ओरडून कांगावा करूं लागला. समर्थांनीं त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण तो ऐकेना.

तेव्हां समर्थ पटकन् खालीं बसले अन रडूं लागले. कुणी तरी विचारलें, "स्वामी, कां रडतां तुम्ही?"

"कुत्र्याहूनहि मी अपवित्र झालों हो." समर्थ म्हणाले.

शिष्य उमजला. त्यानें स्वामींचे पाय धरले. अन् म्हणाला, "स्वामी, मी अज्ञानी आहें. मला क्षमा करा. आमच्या गुरुजींना हें सांगूं नका."

★

## राज्यदान

एकदां शिवाजीमहाराज कांहीं कामाकरितां साताऱ्याला गेले होते. स्वामीहि साताऱ्याजवळच माहुलीला होते. दुपारच्या वेळीं स्वामी भिक्षेसाठीं बाहेर पडले. फिरतां फिरतां ते राजांच्या वाड्याजवळ आले.

"जय जय रघुवीर समर्थ" त्यांनीं रघुवीराचा गजर केला, अन् भिक्षा मागितली.

महाराजांनीं सर्व राज्य दान केल्याचा कागद तयार केला. अन् तो समर्थांच्या झोळींत टाकला!

समर्थांनीं कागद पाहिला. अन म्हणाले, "शिवबा, या कागदाचा आम्हांला काय उपयोग?"

"सर्व राज्य स्वामींना दान केलं आहे!"

"राजा, आम्हांला राज्य दान देऊन तूं काय करणार?"

"स्वामींनीं अनुज्ञा दिल्यास स्वामींची सेवा करीन!"

"राजा, वेडपणा सोडून दे. अरे, ज्यानें त्यानें आपला धर्म पाळावा. शिवबा, तूं आपलं कर्तव्य कर. राज्यकारभार बघ."

शिवराय ऐकेनात. मग स्वामींनीं उपदेश केला. अन् स्वामित्वाची खूण म्हणून मराठी राज्याचा ध्वज 'भगवा' असावा ह्या शिवबाच्या विनंतीला मान्यता दिली. स्वामींचा आशीर्वाद घेऊन राजे परतले.

थोड्याच कालांत शिवरायांना राज्याभिषेक झाला. त्यांनी समर्थांची पूजा केली. त्यांचा आशीर्वाद घेतला.

समर्थांचें आनंदवनभुवनाचें भव्य स्वप्न साकार झालें.

शके १६०२ चैत्र शुद्ध पौर्णिमेला शिवरायांनीं आपला

अवतार संपवला. समर्थांना ही बातमी कळली. त्यांना फार वाईट वाटलें.

शिवछत्रपतींच्या मागून शंभू राजे गादीवर आले. समर्थांनीं त्यांना पत्र पाठवून उपदेश केला. शिवरायांच्या वागणुकीची त्यांना आठवण करून दिली. शंभूराजांनीं समर्थांचा आशीर्वाद शिरीं धारण केला. अन् समर्थशिष्याला निरोप दिला.

शके १६०३ च्या पौष महिन्यांत रामदासस्वामींची प्रकृति विघडली. हळू हळू त्यांची प्रकृति क्षीण होऊं लागली.

त्याच वेळीं तंजावरचे व्यंकोजी राजे यांजकडून श्रीरामाच्या मूर्ती येऊन पोहोंचल्या. स्वामींना आनंद झाला. त्यांनीं रामप्रभूच्या मूर्तींची स्थापना केली.

समर्थांना रामरायाची हाक ऐकूं येऊं लागली. दासबोध लिहून झाला होता. आनंदवनभुवनाची स्थापना झाली होती. श्रीमारुतीची अन श्रीरामाची ठिकठिकाणीं स्थापना झाली होती. आखाडे अन् मठ स्थापन झाले होते. महाराष्ट्रांत शक्ति अन् चैतन्य प्रकटत होतें. समर्थांना आपलें अवतारकार्य संपल्याचें समजलें. त्यांनीं अन्न टाकलें. अन् देवाच्या बोलावण्याची ते वाट पाहात राहिले.

माघ शुद्ध नवमी उजाडली. रामरायाचा दास रामरूपीं विलीन झाला.

★

## देवानें नैवेद्य खाल्ला

कृष्णामाईच्या तटाकीं नरसिंगपुर नांवाचं एक लहानसं गांव. तेथें राहात असत दामाजी शिंपी अन् त्यांची बायको गोणाई.

दामाजी विठूरायाचे भक्त होते. गांवांत विठोबाचं देऊळ होतं. ते रोज नेमानें देवळांत जात. देवाला नमस्कार करीत. त्याला नैवेद्य दाखवीत. अन् मगच आपण घरीं येऊन जेवत. कधधीं कधधीं आपला नेम चुकूं दिला नाहीं त्यांनीं.

दामाजी पंढरीची वारी करीत. आषाढी-कार्तिकीला ते पंढरीला जात. चंद्रभागेंत स्नान करीत. विठ्ठलाचं दर्शन घेत.

विटेवरील सांवळा हरी पाहून त्यांचं हृदय भरून येई. त्यांच्या डोळ्यांतून घळघळां आसवं वाहूं लागत. ते देवाच्या पायीं डोकं ठेवीत. अन् मग त्यांच्या जिवाला समाधान वाटे.

दामाजी वर उठत. ते घरीं जायला निघत. पण तेवढ्यांत त्यांना कसली तरी आठवण येई. ते पुन्हा देवापुढें हात जोडून उभे राहात. प्रार्थना करीत, "देवा, तुझ्या दयेनें माझा प्रपंच चांगला चालला आहे. पण हे दीनदयाळा, घरीं ना मूल ना बाळ. कसं ओकं ओकं वाटतं घर. विठ्ठला, कर ना रे तेवढी कृपा!" नंतर ते परत फिरत. घरीं येत.

विठूरायानं आपल्या भक्ताचं गाऱ्हाणं ऐकलं. विठाई माउली

प्रसन्न झाली. कार्तिकी एकादशीला ( कार्तिक शुद्ध ११ शके ११९२ ) गोणाईनं सुंदर बाळाला जन्म दिला.

दामाजीशेटना आनंद झाला. मोठ्या थाटानं त्यांनीं बाळाचं बारसं साजरं केलं. अन् मुलाचं नांव ठेवलं ‘ नामदेव ’.

पाळण्यांत खेळणारा नामदेव....आतां नामदेव सहा-सात वर्षांचा झाला. कधीं कधीं तो वडिलांबरोबर देवळांत जाऊं लागला. देवापुढें हात जोडून डोळे मिटून उभा राहूं लागला.

एक दिवस दामाजीशेट बाहेरगांवीं गेले होते. गोणाईनं नैवेद्याचं ताट तयार केलं. नामदेवाला हाक मारली.

“ नामदेव, माझ्या राजा ! आज देवाला नैवेद्य घेऊन जाणार ना ?”

“हो !” नामदेवानं मान डोलावली. आईनं त्याला पीतांबर नेसवला. कोणाची दृष्ट लागेल म्हणून त्याला गालबोट लावलं अन् नैवेद्याचं ताट त्याच्या हातीं दिलं. नामदेव देवळाकडे निघाला. नामदेवाला आनंद झाला. ‘ रोज बाबा नैवेद्य दाखवतात. आज आपण नैवेद्य दाखवूं देवाला. वा ! खूपच मजा.’

नामदेव देवळांत आला. त्यानें देवापुढें नैवेद्य ठेवला. डोळे मिटले. देवाची प्रार्थना केली. अन् हात जोडून तो उभा राहिला.

कांहीं वेळानें नामदेवानें डोळे उघडले. अन् बघतो तों काय ? नैवेद्य आपला जसाच्या तसाच आहे ! नामदेवाला वाटलं, देव आपल्यावर रागावला. त्यानें पुन्हा देवाला हात जोडले. अन् म्हणाला, “ बाबा आले नाहींत, मीं नैवेद्य आणला म्हणून रागावलास ?

“ देवा, रोज बाबा नैवेद्य आणतात तेव्हां नैवेद्य खातोस.

अन् आज असं रे काय करतोस? देवा, तूं नैवेद्य खाल्ला नाहींस तर मी मुळीं येथून हलणारच नाहीं."

नामदेवानें देवाला आळी घातली. ती लहानगी मूर्ति हात जोडून तेथें उभी राहिली. केविलवाण्या नजरेनें कलती मान करून देवाकडे पाहूं लागली.

हळू हळू पाय दुखूं लागले. कंटाळा आला. पण नामदेवानें मान हलवली? छट्! देवानं नैवेद्य खाल्ला नाहीं तर आपण हलायचें नाहीं.

दीनांचा दयाळू कळवळला. श्यामसुंदर मूर्तींतून प्रकट झाला. त्यानें नैवेद्य भक्षिला. देवदर्शनानें नामदेव आनंदला. मोठ्या भक्तीनें त्यानें देवाला नमस्कार केला. अन् नैवेद्याचं ताट घेऊन तो घरीं परत निघाला.

★

## मी नाहीं खोटं बोलत

नामदेवाला घरीं यायला उशीर झाला. गोणाईला काळजी वाटूं लागली. दरवाजांत नामदेवाची वाट पाहात ती उभी राहिली. नामदेव दृष्टीला पडतांच तिला आनंदाचें भरतें आलें. तिनें त्याला पटकन् उचलून घेतलं. पण लटक्या रागानं ती म्हणाली.

"नामदेवा, किती उशीर केलास हा! दम धर, चांगला मार देत्यें तुला."

"आई मी तरी काय करूं? देव किती वेळ नैवेद्य खाईनाच. मग मी हट्ट धरून बसलों, तेव्हां कुठं नैवेद्य खाल्ला देवानं." आईच्यापुढें थाळी करीत नामदेवानें सांगितलें.

" चल, लबाड कुठला! उगाच खोटं बोलूं नको! देव काय कुठें नैवेद्य खातो?"

"कां देव लहान मुलांचा नैवेद्य खात नाहीं? पण आई! खरंच, देवानंच नैवेद्य खाल्ला. मी कधीं तरी खोटं बोलतों का?"

गोणाईला प्रश्न पडला. काय झालें असावें? ती कांहीं बोलली नाहीं. उशीर झाला होता. तिनें जेवणें उरकलीं. संध्याकाळीं दामाजीशेट परत आले. गोणाईनें सर्व हकीकत त्यांना सांगितली.

"छे! अग देव का कुठें नैवेद्य खातो? पुजाऱ्यानें घेतला असेल नैवेद्य ठेवून. अन् या वेड्याला कळलं नसेल तें. असं बघ, उद्यां आपण त्याची गंमत करूं."

दुसऱ्या दिवशीं गोणाईनें नैवेद्याचें ताट तयार केलें. नामदेवाच्या हातीं दिलं अन् म्हणाली,

"नामदेवा, तुझा नैवेद्य देव खातो ना? आजहि तूंच घेऊन जा हें नैवेद्याचं ताट. ते तुझ्याबरोबर येतील."

आपला लहानसा कद नेसून नामदेव सजला. देवळांत गेला. दामाजीशेट बाहेर उभे राहिले. गाभाऱ्यांत जाऊन नामदेवानें देवापुढें नैवेद्य ठेवला. हात जोडले. अन् म्हणाला, "देवा, आज चांगला नैवेद्य आणलाय् बरं का!"

थोडा वेळ झाला. देव नैवेद्य खाईना. दामाजीशेट हसले. नामदेवाला म्हणाले,

"नामदेवा, चल घरीं. देव का कुठें नैवेद्य खातो?"

नामदेव हिरमुसला. त्याला वाईट वाटलें. चिमुकला जीव तो. त्यानें पुन्हां देवाला हात जोडले. अन् म्हणाला,

"देवा, असं रे काय करतोस? काल नैवेद्य खाल्लास तूं अन् आज आतां नैवेद्य खात नाहींस. मला आई खोटारडा म्हणेल. बाबा खोटारडा म्हणतील. देवा, खा ना रे! खा ना रे तूं नैवेद्य."

अन् काय आश्चर्य! भगवंतांची मूर्ति—शंखचक्रधारी मूर्ति—नैवेद्य खाऊं लागली. दामाजीशेट वेडावले. त्यांनीं भगवंताला साष्टांग प्रणिपात घातला. नामदेवाला वर उचललं. त्याला आनंदाश्रूंनीं न्हाणीत ते म्हणाले,

"नामदेव, आज तूं मला धन्य केलंस! आपलं कुळ उद्धरलंस! धन्य धन्य आहेस तूं."

✶

## लाडका नामदेव

दामाजीशेट नामदेवाला घेऊन घरीं आले. त्यांनीं गोणाईला घडलेली हकीकत सांगितली. आधींच एकुलता एक मुलगा. तशांत देवानें त्याला दर्शन दिलेलें. त्याला अगदीं कुठें ठेवूं अन् कुठें नको, असें झालें गोणाईला.

नामदेवानें काय वाटेल तें करावें आणि त्याला कोणी बोलूं नये. नामदेवानें द्वाडपणा करावा—अन् तरी दामाजी-गोणाईनें त्याचें कौतुक करावें. त्याचीच बाजू घ्यावी. अशानें नामदेव लाडावला.

नामदेवाभोंवतीं मित्र गोळा झाले. कुणी भले, कुणी बुरे. नामदेवाला वाईट मित्रांची संगत आवडूं लागली. तो बिघडला- हळूहळू त्यांच्या संगतीनें तो चोरी करूं लागला. आणि सतरा. अठरा वर्षांचा झाल्यावर तर तो वाटमारी करूं लागला.

नामदेवाचे गुण लोकांना ठाऊक नव्हते. ते अजून त्याला भला माणूस समजत. कारण नामदेव अजूनहि देवळांत जाई. देवाची मनोभावानें प्रार्थना करी. देवाची पूजा करी. देवाची पूजा झाल्याखेरीज तो जेवत देखील नसे.

एक दिवस नामदेव असाच देवळांत गेला. त्यानें देवाला हात जोडले. तोंच एक बाई तेथें आली. तिच्याबरोबर तिचीं दोन लहान मुलें पण होतीं. एका मुलानें देवापुढें ठेवलेला नैवेद्य पाहिला अन् हट्ट धरला, "आई, मला खाऊं दे !"

आईनें त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण मुलगा ऐकेना. आई रागावली. तिनें बाळाच्या पाठींत धपाटा घातला. बाळ कळवळला.

नामदेवाला वाटलें, आपल्याच पाठींत कुणीं तरी मारलें. तो म्हणाला, "बाई, मुलाला नका मारूं. त्याला काय कळतं? द्या त्याला खाऊं घेऊन."

"नाम्या, तुला सांगायला काय जातं? ह्याच्या वडिलाना काल चोरांनीं लुटलं. त्यांना जखमी केलं. आज त्यांच्या औषधाला घरीं पैसा नाहीं. अन् ह्याला खाऊ द्या !"


ती बाई निघून गेली. नामदेव एकटाच तिथं राहिला. केलेल्या कृत्यांच्या आठवणीनें त्याचें अंतःकरण जळूं लागलं. त्याचें डोकें गरगरूं लागलें.

"होय! आपणच त्या बाळाच्या वडिलांना जखमी केलं. त्याच्या आईला दुःख दिलं. बाळाला दुखवलं. असं किती तरी कुटुंबाना आपण आजपर्यंत दुःखी कष्टी केलं असेल. किती तरी लोकांना आपण त्रास दिला असेल."

नामदेवानें आपल्या थाडथाड थोबाडांत मारून घेतल्या. जमिनीवर डोकें आपटलें. पण त्याच्या अंतःकरणाची आग शांत होईना. सहज त्याचा हात खिशाकडे गेला. त्याची सुरी त्याच्या हातांत आली. नामदेवानें सुरीकडे पाहिलें अन् तो म्हणाला,

"नामदेवा, ह्याच सुरीनं तूं लोकांना जखमी केलंस. त्यांना दुःख दिलंस. सुरी लागली म्हणजे किती वेदना होतात, काय दुःख होतं हें तुलाही कळूं दे."

नामदेवानें आपल्याला सुरी मारून घेतली. त्या जखमेंतून



भळभळां रक्त वाहूं लागलें. नामदेवाची शक्ति क्षीण झाली. नामदेव बेशुद्ध पडला.

## विठ्ठलाचें दर्शन

थोड्या वेळानें कांहीं लोक तेथें आले. त्यांनीं नामदेवाला पाहिलें. त्याला उचलून घरीं नेलें.

नामदेवाला घरीं आणलं. पण तो औषधपाणी घेईना. फार लागलें होतें त्याच्या मनाला. "देवानें आपल्याला दर्शन दिलं अन आपण असं पापकर्म केलें."

मग नामदेवानें ठरवलें, आपण पंढरीला जाऊं. देवाला शरण जाऊं. विठ्ठलाची क्षमा मागूं. तो उदारांचा राणा आपल्याला क्षमा करील.

कांहीं दिवस लोटले. नामदेवाला थोडें बरें वाटलें. तो पंढरपूरला गेला. पण देवापुढें जायची त्याला लाज वाटूं लागली. त्याचें मन त्याला सांगूं लागलें. 'नामदेवा, तूं पापी आहेस. तुला देवळांत जायचा अधिकार नाहीं. देव तुझ्या-सारख्या पाप्यांकरितां नाहीं.' नामदेव चंद्रभागातीरींच राहिला. तेथूनच देवाची सेवा करूं लागला.

रोज चंद्रभागेचें स्नान करावें. देवाचें ध्यान करावें. दीन-दुबळ्यांची होईल ती सेवा करावी. त्यांना दिलासा द्यावा. नंतर गांवांत जावें. भिक्षा मागावी. अन् जें मिळेल तें शिजवावें. त्याचे तीन भाग करावे. एक देवाचा भाग नदींत सोडून द्यावा, एक गाईला चारावा. अन् उरलेला एक आपण खावा. असा कार्यक्रम होता नामदेवाचा.

याप्रमाणें कांहीं काळ गेला. पश्चात्तापानें नामदेवाचें मन शुद्ध झालें. त्याचें पाप धुवून निघालें. पंढरीरायाला नामदेवाची दया आली. त्यानें त्याची परीक्षा घेण्याचें ठरवलें.

त्या दिवशीं नामदेवानें भाकरी केल्या होत्या. देवाची भाकरी त्यानें नदींत टाकली. गाईची गाईला घातली. अन् आपली भाकरी त्यानें ताटांत ठेवली. इतक्यांत त्याला आठवण झाली कीं, आपण तुपाची वाटी घेतली नाहीं. तो उठला. बाजूला एक कुत्रा बसला होता एवढा वेळ. नामदेवाचें त्याच्याकडे लक्षच नव्हतें. नामदेवाची पाठ वळतांच त्यानें भाकरीवर झडप घालून भाकरी पळविली.

आवाज झाला. नामदेवानें पाहिलें. कुत्रा भाकरी घेऊन पळत होता. "आतां हा कुत्रा तुपाशिवाय भाकरी खाईल. अन् मग त्याच्या पोटांत दुखूं लागेल. छे! असं नाहीं होतां कामा. आपण त्याला तूपहि खायला घालूं."



तुपाची वाटी हातीं घेऊन नामदेव कुत्र्यामागें धावत सुटला.

कुत्र्यानें नामदेवाला पाहिलें. त्याला वाटलें, 'आतां हा आप-ल्याला मारणार—' जीवाच्या भीतीनें तोही पळूं लागला.

कुत्रा पुढें आणि नामदेव मागें अशी शर्यतच सुरू झाली. धावतां धावतां कुत्र्याचा पाय एका खड्ड्यांत मुरगळला. नामदेव त्याच्या जवळ गेला. त्यानें त्याचा दुखरा पाय चोळला. भाकरीला तूप लावलें. अन् त्याच्या तोंडात भाकरी दिली.

कुत्र्याचें रूप पालटलें. पंढरीराय प्रकटले त्या जागीं. पंढरीच्या नाथानें नामदेवाला आपल्या हृदयाशीं घट्ट धरलें.

पंढरीच्या विठ्ठलानें आपल्या हृदयाशीं धरलेला नामदेव म्हणजेच आपले 'नामदेव महाराज'.

★

## केशवशेट

विठ्ठलाबरोबर नामदेव पंढरपूरला गेले. कांहीं दिवस ते तेथें राहिले. नंतर एक दिवस त्यांनीं पंढरीरायाचा निरोप घेतला. ते घरीं परत आले,

नामदेवांना पाहून दामाजी-गोणाईंना आनंद झाला. त्यांना नाहीं तरी संसाराच्या तापाचा कंटाळाच आला होता. त्यांनीं नामदेवावर संसाराचा भार टाकण्याचें ठरवलें.

पण नामदेवांचें कुठें संसाराकडे लक्ष होतें? ते विठ्ठलमयच झाले होते. विठ्ठलाशिवाय त्यांना सुचत नव्हतें. विठ्ठलाशिवाय त्यांना दिसत नव्हतें. ध्यानीं मनीं विठ्ठल-विठ्ठल! विठ्ठलाशिवाय कांहीं नको होतें त्यांना.

नामदेव कांहीं उद्योग करीनात. गोणाई-दामाजी सांगून

सांगून दमली. पण नामदेवांनीं कांहीं आपला क्रम बदलला नाहीं. सकाळीं उठावें. कृष्णामाईचें स्नान करावें. मग देवळांत जाऊन बसावें. वाटलें तर जेवायला घरीं यावें. नाहीं तर येऊं नये. तसंच भजन करीत बसावें. सगळा भार विठ्ठलावर टाकला त्यांनीं.

एक दिवस संध्याकाळीं नामदेवांचे मेहुणे त्यांच्या घरीं आले अन् घरांत तर कांहीं नव्हतें. राजाईनें—नामदेवांच्या बायकोनें—नामदेवांना सांगितलें,

"आज घरीं दादा आलाय्, अप्पा आलाय्, कांहीं तरी धान्य आणा. त्यांना जेवायला तर घातलें पाहिजे."

"आज कसलं आलंय् जेवण? आज आहे दशमी. आज दोनदां जेवायचं नसतं. उद्यां एकादशी. एकादशीचा उपासच करायचा. आतां द्वादशीला पाहूं."

हातांत टाळ घेतला. गळ्यांत वीणा घातली. अन् नामदेव निघून गेले.

राजाईला रडूं कोसळलें. कधीं नव्हत ते भाऊ घरीं आले. अन् आपल्या घरीं ही दशा. काय करायचें आता?

"कोण आहे घरांत? धान्य घेऊन आलोंय् मी."

राजाईच्या कानीं शब्द आले. ती पटकन् उठली. दरवाजांत गेली. दोन गोणी घेऊन वाणी दारीं उभा होता. राजाईनें धान्य घेतलें, अन् विचारलें, "काय नांव तुमचें?"

"माझं नांव केशवशेट. शेटनीं सांगितलं लवकर धान्य घेऊन जा म्हणून स्वतः आलों. जातों मी आतां." धान्य ठेवून केशवशेट निघून गेला.

डाळ, तांदूळ, गहूं सर्व धान्य बघून राजाई हरखली. "आपण उगाच बोललों त्यांना" असं राजाईला वाटलें. तिनं पुरेसं धान्य काढलं. चांगला स्वयंपाक रांधला. भावांना जेवायला वाढलें.

नामदेव घरीं आले. त्यांनीं गोणी पाहिल्या! "अरे, आज हें धान्य आणलंस तरी कुठून?" त्यांनीं विचारलं.

"म्हणजे? तुम्हींच ना पाठवलं? केशवशेट स्वतः धान्य घेऊन आले होते."

नामदेव विचार करूं लागले. 'आपण कधीं सांगितलं केशवशेटला? कोण केशवशेट हा?'

अन् त्यांना एकदम आठवण झाली. "अरेरे! देवा, माझ्यासाठीं तूं कष्ट घेतलेस. केशवा, तूं वाणी झालास माझ्यासाठीं. देवा, तुझी लीला अगाध आहे."

नामदेवांनीं लोकांना बोलावलें. सगळें धान्य लुटवलें. गोणाई-राजाई पाहातच राहल्या काय होतंय् तें.

★

## दगड घेऊन कापड दिलें

नामदेवांचें संसारांत लक्ष लागेना. सदोदित विठ्ठल विठ्ठल चालू असायचें त्याचें. गोणाई-राजाई कातावल्या. एक दिवस त्यांनीं खूप बोलून घेतलें त्यांना. म्हणाल्या, "देव करतो! देव करतो! म्हणून देवाला कष्ट पाडा. तुम्ही स्वत कांहीं करूं नका. अन् देवाला ओझीं वाहयला लावा."

नामदेवांना फार लागलें तें बोलणें. त्यांनीं ठरवलें, आपण

कांहीं तरी उद्योगधंदा करायचा. त्यांनीं तसें आपल्या आईला सांगितलं.

दामाजी-गोणाईना आनंद झाला. दामाजीशेटची बाजारांत पत चांगली होती. ते बाजारांत गेले. त्यांनीं निरनिराळ्या लोकांच्या गांठी घेतल्या. खूपसें कापड घरीं आणलें. अन् नामदेवाला म्हणाले,

"नामदेवा, चांगलं कापड मिळालं आहे. खूप फायदा होईल या व्यापारांत. पण हें बघ, शक्य तों रोखीचाच व्यवहार कर. अन् तारण घेतल्याशिवाय कुणालाहि उधार माल देऊं नको."

"बरं आहे." नामदेव म्हणाले. त्यांनीं गाडी जोडली. गाडींत कापड भरलें. विठ्ठलाचें नांव घेतलें. अन् निघाले बाजाराला.

बाजाराच्या वाटेवर एक माळ होता. गाडी माळावरून जाऊं लागली. त्या माळावर उघडीं माणसें वावरत होतीं. नागडीं मुलें हिंडत होतीं.

नामदेवांचं त्यांच्याकडे लक्ष गेलें. त्यांना गहिंवरून आलें. त्यांना वाटलें, "हीं माणसं इथंच राहतात. रात्रीं खूप थंडी पडते तेव्हां हीं काय अंथरणार अन् काय पांघरणार :

"आपल्या जवळ आतां कापड आहे. तें सर्व आपण यांना वांटून टाकूं. त्यायोगें हीं सुखावतील. नाहीं तरी आपण सर्व एका देवाचींच लेकरं. त्याचं सुख तेंच आपलं सुख."

नामदेवांनीं गाडी थांबवली. ते खालीं उतरले. त्यांनीं मुलांना जवळ बोलावलें. त्यांच्याजवळ त्यांची चौकशी सुरू केली. मुलं कुणाजवळ बोलतात म्हणून त्यांचे आईवडील आले.

आणि थोड्याच वेळांत नामदेवांभोंवतीं कडंच केलें तिथल्या माणसांनीं, नामदेव त्यांच्या पुढाऱ्याला म्हणाले,

"गणोबा, मी तुम्हांला कापड देणार आहें."

"देवा, आम्हांला काय करायचं आहे कापडचोपड? आम्हीं आहोंत तीं बरीं आहोंत."

"कां? तुम्हांला थंडी लागत नाहीं रात्रीची?"

"देवा, थंडी लागते. पण कपडा घ्यायचा म्हणजे पैसे पडतात ना?"

"पण तुम्ही आत्तां पैसे देऊं नका. मग तर झालं ना! हो, पण तारण द्यावं लागेल तुम्हांला."

"तारण! कसलं तारण देणार आम्ही? माळावरचे दगड देऊं फार झालं तर."

"चालेल! दगड देखील चालेल मला."

झालं! नामदेवांनीं सर्वांना कापड वाटलें. त्यांचे सर्वांचे चेहरे फुलले. त्यांनीं नामदेवांना दुवा दिला. एक छानदार दगड नामदेवांच्या गाडींत ठेवून दिला. तो दगड घेऊन नामदेव घरीं आले. त्यांनीं तो दगड घरांत नेऊन ठेवला.

★

## सोन्याचा दगड

दामाजीशेट बाहेर गेले होते. दुसऱ्या दिवशीं ते घरीं परत येत होते. वाटेंतच लोकांनीं त्यांना गांठलें. अन् म्हणाले, 'तुमच्या नामदेवानें दगड घेऊन कापड दिलें गणोबांना.' दामाजीशेट रागावले. हा नामदेव असें काहींतरीं करील असें वाटलेंच होतें त्यांना! घरीं येतांच त्यांनीं विचारलें,

"काय नामदेवा! कसा काय झाला व्यापार?"

"फार छान! सर्व कापड संपलं."

"उत्तम, मग पैसे आणले असशील ते दे! व्यापाऱ्यांचीं देणीं देऊन टाकतों."

"पैसे नाहीं आणले. सर्व माल तारण घेऊन दिला गणोबा नाईकांना."

"अन् त्यांनीं तारण काय दिलं? धोंडा ना? वा! फारच चांगलं तारण आहे नी काय? त्या धोंड्याचं काय वसूल करणार आहेस तूं आतां? आणि व्यापाऱ्यांना काय मी तो दगड देऊं?"

नामदेव कांहींच बोलले नाहींत. ते मुकाट्यानें खोलींत गेले. त्यांनीं तो धोंडा बाहेर काढला.

दामाजींचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना. तो सोन्याचा दगड पाहून त्यांचे डोळे फाटले. एवढें सोनें कधीं पाहिलें देखील नव्हतं त्यांनीं. राजाई, गोणाईदेखील आ वासून पाहात राहल्या.

थोडा वेळ गेला आणि मग त्यांचें भांडण सुरू झालें. नामदेव म्हणत, "आपण फक्त आपल्या मालाचे पैसे घ्यायचे आणि बाकीचं सोनं गणोबा नाईकांना परत द्यायचं." तर बाकीचीं म्हणत, "छे, तसं कसं करायचं? त्यानें आपल्या मालाबद्दल तर हें सोनं दिलं. आतां सगळंच आपलं."

त्यांचं भांडण थांबेना. लोक गोळा झाले. त्यांनीं हें पाहिलें. त्यांना आश्चर्य वाटलें. तिथें कांहीं लबाड आणि लोभी लोक होते. त्यांनीं मनाशीं विचार केला, "छान संधि आहे ही."

ते गणोबा नाइकांकडे गेले. त्याला त्यांनीं सर्व हकीकत सांगितली. अन् म्हणाले,

"गणोबा, तूं आतां नामदेवाकडे जा. त्याला सांग कीं, तुझ्या मालाचे तेवढे पैसे घे आणि उरलेलं सोनं परत दे."

"पण मीं नामदेवांना सोनं दिलंच नव्हतं. मीं दिला होता दगड. देवानं त्यांना सोनं दिलं. मी नाहीं परत मागायला जाणार. तुम्ही लबाड आहां. जा, चालायला लागा येथून."

लोक मख्ख होते. त्यांनीं गणोबाला मथवलें आणि शेवटीं त्यांच्या बनवेगिरीनं तो फसला. त्यांना निम्में सोनें द्यायचें त्यानें कबूल केलें. तो त्यांच्याबरोबर निघाला.

त्याला पुढें करून ते लबाड लोक नामदेवाकडे गेले, अन् नामदेवांना म्हणाले,

"नामदेवा, हे गणोबा नाईक. त्याचं उरलेलं सोनं परत मागत आहेत. तूं जर त्याचं सोनं त्यांना दिलं नाहींस तर आम्ही फौजदाराकडे जाऊं. कारण प्रत्येक मनुष्यानें न्यायानें वागायला हवं!"

नामदेवांनीं आपल्या मालाच्या किंमतीचें सोनं काढून घेतलें आणि म्हणाले,

"हं गणोबा, जा घेऊन हें तुमचं सोनं. मला काय करायचं? न्यायानें वागायला हवंच प्रत्येकानं."

गणोबांनीं सोनें उचललें. खूप जड होता तो दगड. तें सोनें माळावर परत आणतां आणतां त्यांच्या मानेचे कांटे अगदीं ढिले झाले. माळावर येतांच त्यांनीं डोक्यावरचें सोनें खालीं उतरवलें.

पण सोनें कुठें होतें तें? काळाकुळकुळीत दगड पडला होता त्यांच्यासमोर. देवानं न्याय दिला होता.

गणोबांनीं आजूबाजूला रागानें पाहिलं. पण ते लबाड लोक तेथून पसार झाले होते.

★

## कच्चं मडकं

नामदेवांना आता कसलाच त्रास नव्हता. त्यांचा सर्व भार देव वहात होता. देव त्यांचें अडलें नडलें पहात होता.

विठ्ठलाची नामदेवांवर फार प्रीति होती. तो त्यांच्याजवळ बोलत बसे. एकदां तर इतर संत आले असतां देवानें त्यांच्याकडे लक्षच दिलें नव्हतें. नामदेवांजवळ बोलत बसला होता तो.

नामदेवांना वाटूं लागलें, 'सर्वांत आपणच देवाचे लाडके! आपलीच भक्ति देवाला आवडते.'

नामदेवांना अभिमान वाटूं लागला. ही गोष्ट ज्ञानदेव, गोरा कुंभार आदि संताच्या ध्यानांत आली. असा अभिमान चांगला नव्हे हें त्यांना ठाऊक होतें. त्यांनीं गंमत करण्याचें ठरविलें.

एकदां गोऱ्या कुंभाराच्या घरीं सर्व संत मंडळी बसली होती. ज्ञानेश्वर पण होते तिथें. ते गोरोबांना म्हणाले, "काका, ह्या सर्व मडक्यांत पक्कीं मडकीं कोणतीं आणि कच्चीं मडकीं कोणतीं, याची परीक्षा करतां का?"

गोरोबा उठले. त्यांनीं थापटणें हातीं घेतलें. अन् प्रत्येकाच्या डोक्यावर ते थापटण्यानं मारूं लागले. होतां होतां नामदेवांची पाळी आली. नामदेव चिडले आणि ओरडले, "काका, हें काय चालवलंय् तुम्हीं? आम्हीं काय पोरं आहोंत? हा पोरखेळ बंद करा पाहूं."

"सांपडलं रे सांपडलं! हें बघा कच्चं मडकं." गोरोबा

म्हणाले. सगळे संत हसूं लागले. एवढ्यांत कुणी तरी म्हणालं, “ खरंच, अजून नामदेव कच्चा आहे.”

आधींच नामदेव चिडले होते. त्यांत ही अशी फजिती झाली. मग काय विचारतां ? त्यांचा राग आवरेना. ते तेथून उठले. देवळांत गेले आणि त्यांनीं पांडुरंगाला विचारलें,

“ विठ्ठला, ही अशी सगळ्यांनीं माझी चेष्टा केली. मी कच्चाच आहे का अजून ? ”

“ होय नामदेवा, अजून तूं कच्चाच आहेस. तूं गुरु केला नाहींस. गुरु केल्याशिवाय पूर्ण ज्ञान मिळत नाहीं मनुष्याला.”

“ मग कोणाला गुरु करूं मी ? कोणाला शरण जाऊं ? ”

“ आंवढ्या नागनाथ येथें विसोबा खेचर नांवाचे संत आहेत. तूं त्यांच्याकडे जा. ते तुला गुरूपदेश देतील.”

★

## नामदेवांचे गुरुजी


विसोबा खेचरांचा शोध करीत करीत नामदेव आंवढ्या नागनाथाला पोहोंचले. तेथें त्यांनीं विसोबा खेचरांचा शोध केला. विसोबा शंकराच्या देवळांत आहेत असें कळलें त्यांना.

नामदेव देवळांत गेले. अन् पाहतात तों काय ? विसोबा देवाच्या पिंडीवर पाय ठेवून झोपले होते. नामदेवांनीं तें पाहिलें. त्यांना चीडच आली या गोष्टीची. “ देवाच्या पिंडीवर पाय ठेवून निजायचं ! ही काय वागण्याची रीत आहे ! अन् हा मनुष्य म्हणे आपल्याला गुरुपदेश करणार.”

पण काय करणार ! पांडुरंगानें तर विसोबांनाच शरण जायला सांगितलें होतें ना ! नामदेव बुचकळ्यांत पडले. आतां काय करावें ?

तोंच विसोबा म्हणाले, "नामदेवा, हें बघ, मी म्हातारा झालों आहें. स्वत:चे पाय उचलण्याचं सुद्धां माझ्या अंगीं त्राण नाहीं. जरा देवाच्या पिंडीवरील माझे पाय दूर करतोस ? देवळांत आलों कसाबसा. पण आतां झालेल्या श्रमानें पार थकलों. आणि कसातरी पडलों आहें येथें."

नामदेव खालीं वाकले. त्यांनीं विसोबा खेचरांचे पाय उचलले अन् दुसरीकडे ठेवले. पण पाहातात तों काय ? त्या पायांखालीं दुसरी पिंडी निर्माण झाली. त्यांनीं लगबगीनें पाय उचलून पुन्हां दुसरीकडे ठेवले. तिथेंहि पिंडी होतीच कीं !



विसोबांचे पाय कुठेंहि उचलून ठेवले तरी त्यांच्या पायांखालीं पिंडी असायचीच. कितीतरी पिंड्या निर्माण झाल्या. रिकामी जागाच शिल्लक राहिली नाहीं.

नामदेव उमगले. त्यांना कळलं कीं, ‘देव सर्वत्र आहे. तो सर्वांभूतीं भरला आहे.’

✶

## बादशहा घाबरला

बेदर नांवाचें एक गांव होतें. त्या गांवीं एक ब्राह्मण राहात असे. त्याला नामदेवांविषयीं फार आदर वाटे. एकदां त्यानें नामदेवांना आपल्या गांवीं बोलावलें.

त्याचा भाव जाणून नामदेवांनीं त्याचें आमंत्रण स्वीकारलें. नामदेव बेदरला निघाले. वाटेंत ठिकठिकाणीं त्यांचीं कीर्तनें होत. त्या कीर्तनांनीं लोक वेडावत. नामदेवाचं कीर्तन ऐकण्यासाठीं ते त्यांच्या मागून दुसऱ्या गांवीं जात.

नामदेव बेदरला आले. त्यावेळीं कितीतरी लोक त्यांच्या मागें होते. विठ्ठलाच्या भजनांनीं त्यांनीं एकच गदारोळ उठवला होता.

बेदरच्या बादशहानें त्यांना येतांना पाहिलें. त्याला वाटलें आपल्यावर कोणी तरी चाल करून येत आहे. त्यानें वजिराला बोलावलें. आपली सेना तयार केली. धामधूम करीत तो नगराच्या प्रवेशद्वारीं येऊन ठाकला.

मग त्याला कळलें कीं, “हे लोक कांहीं आपल्यावर स्वारी करायला आले नाहींत. अगदीं निरुपद्रवी आहेत हे लोक.” तेव्हां त्याचा जीव भांड्यांत पडला.

पण लगेच तो रागावला. कारण या लोकांनीं त्याला त्रास दिला होता ना! जणूं बादशहाला कळलें नाहीं हा त्यांचाच दोष. त्यानें सगळ्या लोकांना हाकलून लावलें. नामदेवाला पकडलें. तुरुंगांत टाकलें. तेव्हां कुठें त्याचा राग शांत झाला.

बादशहा राजवाड्यांत परत गेला. नामदेव तुरुंगांत भजन करीत बसले. त्यांना तुरुंग काय आणि घर काय? सगळें सारखेंच होतें.

बादशहा झोपला होता. "साप! साप!" एकाएकीं ओरडा सुरू झाला. सगळीकडून ओरडा सुरू झाला. सगळीकडून ओरडा ऐकूं येऊं लागला. बादशहा दचकून पलंगावरून खालीं उतरूं लागला. अरे बापरे! भले मोठे साप जमिनींतून वर आले. अन् त्याच्याकडे पाहूं लागले.

बादशहानें इकडे तिकडे पाहिलें. सगळीकडे सापच साप झाले होते. लोक धावत होते. ओरडत होते. बादशहा घाबरला. त्यानें आपल्या प्रधानाला बोलावले आणि म्हणाला,

"त्या अवलियाला अगोदर सोडून द्या."

नामदेव तुरुंगांत भजन करीत होते. वजिर तेथें गेला. त्यानें नामदेवांची सुटका केली. आणि म्हणाला,

"सरकारवर मोठी आफत आली आहे. तुम्ही सरकारला वाचवा."

"कसली आफत, आणि मीं काय केलंय?"

हुजूरच्या सगळ्या वाडाभर सापच साप पसरले आहेत. पाय ठेवायला जागा नाहीं."

नामदेवांनीं विठ्ठलाची प्रार्थना केली. सगळे साप नाहिंसे झाले. नामदेव ब्राह्मणाकडे गेले.

बिचारा ब्राह्मण चिंतेंत पडला होता. त्याला वाटूं लागलें होतें कीं, "आपण नामदेवांना बोलावलं. आपल्यापायीं ते तुरुंगांत गेले." नामदेव त्याच्याकडे जातांच त्याला अपार आनंद झाला.

रात्रीं नामदेवाचें कीर्तन झालें. विठ्ठलाच्या नामगजरानें बेदर शहर दुमदुमून गेलें.

★

## परिस

नामदेवांच्या घराशेजारीं एक ब्राह्मण राहात होता. तो पूर्वी दरिद्री होता, पण नंतर त्यानें देवी लक्ष्मीची उपासना केली. देवी प्रसन्न झाली. तिनं त्याला एक परिस दिला. अन् म्हणाली, "हा परिस तूं लोखंडाला लावलास कीं, त्याचें सोनं होईल. तुझी इच्छा पूर्ण होईल."

ब्राह्मणाचें दारिद्य पळालें. लोक त्याचा हेवा करूं लागले. पण त्यानें कांहीं कुणाला पत्ता लागूं दिला नाहीं.

एक दिवस राजाई त्या ब्राह्मणाकडे गेली होती. त्या वेळीं ब्राह्मणाची बायको कमळजा घरीं होती. तिला फार लोभ वाटे या कुटुंबाविषयीं. तिनें राजाईची हकीकत विचारली. राजाईनें आपली कहाणी सांगितली.

कमळजेला राजाईची दया आली. आपल्या खोलींत जाऊन तिनें परिस आणला. अन् तो परिस राजाईला देऊन ती म्हणाली

"बाई, हा परिस मी तुम्हांला देत्यें आहें. तुमचं काम करून घ्या. अन् लवकर परत आणून द्या. विसरूं नका हो!"

राजाई घरीं गेली. तिनें घरांतल्या लोखंडाचें सोनें केलें. तें सगळें दडवून ठेवलें. मग थोडें सोनें घेऊन ती बाजारांत गेली. धान्य घेऊन परत आली. नंतर ती परिस परत करण्यासाठीं निघाली. तेवढ्यांत नामदेव घरीं आले.

नामदेवांना पाहून राजाई ब्राह्मणाकडे न जातां माघारीं परत फिरली.

राजाईची बावरलेली मुद्रा, अन् घरांतला थाट पाहून नामदेवांना संशय आला. त्यांनीं राजाईला विचारलं, "काय गडबड आहे आज घरांत?" राजाई दादपत्ता लागूं देईना. पण नामदेवांनीं तिचा पिच्छा सोडला नाहीं. त्यांनीं तिला खोदून खोदून विचारलें. शेवटीं राजाईचा नाइलाज झाला. तिनें त्यांना सर्व कांहीं सांगितलें.

नामदेवानें राजाईजवळून परिस मागून घेतला. अन् कांहीं न बोलतां ते कृष्णेवर आंघोळीसाठीं गेले.

राजाई जाऊन थोडा वेळ झाला नाहीं तोंच ब्राह्मण घरीं परत आला. त्यानें आंघोळ केली. अन् तो देवपूजेसाठीं बसला. परिसाची देखील तो देवांबरोबर पूजा करी. त्यानें आपल्या पत्नीला परिस काढण्यास सांगितलें. तिला ब्रह्मांड आठवलें. आतां परिस कुठून देणार? ती अळंटळं करूं लागली. ब्राह्मणानें तर निकड लावली. शेवटीं तिला सर्व हकीकत सांगणें भाग पडलें. ब्राह्मण खूपच रागावला.

कमळजा राजाईकडे आली. तिनें राजाईजवळ परिस मागितला. राजाई मोठ्या संकटांत सांपडली. मोठ्या विश्वासानें ब्राह्मणपत्नीनें आपल्याला परिस दिला होता. आपलें कल्याण व्हावें असें वाटत होतें तिला. पण आपण योग्य वेळीं परिस परत दिला नाहीं. आतां तर आपल्याजवळ परिस नाहीं. कमळजेला खूप त्रास होणार. पण काय करायचें?

नामदेव तो परिस घेऊन नदीवर गेल्याचें राजाईनें कमळजेला सांगितलें. बिचारी ब्राह्मणपत्नी! तिनें तो निरोप आपल्या

नवऱ्याला सांगितला. ब्राह्मण खूबच रागावला. त्यानें बायकोला खूप बोलून घेतलें. अन् आपण नदीकडे धावत सुटला. तो कां धावतो म्हणून आणखी कांहीं लोकहि त्याच्या मागून निघाले.

कृष्णामाईत नामदेव आंघोळ करीत होते. ब्राह्मण तेथें पोहोंचला आणि म्हणाला,

"नामदेवा, माझा परिस परत द्या. पूजेला खोळंबा होतो आहे."



"कसला परिस! मीं तर तो दगड नदींत टाकून दिला."

बाजूचे लोक गंमत पाहात होते. कुणी म्हणाले, "हा नाम्या लबाड बरं का? त्यानें परिस लपवून ठेवला आहे. परिस काय कुणी टाकून देतो!"

हें पाहा, नामदेवा, उगाच ढोंग करूं नको. परिस काय कुणी नदींत टाकतं? खोटं बोलतो आहेस तूं!"

"तुम्हांला खोटं वाटत असेल तर नदींत उतरून पाहा."

सगळे लोक हसूं लागले. बुडी मारून नदीच्या तळाशीं जाणार कोण? अन् तळ गांठला तरी नदीच्या तळाशीं किती तरी दगड. त्यांतून परिस कसा शोधून काढणार?

तोंच नामदेवांनीं पाण्यांत बुडी मारली. ओंजळभर दगड घेऊन ते वर आले. आणि ब्राह्मणाला म्हणाले, "घ्या तुमचा परिस!"

लोकांना चेष्टा वाटली. इतक्यांत एकानें आपल्याजवळील टांचण्या काढल्या. त्या टांचण्या त्यानें दगडांना लावून पाहिल्या सर्व परिसच होते ते. ब्राह्मण ओशाळला. त्यानें नामदेवांचे पाय धरले.

सगळ्या लोकांनीं एकच गजर केला. 'नामदेवमहाराज की जय! पुंडलीक वरदा हरी विठ्ठल!'

★

## तीर्थयात्रा

एकदां ज्ञानेश्वरमहाराज नामदेवांच्या भेटीला आले. एक-मेकांच्या भेटीनें दोघांनाहि आनंद झाला. नंतर ते तीर्थयात्रेला निघाले. त्यांनीं चारी धामांच्या यात्रा केल्या.

नामदेव तीर्थयात्रेला निघाले. पण त्यांचें लक्ष पंढरीरायाकडे गुंतून राहिलें होतें. 'पंढरी सोडून निघालों ही चूक झाली कीं काय!' असं वाटूं लागलें त्यांना ते अस्वस्थ दिसूं लागले.

ज्ञानदेवांच्या ही गोष्ट लक्षांत आली. त्यांनीं नामदेवांना उपदेश केला, "'नामदेवा, देव पंढरींत आहे तसाच येथेंहि

आहे. पंढरीराय सर्वत्र भरला आहे, तो सर्वांठायीं आहे. हें विसोबा खेचरांनीं शिकवलं ना तुम्हांला. थोडा विचार करा. विठ्ठल तुमच्या जवळच. तो कोठें दूर गेला नाहीं."

नामदेवांचें भ्रांतीचें पडळ दूर झालें. मजल दरमजल करीत ज्ञानदेव-नामदेव पुढें चालूं लागले. ते द्वारकेला गेले. श्रीहरीची द्वारका त्यांनीं पाहिली.

तेथून नामदेव तीर्थयात्रा करीत पुढें निघाले. ते मारवाडांत गेले. मारवाड म्हणजे रेताड प्रदेश. नुसता रखरखीत. मैल न् मैल पाण्याचा थेंब देखील दृष्टीस पडावयाचा नाहीं. अन् ऊन तर भयाकारी.

मारवाडांत प्रवास करतां करतां नामदेवांना तहान लागली पाण्याच्या शोधांत ते पुढें निघाले. त्यांना एक विहीर लागली विहिरींत पाणी होतें. पण विहीर अतिशय खोल होती. अन् पाणी काढण्यासाठीं तर कोणतेंच साधन हाताशीं नव्हतें.

आतां कसें करावें? नामदेवांपुढें पेंच उभा राहिला. त्यांनीं विठ्ठलाचा धावा मांडला.

"हे विठ्ठला, तहानेनें माझे प्राण व्याकुळ झाले आहेत. आतां तुझ्यावांचून अन्य कोणाकडे बरें मी पाहूं?"

पंढरीच्या नाथानें नामदेवांचा धावा ऐकला. विहिरीच्या कांठानें सुमधुर अन शीतल जलझरी वाहूं लागली नामदेव पाणी पिऊन संतोषले.

पुढें तीर्थयात्रा करीत करीत नामदेव पंजाबांत गेले. तेथील लोकांना नामदेवांनीं इतकी मोहिनी घातली कीं, आपल्या धर्मग्रंथांत त्यांनीं नामदेवांचीं वचनें घातलीं आहेत.

★

## नागनाथाचें देऊळ

नामदेवांनीं चारी धामांची यात्रा संपूर्ण केली. नंतर ते आंवढ्या नागनाथ येथें परत आले. या गांवीं शंकराचें एक देऊळ होतें. नामदेव देवळांत गेले. लोकांनीं आग्रह केला. ते कीर्तनाला उभे राहिले.खूपच गर्दी जमली त्यांच्या कीर्तनाला.

त्या गांवच्या कीर्तनकारांनीं हें पाहिलें. त्यांना खूपच मत्सर वाटला नामदेवांचा.ते देवळाच्या पुजाऱ्यांकडे गेले.अन् म्हणाले,

"हा नामदेव! जातीनं शिंपी! कीर्तन करतो आहे."

"कोणी का असेना, पण छान कीर्तन करतो आहे नाहीं का?"

"पण शंकराच्या देवळांत विष्णूचं कीर्तन योग्य नाहीं. आणि कीर्तन तरी कसलं करतो आहे? नुसता टाळकुटेपणा तर चाललाय्!"

कीर्तनकार पुजाऱ्यांच्या ओळखीचे होते. त्यांना पटकन् पटलं तें सांगणं.

कीर्तन ऐन रंगांत आलें होतें. पुजारी तेथें गेले अन् म्हणाले,

"नामदेवा, पुरे झालं तुझं कीर्तन. ह्या देवळांत तूं विष्णूचं कीर्तन करतोस काय?"

"विष्णु काय आणि शंकर काय? दोघेहि एकच. एकाच परमात्म्याचीं रूपं!"

"आम्हांला शिकवतोस काय? चल ह्या देवळांतून बाहेर पड, नी मग काय हवं तें कर."

"ठीक आहे! जशी आपली आज्ञा. श्रोते हो! देवळाच्या मागच्या बाजूला मोठं पटांगण आहे. तेथें आपण कीर्तन करूं या."

देवळाच्या मागच्या बाजूला गेले सर्वजण. नामदेव कीर्तन करूं लागले. कीर्तन रंगांत आलें. देवाला वाटलं आपणहि कीर्तन ऐकावें नामदेवाचें.

एकाएकीं देऊळ फिरलें, देवळाचें प्रवेशद्वार पटांगणाकडे झालें.

पुजारी झोपले होते. सकाळीं उठून समोरच्या तळ्यांत स्नान करण्यासाठीं ते बाहेर पडले. पण तळं कुठें होतं तिथं? तळें देवळाच्या मागील बाजूस गेलें होतें.

पुजाऱ्याच्या तोंडून उद्गार बाहेर पडले, 'अरे! तळं काय झालं?'

★

## नामदेवाची संपत्ति

पंढरपुरांत एक सावकार होता. तो गोरगरीबांना मदत करी. अडल्या-नडल्यांना साहाय्य देई. देवाची भक्ति करी. संतांची सेवा करी, सगळेजण त्याला नांवाजीत. त्याला सगळेजण दुवा देत.

नामदेव नुकतेच परत आले होते. सावकारानें त्यांची कीर्ति ऐकली, त्याला नामदेवांबद्दल आदर वाटला. त्यानें मनाशीं ठरवलं कीं, "आपण नामदेवांना खूप द्रव्य देऊं. त्यांच्या घरची फार गरिबी आहे. आपण त्यांना मदत करूं."

मग सावकारानें आपल्या नोकराला बोलावले अन् म्हणाला, "हे बघ गेन्या, देवळांत कीर्तन करतात ते नामदेव ठाऊक आहेत ना तुला? तूं त्यांच्याकडे जा. आणि त्यांना सांग कीं, मी बोलावलंय् म्हणून."

सावकाराच्या आज्ञेप्रमाणें गेन्या नामदेवांकडे गेला. त्यानें नामदेवांना सावकाराचा निरोप सांगितला.

नामदेवांनींहि सावकारासंबंधीं ऐकलें होतें. ते सावकाराकडे गेले. सावकार उठला, त्यानें नामदेवांचा आदरसत्कार केला. अन् नंतर नामदेवाना, म्हणाला, "नामदेवा, तुम्हाला कांहीं द्रव्य द्यावं असं आमच्या मनांत आहे, म्हणून तुम्हांला बोलावलं."

"बरं आहे सावकार! पण मला द्रव्य देण्यापेक्षां दुसऱ्या कुणाला मदत करा तुम्ही."

"देवा, दुसऱ्यांना देईनच. पण तुम्हीहि घ्या."

"सावकार, मला खरंच द्रव्य नको. देवानें भरपूर संपत्ति दिली आहे मला."

सावकार हसला. त्यानें नामदेवांची गंमत करावयाचं ठरवलंन् आणि तो म्हणाला,

"मग तुमच्याजवळ माझ्या संपत्तीपेक्षांहि अधिक संपत्ति असेल."

"होय सावकार."

"देवा, मग आपण आपल्या संपत्तीची तुला करूं या."

नामदेवांनीं संमति दिली. सावकारानें एक मोठा तराजू आणला. आपली संपत्ति एका पारड्यांत घातली. आणि नामदेवांकडे पाहिलें.

नामदेव समजले. त्यांनीं एका तुळशीपत्रावर विठ्ठलाचें नांव लिहिलें. तें तुळशीपत्र दुसऱ्या पारड्यांत टाकलें. तुळशीपत्र पारड्यांत पडतांच तें पारडें खालीं गेलें.

सावकाराला आश्चर्याचा धक्काच बसला. आपल्या संपत्तीची किंमत एका तुलसीपत्राहूनहि कमी आहे हें त्याला उमजलें.

★

## समाधि

नामदेवांचा अन् ज्ञानेश्वरांचा एकमेकांवर भारी लोभ होता. श. १२१८ मध्यें ज्ञानेश्वरांनीं समाधि घेण्याचें ठरवलें. नामदेव आळंदीला गेले. ज्ञानियांच्या राजानें आपलें अवतारकार्य संपवलें. त्यांनीं समाधि घेतली. नामदेवांचा प्राणप्रिय सखा चिदात्म्याशीं एकरूप झाला.

नामदेवांना वाटलें, 'आतां आपण पोरके झालों.' एखाद्या अजाण बालकाप्रमाणें ते ढसढसा रडूं लागले. त्यांच्या नेत्रांतून अनिर्बंध अश्रुधारा वाहूं लागल्या. त्यांचें दुःख आवरेना. त्यांची समजूत पटेना.

ज्ञानदेवांच्या विरहानें नामदेवांच्या जिवाला मोठी हुरहूर लागून राहिली. ज्ञानदेवांची भेट व्हावी म्हणून त्यांनीं पांडुरंगाजवळ हट्ट घेतला.

' ज्ञानदेव पहावा डोळा । ऐसें वाटतें विठ्ठला ॥
जगज्जेठी जगत्पाळ । माझी पुरवावी आळ ॥ '

ज्ञानेश्वराच्या समाधीनंतर नामदेवांनीं अभंग रचण्यांत आणि कीर्तन करण्यांतच आपलें आयुष्य वेंचलें. तदनंतर त्यांना पांडुरंगानें वैकुंठाला बोलावलें.

विठूरायाचें बोलावणें आलें. नामदेव सिद्ध झाले. वयाच्या ८० व्या वर्षीं ( आषाढ वद्य १३ श. १२७२ ) पंढरपूरच्या महाद्वारांत पंढरीरायाच्या पायाजवळ त्यांनीं समाधि घेतली.

* * *

## ३ : संत जयदेव

### पंडित

बंगाल देशांत बिंदुबिल्व नांवाचें एक लहानसें गांव होतें. त्या गांवाच्या साधारण मध्यावर एक घर होतें. गांवकऱ्यांस फार लोभ होता त्या घराबद्दल. फार आदर होता त्या घराबद्दल त्यांना. कारण त्या घरांत राहात असत 'जयदेवस्वामी'.

जयदेवांच्या वडिलांचें नांव होतें भोजदेव. अन् आईचें नांव होतें राधादेवी. जयदेव हा त्यांचा एकुलता एक मुलगा.

जयदेव पांचसहा वर्षांचा झाला. भोजदेवांनीं त्याची मुंज केली. त्याला गुरुगृहीं पाठवायचें ठरवलें.

राधादेवींना फार वाईट वाटूं लागलें. त्या भोजदेवांना म्हणाल्या, " जयदेव लहान आहे. अजून त्याला कांहीं कळत नाहीं. आपल्यापासून तो कधीं कुठं दूर गेलेला नाहीं. वेगळा राहिलेला नाहीं.

" मग गुरुगृहीं जयदेव एकटा कसा राहील? तिथें त्याचं मायन कोण करील? त्याची तहान-भूक कोण जाणील? त्याचं दुखलं-खुपलं कोण पाहील? आपण त्याला पाठवूंयाच नको."

पण भोजदेवांनीं राधादेवींची समजूत घातली. अन् मग राधादेवींना पटलं कीं, ' आपला जयदेव अडाणी राहिला तर

लोक त्याला हंसतील. त्याला हिणवतील. तसं नको व्हायला. आपला जयदेव विद्वान् झाला पाहिजे. पंडित झाला पाहिजे त्याला सर्वत्र मान मिळाला पाहिजे.'

जयदेवानें आई-वडिलांचा आशीर्वाद घेतला. देवाला नमस्कार केला. अन् वडिलांच्या बरोबर तो गुरुगृहीं निघाला.

आपल्यापासून दूर दूर जाणारी त्याची लहानगी मूर्ति दिसेनाशी होईपर्यंत राधादेवी त्याच्याकडे पाहात दरवाज्यांत उभ्या होत्या.

जयदेवाला गुरुगृहीं ठेवून भोजदेव परतले. जयदेव आश्रमांत राहूं लागला. तो हुशार होता. त्याला अभ्यासाची गोडी होती. गुरुजी जें जें शिकवीत तें तें तो लक्षपूर्वक शिके. एकामागून एक किती तरी ग्रंथ त्यानें अभ्यासिले. त्यांचें अध्ययन केलें. ते आत्मसात् केले. त्याच्या हुशारीनें गुरुजी प्रसन्न झाले. आपल्याला येत असलेली सर्व विद्या गुरुजींनीं त्याला दिली.

वर्षांमागून वर्षं लोटलीं. एक तप झालें आश्रमांत येऊन जयदेवाला. जयदेवाचा विद्याभ्यास पूर्ण झाला. त्यानें आश्रमीय मित्रांचा निरोप घेतला. गुरुजींच्या पायांवर त्यानें डोकें ठेवलें.

'यशस्वी हो! चिरायु हो!' गुरुजींनीं आशीर्वाद दिला.

गुरुजींचा आशीर्वाद घेऊन जयदेव घरीं परत आला. मोठ्या उत्कंठेनें भोजदेव-राधादेवी त्याची वाट पाहात होतीं. त्याला आलेला पाहून त्यांना अपार आनंद झाला. राधादेवींच्या डोळ्यांतून तर आनंदाश्रु वाहूं लागले.

जयदेवानें आईला वंदन केलें. वडिलांना वंदन केलें. त्यांनीं त्याला आशीर्वाद दिला. त्याचें कौतुक केलें.

जयदेवाची सर्व शास्त्रांत गति अकुंठित चाले. आपल्या अडचणी सोडविण्यासाठीं मोठे मोठे विद्वान् लोक त्याला बोलावून घेत. अन् तें पाहून ‘ आपला जयदेव पंडित झाला ’ याचा भोजदेव-राधादेवींना अभिमान वाटे.

पण जयदेवाचें हें कौतुक पाहणें भोजदेवांना फार दिवस लाभलें नाहीं. एकदां त्यांना ताप आला. जयदेवाला राधा-देवींच्या स्वाधीन करून ते देवाघरीं निघून गेले.

★

## निरंजन सावकार

दिवसामागून दिवस लोटले. जयदेवाचें दुःख कमी झालें. त्याचा होणारा गौरव पाहून राधादेवींना देखील आपल्या दुःखाचा विसर पडूं लागला. त्यांना वाटे, ‘ आपला जयदेव पंडित झाला आहे. आतां तो राजदरबारीं जाईल. राजा त्याच्या विद्वत्तेचा गौरव करील. त्याचा सर्वत्र सन्मान होईल.’ त्याची कीर्ति दूरवर पसरेल.

पण जयदेव राजाकडे गेला नाहीं. त्याची राजदरबारीं जाण्याची इच्छाच दिसत नव्हती. तो सकाळीं उठे. गंगा-माईवर जाऊन स्नान करी. नंतर घरीं परत येई. आपल्या देवाची—श्रीहरीची—पूजा करी. अन् उरलेल्या वेळांत पाठ-शाळेंत जाऊन विद्यार्थ्यांना शिकवी.

राधादेवींना राहवेना. एक दिवस त्यांनीं जयदेवाला विचारलें, “ जयदेव, तूं राजदरबारीं कां जात नाहींस ? दरबारीं तूं गेलास म्हणजे तुला धन मिळेल, मान मिळेल.”

“ होय आई ! पण त्यासाठीं राजाचीं स्तुतिस्तोत्रं मला गावीं लागतील.”

“ मग काय हरकत आहे त्याला ?”

“ आई ! गुरुजींनीं मला विद्या दिली. ती जगदीशाची स्तुति करण्यासाठीं. त्याचं गुणगान गाण्यासाठीं.”

त्याच वेळीं दरवाज्यांतून हाक ऐकूं आली—‘ जयदेव, ए जयदेव !’ राधादेवींनीं चमकून जयदेवाकडे पाहिलं. जयदेव स्तोत्र म्हणायचा थांबला. अन् बाहेर जात म्हणाला, “ कोण ? निरंजनशेठ ?”

निरंजन सावकार राजाचे शिपाई बरोबर घेऊन आला होता. भोजदेव निरंजन सावकाराचे दोनशें रुपये देणें होते. ते वारल्यानंतर निरंजन सावकारानें राधादेवींच्या मागें तगादा लागला होता. भोजदेवांच्या घरावर त्याचा डोळा होता.

“ जयदेव पंडित झाला आहे. आतां तो पैसे मिळवूं लागेल. मग आम्ही तुमचं देणं ठेवणार नाहीं. तो तुमची रक्कम फेडील.” राधादेवी सावकाराला आश्वासन देत.

निरंजन सावकार राधादेवींचें सांगणें मान्य करीत होता. कारण त्याला भीति वाटत होती, ‘ जयदेव पंडित झाला आहे. तो राजदरबारीं गेला तर पुढेंमागें आपलें उट्टें काढील.’

पण जेव्हां त्यानें पाहिलें कीं, ' जयदेव राजदरबारीं जात नाहीं. कांहीं करीत नाहीं. देव देव करीत बसतो. अन पाठशाळा चालवतो. '

मग मात्र त्यानें राधादेवींच्या मागें रकमेची निकड लावली. अन् आज तर तो घर ताब्यांत घेण्यासाठीं आला होता.

जयदेवानें निरंजनला बसण्यास सांगितलें. निरंजन ओट्या-वर बसत म्हणाला,

"जयदेव, आज रकम देण्याचा शेवटचा वायदा आहे. देतो आहेस तूं पैसे आतां?"

" निरंजन, पैसे मिळाले नाहींत. पण तुमचे पैसे मी लव-करच देतों."

"हूं! लवकरच देतों! किती दिवस थांबायचं आम्हीं? ही राजाची आज्ञा पाहा! आणि सांग आतां रकम देतो आहेस कीं नाहीं तें?"

जयदेव कांहींच बोलला नाहीं. दरवाज्याआड राधादेवी उभ्या होत्या. त्यांच्याकडे पाहून त्यानें मान खालीं घातली.

" चला रे! काढा सामान बाहेर." निरंजन सावकारानें आपल्या नोकरांना आज्ञा दिली.

" चल आई! हें घर आतां आपलं नव्हे." जयदेव घरांत गेला. देवांना नमस्कार करून त्यानें देव उचलले. आणि आईसह तो बाहेर आला.

" नोकर सामान बाहेर काढूं लागले. निरंजन सावकार जयदेवाला घराबाहेर काढण्यासाठीं गेला आहे, हें कळतांच किती तरी लोक जयदेवाच्या घराभोंवतीं गोळा झाले.

जयदेवावर लोकांचें अपार प्रेम होतें. ते त्याची सेवा जाणीत होते. सावकाराचे नोकर सामान घराबाहेर काढूं लागले हें पाहून ते चिडले. कांहीं तरुण तर सावकारावर धावून गेले.




एवढे लोक धावून आल्यावर ते एकदोन शिपाई काय करणार? पण जयदेव मध्यें उभा राहिला.

"थांबा! त्यांना कुणीहि हात लावूं नका!" त्यानें सर्वांना सांगितलें. सर्वजण सावकाराकडे रागानें पाहात मागें फिरले.

इतक्यांत सावकाराचा एक नोकर त्या गर्दीतच धावत पुढें आला. आणि म्हणाला, "सावकार, तुमच्या घराला आग लागली आहे—लवकर चला."

काय करावें हें निरंजन सावकाराला कळेना.

"बरं झालं! छान खोड मोडली." लोक म्हणाले.

जयदेव मात्र आपल्या हाताला लागली ती कळशी घेऊन निरंजन सावकाराच्या घराकडे धावत सुटला. निरंजन सावकाराच्या घराजवळ पोहोंचताच, त्यानें कळशीनें विहिरीचें पाणी काढण्यास सुरुवात केली.

जयदेवाच्या मागून लोकहि धावत आले होते. त्यांनींहि पाणी काढून आग विझविण्यास सुरुवात केली. आग फार मोठी नव्हती. थोड्याच वेळांत ती आग आटोक्यांत आली. सावकाराचें घर आगीपासून वांचलें.

ह्या वेळपर्यंत निरंजन सावकार तेथें आला होता. त्यानें जयदेवाचे पाय धरले. आणि तो म्हणाला, "जयदेव! जयदेव पंडित! तुम्हीं होतां म्हणून माझं घर राहिलं. मला क्षमा करा. माझे नोकर तुमचं सामान नीट लावून देतील."

आणि सावकारानें आज्ञा करतांच त्याचे नोकर जयदेवाचें सामान नीट लावण्यासाठीं जयदेवाच्या घराकडे निघाले.

पद्मा

बिंदुबिल्व गांवापासून थोड्याच अंतरावर जगन्नाथपुरी नांवाचें एक क्षेत्र आहे. तेथून जगन्नाथाचा रथ निघतो. त्या वेळीं खूप मोठी यात्रा जमते तेथें.

त्या जगन्नाथपुरीमध्यें देवशर्मा नांवाचा एक ब्राम्हण आपल्या पत्नीसह राहात होता. मूळबाळ नव्हतें म्हणून देवशर्मा दुःखी होता. त्याची बायको दुःखी होती.

सर्व उपाय थकले. शेवटीं देवशर्मा अनन्य भावानें देवाला शरण गेला. तो जगन्नाथाच्या मंदिरांत गेला. त्यानें देवाची पूजा केली. देवाला हात जोडले. अन देवाची प्रार्थना केली.

"हे जगन्नाथा! तूं माझ्यावर कृपा कर. मला मुलं होऊं देत. देवा! तुझ्या प्रसादानें माझ्या घरीं बाळं खेळूं लागलीं, तर मी पाहिलं मूल तुझ्या चरणीं वाहीन."

देवशर्म्याची प्रार्थना देवानें ऐकली. थोड्याच दिवसांनीं देवशर्म्याची बायको गरोदर राहिली. एका सुंदर मुलीला तिनें जन्म दिला.

देवशर्म्यानें मुलीचें नांव ठेवलें पद्मावती. देवी लक्ष्मी प्रकट झाली होती जणूं त्याच्या घरीं. पद्मावतीचें देवशर्म्यानें मोठ्या कौतुकानें लालन-पालन केलें. तिला शिक्षण दिलें. मोठी झाल्यावर तिला देवचरणीं अर्पण करावयाची होती ना?

पद्मावती मोठी झाली, तेव्हां तिला घेऊन देवशर्मा जगन्नाथाच्या देवळांत गेला. त्यानें भगवंताची पूजा केली. त्याला नमस्कार केला अन म्हणाला,

"हे भगवन्! तूं प्रसन्न झालास. माझ्या घरीं बाळ खेळूं लागलं. घर आनंदानं फुललं. ही माझी मुलगी पद्मावती तुला अर्पण करीत आहे. तूं हिचा स्वीकार कर."

नंतर देवशर्म्यानें पद्मावतीला मंदिरांत ठेवलें. पुजाऱ्याला सर्व हकीगत सांगितली. अन् आपण घरीं परतला.

त्या रात्रीं पुजाऱ्याला एक स्वप्न पडलें. भगवान् श्रीकृष्ण त्याला दिसले. भगवान् त्याला म्हणाले, " पुजारी, देवशर्म्याला सांग कीं, मी त्याच्यावर प्रसन्न झालों आहें. पद्मावतीचा स्वीकार केला आहे. माझी आज्ञा म्हणून तूं पद्मावतीचा जयदेवाशीं विवाह करून दे."

दुसऱ्या दिवशीं पुजारी उठला. भगवंतांच्या बांसरीचे मधुर सूर अजून त्याच्या कानांत निनादत होते. पद्मावतीला बरोबर घेऊन तो देवशर्मा ब्राह्मणाच्या घरीं गेला. त्यानें त्याला सर्व हकीगत सांगितली. देवशर्मा आनंदला. पद्मावती-सह तो जयदेवांकडे निघाला.

जयदेवस्वामी आपल्या झोपडींत देवपूजा करीत होते. तेथें देवशर्मा आला. प्रसन्न अन् शांत अशी जयदेवस्वामींची मूर्ति त्यानें पाहिली. तो संतोषला. त्यानें स्वामींना नमस्कार केला, आपण येथें कां आलों तें त्यानें सांगितलें. अन् म्हणाला,

" स्वामी, ही माझी कन्या पद्मावती. तुमच्याशीं तिचा विवाह करून दे, अशी जगन्नाथानें आज्ञा केली आहे मला."

" असं पाहा! जगन्नाथानें मलाच कां नाहीं तशी आज्ञा केली! मला वाटतं तुम्ही कांहीं तरीच सांगत आहां."

देवशर्मा कांहींहि बोलला नाहीं. तो आपल्या गांवीं गेला. अन् पुजाऱ्याला बरोबर घेऊन परत आला. पुजाऱ्यानें सर्व हकीगत जयदेवस्वामींना सांगितली. स्वामींनीं मान डोलावली.

देवशर्म्यानें जयदेवांकडे पाहिलें अन् पद्मावतीकडे वळून तो म्हणाला,

" पद्मावती, तूं येथें राहा. आतां हेंच तुझें घर. बरं आहे! येतों मी!"

" चला, पुजारीबाबा " असें म्हणून पुजारीबाबांना घेऊन देवशर्मा निघून गेला.

★

## गीत-गोविंद

हा सर्व प्रकार पाहून जयदेवस्वामी गोंधळून गेले होते. नंतर ते पाहतात तों देवशर्मा अन् पुजारीबाबा तेथें नाहींत. पद्मावती मात्र तेथें होती. तिच्याकडे वळून ते म्हणाले,

" पद्मावती, तुझे वडील तुला येथें सोडून गेले. आतां एकटी राहशील तूं येथें ? "

" एकटी कां ? आपण आहांत ना ? "

जयदेवस्वामींना कांहीं सुचेना. ते पुन्हा विचारांत पडले. अन् शेवटीं त्यांनीं ठरवलें कीं, " जगन्नाथाची आज्ञा आहे. आपल्या गोपालकृष्णाची आज्ञा आहे. आपण ती आज्ञा मानली पाहिजे.

" पद्मावतीला घेऊन आपण देवशर्मा ब्राह्मणाकडे जावं. अन् विधिपूर्वक पाणिग्रहण करावं पद्मावतीचं. "

जयदेवस्वामी पद्मावतीला घेऊन देवशर्म्याकडे आले. त्यांनीं आपला विचार देवशर्म्याला सांगितला. देवशर्मा आनंदला. त्यानें सर्व तयारी केली. अन् मोठ्या थाटानें जयदेवस्वामींचा पद्मावतीशीं विवाह झाला.

कांहीं दिवसांनीं जयदेवस्वामी पद्मावतीसह आपल्या झोपडींत परत आले. पद्मावती पंहाटे उठे. घर झाडी. अंगणांत

सडा घाली. देवघर सारवी. सुंदर रांगोळी घाली. देवपूजेसाठीं फुलें आणी. पूजेची तयारी करून ठेवी.

स्वामी गंगेवरून आंघोळ करून परत येत. देवपूजेची तयारी पाहून ते प्रसन्न होत. सस्मित मुद्रेनें पद्मावतीकडे पाहात. अन् मग देवपूजा सुरू करीत. देवपूजेंत तल्लीन होत.

देवपूजा यथाविधि होऊं लागली. स्वामी संतोषले. त्यांची कवि-वृत्ति हळूहळू उमलूं लागली. त्यांना वाटूं लागलें, 'आपण हरीचे गुण गावे. एक चांगलंसं काव्य रचावं. त्या काव्यानं, त्या गानानं हरीला आपलंसं करावं. हरीला प्रसन्न करावं.'

एक दिवस स्वामी पूजा करीत होते पूजा करतां करतां श्रीहरीच्या मूर्तीवर त्यांची नजर खिळून राहिली. ती मुळीं हलेनाच. त्यांची समाधि लागली. आणि त्याचे वेळीं हरीची लीला आठवून त्यांच्या मुखीं सरस्वती प्रकटली; त्यांच्या मुखांतून काव्य प्रकटलें—

प्रलयपयोधिजले धृतवानसि वेदम् ।
विहितवहित्रचरित्रमखेदम् ।
केशव धृतमीनशरीर । जय जगदीश हरे !

शेजारींच बसलेल्या पद्मावतीनें तें काव्य ऐकलें. तिनें तें काव्य कंठगत केलें.

देवी शारदेचा जयदेवस्वामींवर वरदहस्त होता. ती त्यांच्यावर प्रसन्न होती. स्वामींच्या लेखणींतून अमृतासारखी सुमधुर अन् रसाळ काव्यझरी प्रकटूं लागली.

★

## देवाचें दर्शन

एकदां जयदेवस्वामी 'गीतगोविंद' लिहीत होते. लिहितां लिहितां एक पंक्ति त्यांच्या मनासारखी जुळेना. त्यांना पसंत पडेना. त्यांनीं खूप विचार केला. पण छे! जमेनाच तें मुळीं.

जयदेवस्वामींनीं लेखणी खालीं ठेवली. ते उठले. अन् स्नान करण्यासाठीं नदीवर गेले.



पद्मावती 'गीत-गोविंद' वाचीत बसली. गीत-गोविंद थोडेंसें वाचून झालें असेल नसेल तिचें, इतक्यांत स्वामी परत आले.

स्वामींना पाहून पद्मावतीला आश्चर्य वाटलें. ‘आतांच तर ते नदीवर गेले होते! अन् लगेच कां परत आले?’ असें मनांत आलें तिच्या. पण ती कांहीं बोलली नाहीं. आपल्या कामाला लागली ती.

स्वामींनीं लेखणी हातांत घेतली. झरझर कांहीं ओळी लिहून घाईघाईनें पुन्हां आंघोळीला निघून गेले ते. अन् पद्मावती आपल्या कामाला लागली.

थोड्या वेळानें स्वामी स्नान करून परत आले. त्यांनीं देव-पूजा केली. परमेश्वराचें ध्यान केलें. अन् ‘गीत-गोविंद’ हातांत घेतलें. अन् पाहतात तों ओळी पुऱ्या झाल्या होत्या. अगदीं पाहिजे तशा. त्यांनीं पद्मावतीकडे पाहिलें अन् म्हणाले,

“कुणी लिहिल्या ह्या ओळी? मला सुचतच नव्हत्या कांहीं केल्या!”

“कुणीं म्हणजे? आपणच नाहीं का लिहिलंत हें? आंघोळी-पूर्वीं परत आलांत. मीं ‘गीत-गोविंद’ आपल्या हातीं दिलं. आपण घाईघाईनें ह्या ओळी लिहिल्यात. अन् परत गेलांत.”

स्वामींना कांहींच कळेना! ते नदीवरून आतांच परत येत होते. अन् पद्मावती म्हणते कीं, आपण एकदां येऊन गेलों! काय घोटाळा आहे हा? अन् कुणीं लिहिल्या ह्या ओळी!

स्वामींनीं किंचित् काल विचार केला. सर्व गोष्टी त्यांच्या चट्दिशीं लक्षांत आल्या. त्यांनीं मुरलीधराला हात जोडले अन् म्हणाले,

“देवा! माझं रूप घेऊन आलास तूं! पद्मावती, तूं धन्य आहेस! भगवंतानं तुला दर्शन दिलं.”

★

## राजा सात्त्विक

गीत-गोविंद पूर्ण झालं. त्या काव्यानं लोक वेडावले. ज्याच्या त्याच्या मुखीं 'गीत-गोविंद' घोळूं लागलं. घराघरांतून गीत-गोविंदाचे सूर ऐकूं येऊं लागले.

जगन्नाथ क्षेत्रींच्या राजाचें नांव होतें 'सात्त्विक'. त्यानें गीत-गोविंद ऐकलें. अन् त्याला वाटूं लागलें, आपणहि एक काव्य करावं. गीत-गोविंदासारखं !

मग गीत-गोविंद डोळ्यांसमोर ठेवून राजानें एक काव्य रचलें. दरबारांतल्या खुषमस्कऱ्यांनीं खूप स्तुति केली त्या काव्याची. अन् मग राजानें सर्वांना आज्ञा केली—

"आतां यापुढें आमच्या राज्यांत सर्वांनीं आमचंच काव्य म्हटलं पाहिजे. दुसरं कोणतंहि काव्य म्हणतां कामा नये."

राजाची आज्ञा ! सगळे लोक घाबरले. त्यांना भीति वाटली. त्यांना गीत-गोविंद प्रिय होतें. पण त्यांना वाटे आपण गीत-गोविंद म्हटलें तर राजाज्ञेचा भंग होईल. आपल्याला शिक्षा होईल. अन् मग राज्यात कोणीहि 'गीत-गोविंद' म्हणेना.

एक दिवस जयदेवस्वामी जगन्नाथाच्या देवळांत गेले. तेथें त्यांनीं प्रभूची मूर्ति पाहिली. जगन्नाथाला नमस्कार घातला. अन् 'गीत-गोविंद' म्हणण्यास सुरुवात केली.

राजाचे कांहीं सेवक तेथें होते. त्यांनीं तें ऐकलें. स्वामींना त्यांनीं पकडलें. राजापुढें नेऊन उभें केलें. अन् म्हणाले,

"महाराज, हा आपलं काव्य न म्हणतां दुसरंच काव्य म्हणत होता."

" स्वामी! आमच्या राज्यांत आमच्या काव्याशिवाय दुसरं काव्य म्हणायचं नाहीं असा दंडक आहे! मग तुमचं काव्य कां म्हणत होतां तुम्ही?"

" राजन्, त्या काव्यानं प्रभु प्रसन्न होतात म्हणून."

" अस्सं? अन् आमच्या काव्यानं काय जगन्नाथ प्रसन्न होणार नाहीं?"

" राजा, तें मी कसं सांगूं? परीक्षा केली पाहिजे त्याची!"

" वा! छान! आमच्या काव्याची परीक्षा करायची? अन् ती परीक्षा कोण आपणच करणार असाल?"

" मी कशाला? जगन्नाथप्रभूच्या चरणांशीं आपण आपलीं काव्यं ठेवूं. अन् प्रभु देतील निर्णय."

राजापुढें बिनतोड पेंच होता. निरुपायानें त्यानें स्वामींच्या म्हणण्याला मान्यता दिली. मग स्वामी अन् राजा आपापलीं काव्यें घेऊन मंदिरांत गेले. त्यांनीं आपलीं काव्यें प्रभुचरणीं ठेवलीं अन् ते बाहेर आले.

देवळाचीं दारें लावून घेण्यांत आलीं. स्वामी, राजा अन् किती तरी लोक बाहेर उभे होते. उत्कंठतेनें वाट पहात होते काय निर्णय लागतो म्हणून!

देवानें निर्णय दिला. जयदेवस्वामींचें काव्य देवानें ठेवून घेतलें. राजाचें काव्य दरवाज्यांतून बाहेर आलें.

राजाचा चेहरा खरकन् उतरला. जयदेवस्वामींनीं राजाचें सांत्वन केलें. लोक आपापल्या घरीं परत फिरले. जयदेवस्वामीहि आपल्या झोपडीकडे निघाले.

राजाच्या मनाला मात्र झाली गोष्ट फार लागली. त्यानें अन्न-पाणी सोडलें. देवाच्या दारीं धरणें धरलें. देवाला राजाची दया आली. त्यानें राजाला दृष्टान्त दिला—



" राजा, कष्टी होऊं नको. तुम्हीं माझ्याजवळ न्याय मागितलात. मीं न्याय दिला. आतां तुझ्या काव्यांतले कांहीं श्लोक 'गीत-गोविंद' काव्यांत लिहितों मी."

देवानें आपल्या हातानें राजाचे कांहीं श्लोक 'गीत-गोविंद' काव्यांत लिहिले. राजाचें समाधान झालें.

★

## सावकाराचें धन

जयदेवस्वामींची कीर्ति दूरवर पसरली. ठिकठिकाणचे लोक त्यांच्याकडे येऊं लागले. त्यांना कीर्तनासाठीं घेऊन जाऊं लागले.

स्वामी कीर्तन करीत. हरीचे गुण गात. लोक कीर्तन ऐकून समाधान पावत. मग यजमान स्वामींना द्रव्य देत. स्वामी म्हणत,

" मला नको हें द्रव्य. "

पण लोकांना वाटे, ' स्वामींनीं द्रव्य स्वीकारावं.'

मग स्वामी त्यांच्या इच्छेला मान देत. अन् द्रव्य घेऊन तें गोरगरिबांना वांटीत. दीन-दुबळ्यांना देत.

एक सावकार होता. त्यानें मोठ्या आदरानें स्वामींना आपल्या घरीं नेलें. स्वामींचा सत्कार केला. स्वामींनीं कीर्तन केलें. भजन केलें. सर्वांचीं मनें प्रसन्न झालीं. स्वामींनीं सावकाराचा निरोप घेतला.

सावकारानें स्वामींसाठीं रथ तयार केला. त्या रथांत खूप द्रव्य ठेवलें. पण त्यानें ही गोष्ट स्वामींना कळूं दिली नाहीं. त्याला ठाऊक होतें कीं, रथांत द्रव्य आहे, असें जर स्वामींना कळलें तर ते कांहीं रथांत बसणार नाहींत. द्रव्य स्वीकारणार नाहींत.

स्वामी रथांत बसून निघाले. सावकार त्यांना वेशीपर्यंत पोहोंचवायला गेला. त्यानें स्वामींच्या रक्षणासाठीं आपला एक चाकर दिला. अन् आपण परत फिरला.

रथ पुढें चालूं लागला. कांहीं वेळानें चाकर स्वामींना म्हणाला,

"स्वामी, आज मला घरीं काम होतं. मी घरीं गेलों नाहीं तर...."

"मग तूं जा घरीं. मी जाईन एकटा रथ घेऊन. उद्यां तूं माझ्याकडे ये. अन् रथ घेऊन परत जा."

"पण—"

"पण काय? तुला कोणी बोलणार नाहीं. जा तूं."

"स्वामी, रथांत द्रव्य आहे. अन् ह्या रानांत चोरांचा फार उपद्रव आहे."

"बरं आहे! तूं कांहीं काळजी करूं नकोस. परमेश्वर करील माझं रक्षण."

स्वामींचा आशीर्वाद घेऊन नोकर निघून गेला. देवाचें स्मरण करीत स्वामी रथ चालवूं लागले. त्यांचा रथ हळू हळू वाट चालूं लागला. बाजूच्या झाडींतून दोन डोकीं बाहेर आलीं. त्यांनीं नोकराच्या दिशेला पाहिलें. नोकर आतां दिसेनासा झाला होता.

ते दोघेही रथाच्या दिशेनें धावले. थोड्याच वेळांत त्यांनीं रथ गांठला. ते रथाच्या पुढें उभे ठाकले.

स्वामींनीं रथ थाबवला. अन् विचारलें,

"कोण तुम्ही? काय पाहिजे आहे तुम्हांला?"

"आम्हांला रथ पाहिजे! रथांतलं द्रव्य पाहिजे!"

"इतकंच ना? मग घ्या! घेऊन जा रथ तुम्ही."

स्वामी रथांतून खालीं उतरले. अन् श्रीहरीचें नांव घेत ते वाट चालूं लागले. चोरांनीं रथ ताब्यांत घेतला. अन तो आपल्या घराच्या दिशेनें चालविला.

थोडा वेळ गेला नसेल तोंच चोरांच्या मनांत शंका आली कीं, "जयदेवस्वामींनीं रथ आपल्या हातीं सहज कां बरं दिला ? त्यांनीं आपल्याला ओळखलें असेल. उद्यां ते सावकाराला ही गोष्ट सांगतील. सावकार राजाला सांगेल. राजाचे दूत आपल्या मागावर येतील. आपल्याला पकडून नेतील. आपल्याला शिक्षा होईल ! मग, आतां काय करावें ? जयदेवस्वामींनाच मारून टाकलं कीं काम झालं!" त्यांनीं ठरवलं.

झालें ! ते जयदेवस्वामींच्या मागून धावत निघाले. त्यांनीं स्वामींना पकडलें. त्यांचे हात तोडले. पाय तोडले. मग त्यांना वाटलें, आतां कांहीं हे जगत नाहींत. तेव्हा स्वामींना एका कळकीच्या बेटांत टाकून ते आपल्या वाटेनें निघून गेले.

★

## चोरांना शिक्षा

कांहीं वेळ झाला. एक राजा अरण्यामध्यें शिकारीला आला होता. कळकीच्या बेटांत स्वामी 'गीत-गोविंद' म्हणत होते. देवाचें नांव घेत होते. ते सूर राजाच्या कानीं आले. तो बेटाजवळ आला. त्यानें स्वामींना पाहिलें. त्यांची ती दशा पाहून त्याला फार वाईट वाटलें. त्यानें स्वामींना आपल्या रथांत घातलें. अन् आपल्या राजवाड्यांत घेऊन गेला तो त्यांना.

राजवाड्यांत गेल्यावर राजानें वैद्याला बोलावणें पाठवलें.

स्वामींची शुश्रूषा केली. स्वामी बरे झाले. पण त्यांना हात नि पाय नव्हते.

राजा स्वामींची सेवा करी. त्यांना हवें-नको पाही. स्वामी राजाला सल्ला देत. त्याला बोध करीत. हरिकीर्तन अन् भजन तर त्यांचें नेहमींच चालू असे.

एक दिवस राजानें स्वामींना विचारलें, "स्वामी, देव कशानें प्रसन्न होईल?"

"राजन्, साधुसंतांच्या सेवेनें भगवान् प्रसन्न होतील."

अन् त्या दिवसापासून राजा साधुसंतांना बोलावी. त्यांची पूजा करी. त्यांची सेवा करी. त्यांना भोजन घाली. अन् ते परत निघाले कीं खूप द्रव्य देई त्यांना.

राजा दान देतो, धर्म करतो, ही राजाची कीर्ति सर्वत्र पसरली. ठिकठिकाणांहून साधु राजाकडे येऊं लागले.

जयदेवस्वामींना ज्या चोरांनीं मारलें होतें त्यांच्याही कानीं ही गोष्ट गेली. मग तेही साधू बनले. त्यांनीं कपाळावर त्रिपुंड्र रेखिलें. अंगाला भस्म चर्चिलें. गळयांत रुद्राक्षांच्या माळा घातल्या. अन् मग निघाले हे बोकेसंन्यासी राजाकडे.

ते राजाकडे आले. त्यांनीं स्वामींना तेथें पाहिलें. आपल्या पायांनीं वाघाच्या गुहेंत चालत आल्यासारखें वाटलें त्यांना. अन् ते घाबरले. 'अरे बापरे! कुठून आलों आपण येथें? आतां स्वामींनीं जर ओळखलं तर कांहीं आपली धडगत नाहीं. स्वामी आपल्याला ओळखणारच. आपलं मरण कांहीं आतां टळत नाहीं.

‘मग आतां करावं तरी काय? आतांच पळून जावं तर संशय येईल राजाला. आणि उद्यांचं मरण आजच ओढवेल.’

कसेबसे त्यांनीं दोन दिवस काढले. अन् मग ते परत जायला निघाले.

स्वामींनीं त्यांना ओळखलें. त्यांनीं विचार केला कीं,

‘पैशाकरितां हे आपल्या जिवावर उठले होते. आणखी किती तरी माणसें ह्यांनीं मारलीं असतील. किती तरी निरपराध जीव हे पुढें मारतील. राजाला सांगून आपण यांना अमूप द्रव्य देऊं. म्हणजे तरी त्यांचा जीव संतोषेल. लोकांचे हाल वांचतील.’

असा विचार करून स्वामी राजाला म्हणाले,

“राजा, हे दोघे साधु महापवित्र आहेत. हे परत जायला निघतील, तेव्हां यांना माझ्याकडे घेऊन ये.”

ते जेव्हां राजाचा निरोप घेण्यासाठीं आले, तेव्हां राजाला स्वामींनीं सांगितलें होतें त्याची आठवण झाली. तो त्यांना घेऊन स्वामींकडे गेला.

चोर मनांतून खूपच घाबरले. मोठ्या धैर्यानें त्यांनीं संकटाला तोंड देण्याचें ठरवलें. हो, नाहीं तरी ते दुसरें काय करूं शकणार होते!

पण संकट होतेंच कुठें? स्वामींनीं त्यांना अपार धन देण्यासाठीं राजाला सांगितलें. त्यांच्या रक्षणासाठीं सेवकहि दिले अन् त्यांना निरोप दिला.

त्यांना घेऊन सेवक निघाले. खूप दूर गेल्यावर त्यांनीं विचारलें,

" साधूजी, तुम्हांला जयदेवस्वामी ओळखतात. खूप मर्जी दिसते तुमच्यावर. कुठें आश्रम आहे तुमचा ? "

चोरांना या प्रश्नाचा खूप राग आला. एवढें द्रव्य मिळालें होतें, सात जन्मांची ददात मिटली होती. पण त्यांचा दुष्टपणा गेला नव्हता. त्यांची जात सापाची होती. ते गरळ ओकले.

" हो, जयदेव ओळखतो आम्हांला. हा पूर्वी एका दुष्ट राजाचा प्रधान होता. एकदां राजा त्याच्यावर रागावला. त्यानें त्याला मारण्याची आज्ञा दिली. त्या वेळीं आम्हीं याला वांचवलं."

त्याच क्षणीं धरणी दुभंगली. धरणीदेवीला ह्या पाप्यांचा भार सहन होईना. ते दोघेहि चोर पृथ्वीच्या पोटांत गडप झालें.

सेवकांना आश्चर्य वाटलें. ते राजाकडे परत आले. त्यांनीं सर्व द्रव्य राजापुढें ठेवलें.

" हें काय ? त्या साधूंनीं द्रव्य नाकारलं ? "

सेवकांनीं झालेला चमत्कार राजाला सांगितला. अन् म्हणाले, " महाराज ! ते साधु नव्हतें. त्यांनीं स्वामींवर शिंतोडे उडवण्याचा प्रयत्न केला. त्यानें भूदेवी कोपली. तिनं त्यांना गिळून टाकलं."

★

## परीक्षा

" देवाची इच्छा ! " जयदेवस्वामी म्हणाले. आणि नवल घडलें जयदेवस्वामींना हातपाय फुटले. सर्वजण चकित झाले.

राजाच्या आश्चर्याला सीमाच राहिली नाहीं. हें घडलें तरी कसें? त्याच्यापुढें प्रश्न पडला. राजाला विचार करतांना पाहून स्वामींनीं सर्व हकीकत राजाला सांगितली.

नंतर जयदेव राजाला म्हणाले, "राजन्, मीं माझा सर्व इतिहास तुला सांगितला. आतां मला माझ्या आश्रमांत जाण्याची परवानगी दे. पद्मावती वाट पाहात असेल. माझे विद्यार्थी वाट पाहात असतील."

"स्वामी, आपण येथें आश्रम काढा. माझ्या राज्यांतील विद्यार्थ्यांना आपल्या ज्ञानाचा लाभ मिळूं द्या, मी पद्मावती-देवींना येथें आणतों."

हो ना करता करतां स्वामींनीं राजाच्या म्हणण्याला मान्यता दिली. राजानें रथ पाठविला. पद्मा आली.

जयदेवांचा पूर्वींचा कार्यक्रम सुरू झाला. सकाळीं उठावें, गंगेचें स्नान करावें. देवाची पूजा करावी. अन मग विद्यार्थ्यांना शिकवावें.

पद्मावतीदेखील पूर्वीप्रमाणेंच जयदेवांची सेवा करी. त्याना मदत करी. आश्रमीय विद्यार्थ्यांना अडलें नडलें विचारी. अन् एवढे व्याप सांभाळून राणीकडे जाई.

थोडयाच काळांत पद्मावती सर्वांना हवी हवीशी वाटूं लागली. आपल्या गोड वागणुकीनें तिनें सर्वांना आपलेंसें करून टाकलें. राणीला तर तिच्याशिवाय चैनच पडेना.

राणीच्या पूर्वींच्या मैत्रिणींना पद्मेचा द्वेष वाटूं लागला. पूर्वी त्यांना राणीची स्तुति करून राणीकडून कांहीं तरी लुबाडायला साधे. पण आतां तें जुळेना.

एक दिवस त्यांनीं राणीजवळ विष ओकायला सुरुवात केली. त्या म्हणाल्या, 'ह्या पद्मेनें हल्लीं सर्वांना भुरळ घातली आहे. ती दिसायला सुंदर आहे. तिचा आवाज गोड आहे. पण बाई आम्हांला भीति वाटते कीं, ती महाराजांना भुरळ घालील.'

'चला, कांहीं तरीच नका बोलूं.' त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत राणी म्हणाली. तिनें विषयच बदलून टाकला. राणीच्या मैत्रिणी खट्टू होऊन निघून गेल्या.

राणीच्या आणि पद्मावतीच्या स्नेहांत तिळमात्र अंतर पडलें नाहीं. त्यांचें जाणें-येणें, बोलणें-चालणें पूर्वींसारखेंच मोकळे-पणानें चालूं होतें. परंतु राणीचें मन मात्र पूर्वींइतकें स्वच्छ राहिलें नाहीं. 'आपल्या मैत्रिणी सांगतात तें खरं तर नसेलना?' असा पुसट विचार तिच्या मनांत येऊन जाई.

अकारण पद्मावतीचे दोष शोधण्याचा राणीचें मन तिला नकळत चाळा करी.

एकदां राणीचा एक नातलग वारला. बायको त्याच्याबरोबर सती जाण्यासाठीं निघाली. सगळ्यांनीं तिची ओटी भरली.

"खरी पतिव्रता!" पद्माजवळ कुणीतरी म्हणालें.

"पतिव्रता खरी, पण श्रेष्ठ पतिव्रता ती कीं, पतीच्या मृत्यूनंतर जी क्षणही जगूं शकत नाहीं."

राणीनें हें बोलणें ऐकलें. आपल्या नात्यांतल्या बाईबद्दल पद्मानें असें बोलावें, हें मुळींच आवडलें नाहीं तिला.

ही गोष्ट डांचत राहिली राणीच्या मनांत. तिनें पद्मावतीची परीक्षा घेण्याचें मनोमन ठरविलें. फक्त संधीची ती वाट पाहात राहिली. अन् तिला लवकरच तशी संधि मिळालीही.

एकदां जयदेवस्वामी अन् राजा असे दोघे जण शिकारीला गेले होते. राणीनें तें पाहिलें. तिनें आपल्या एका नोकराला महालांत बोलावून घेतलें. त्याच्याजवळ तिनें कांहीं तरी सांगितलें आणि नंतर तो राणीनें सांगितलेल्या कामाला निघून गेला.



तो गेल्यानंतर दोन-अडीच तासांनीं राणीनें पद्मावतीला आपल्या महालांत बोलावलें. राणीच्या बोलावण्यावरून पद्मा-वती आली. नंतर त्या दोघीजणी गप्पागोष्टी करीत बसल्या.

पद्मावती येऊन थोडासा वेळ झाला नसेल, तोंच मघांचा नोकर धावऱ्या धावऱ्या धापा टाकीत तेथें येऊन उभा राहिला. तो येऊन कांहीं काल लोटला. पद्मावतीच्या व राणीच्या

तोंडाकडे पहात तो उभा राहिला. त्याला कांहीं तरी सांगायचें होतें. पण त्याच्या तोंडांतून शब्द उमटत नव्हते.

" काय रे, काय झालं ? असा गप्प कां उभा ? " राणीनें चिंतातुर मुद्रेनें प्रश्न केला.

नोकर पुन्हा घोटाळला. आपल्या हातांतील शुभ्र वस्त्राच्या घडींत घालून आणलेले कांहीं कपडे त्यानें काढले. जयदेव-स्वामींचीं वस्त्रें होतीं तीं रक्तानें माखलेलीं. ते कपडे राणीपुढें ठेवीत तो म्हणाला,

" काय सांगूं राणीसरकार ? जयदेवस्वामींवर वाघानें एकाएकीं झडप घातली. त्यांच्या संरक्षणासाठीं महाराजांनीं आणि आम्हीं सर्वांनीं प्रयत्नांची पराकाष्ठा केली, पण आमचा नाइलाज झाला. जयदेवस्वामी आपल्याला सोडून गेले."

'देवा !' पद्मावतीच्या तोंडून अस्फुट शब्द बाहेर पडले. अन् दुसऱ्याच क्षणीं पद्मावतीचा अचेतन देह धरणीवर कोसळला.

काय झालें म्हणून राणी पाहूं लागली. 'पद्मा ! पद्मा !' तिनें हांका मारल्या. पण ओ येईना. तिनें पद्माला हलवून पाहिलें. अन् तिला हलविण्यासाठीं तिच्या शरीराला हात लावतांच ती चमकली. तिचा धीर सुटला. तिनें घाईघाईनें राजवैद्याला बोलावणें पाठवलें.

राजवैद्य आले. राणीनें पद्मावतीकडे बोट दाखवलें. त्यांनीं तिची नाडी पाहिली. दुःखानें मान हलवीत ते म्हणाले, " राणीसरकार, संपलं सगळं ! "

राणीच्या डोळ्यांपुढें अंधारी आली. तिचें डोकें भ्रमण करूं लागलें. ' काय केलं हें आपण ? कुठून दुर्बुद्धि सुचली ही

आपल्याला? आतां जयदेव परत येतील. पद्मावती कुठें आहे म्हणून विचारतील. तेव्हां कोणत्या तोंडानें आपण उत्तर द्यायचं?

'आपण हें सर्व नाटक केलं, नोकराला खोटं सांगायला सांगितलं. पद्मावतीसारख्या साध्वीची मूर्खपणानें परीक्षा घ्यायला गेलों, अन् काय करून बसलों हें?'

राणीला कांहीं सुचेना. पद्मावतीजवळ ती तशीच बसून राहिली.

★

## पद्मा जिवंत झाली

थोड्याच वेळानें राजा आणि जयदेवस्वामी परत आले. अन् बघतात तों काय, वाड्यांत भीषण शांतता पसरली होती. राजानें कुणाला विचारलें, 'काय झालं रे?' तर तो फक्त राणीच्या महालाकडे बोट दाखवी.

शंकाकुल मनानें राजा राणीच्या महालांत पोहोंचला. पद्मावतीचें अचेतन शरीर पाहातांच जयदेव 'पद्मा! पद्मा!' ओरडत तिच्याजवळ गेले. तिला त्यांनीं स्पर्श केला. स्पर्श होतांच त्यांना कळून चुकलें कीं, पद्मा आपल्याला सोडून गेली. अन् ते बेशुद्ध झाले.

राजाही गोंधळून गेला. तेवढ्यांतच त्याला राणीनें केलेला सर्व बनाव समजला. 'दुष्टे!' राणीकडे पाहून तो चीत्कारला. पण राणीला शिक्षा करण्याची ही वेळ नव्हे हें त्यानें ओळखलें. जयदेवांना सावध करूं लागला तो.

जयदेवस्वामी सावध झाले. त्यांनीं विस्फारित नेत्रांनीं इकडे तिकडे पाहिलें. त्यांना उन्माद झाल्याचीं स्पष्ट लक्षणें दिसत होतीं. पद्मावतीला हातांत उचलून घेऊन ते धावत राजवाड्याबाहेर पडले.

पद्मावतीचें शेवटचें दर्शन घडावें, म्हणून राजवाड्याबाहेर लोकांची अफाट गर्दी जमली होती. स्वामी धावत येतांच आपोआप लोक दुभंगले. त्यांनीं स्वामींना वाट करून दिली. स्वामींच्या मागून तेही धावत सुटले.

धावतां धावतां स्वामी देवालयांत येऊन थांबले. पद्मावतीला त्यांनीं देवापुढें ठेवलें. आणि उन्मत्तपणें नाचत त्यांनीं ‘राधाविलास’ गाण्यास सुरुवात केली. गीताच्या लहरी-लहरीबरोबरच पद्मावतीच्या शरीरांत प्राण संचरूं लागले. जयदेवांचें गीत संपलें. पद्मावती उठून उभी राहिली.

हजारों कंठांतून जयघोष उमटला, “जय जयदेव! जय पद्मा! जय जगदीश हरे!”

★

इंद्रायणी नदी. महाराष्ट्राची सरस्वती म्हटलें आहे तिला विनोबांनीं. त्या नदीकांठचें देहू गांव. तेथें राहात असत वाल्होबा अन् त्यांची बायको कनकाई. वाल्होबा जातीनें वैश्य-कुणबी. धंदा करीत वाण्याचा.

मोठा छान चालला होत वाल्होबांचा संसार. पण आतां त्यांचें वय झालें होतें. धंदा मुलांनीं पाहावा. आपण स्वस्थ बसावें. थोडीफार देखरेख करावी अन् देवाचें नांव घ्यावें, असें वाटूं लागलें होतें त्यांना.

वाल्होबांना दोन मुलगे होते. सावजी अन् तुकाराम. वाल्होबा एक दिवस सावजीला म्हणाले,

'सावजी, तूं आतां मोठा झाला आहेस. मीहि पण थकलोंय्. तूं आतां संसार बघ. धंदा कर.'

'विठ्ठल! विठ्ठल! मला नाहीं जमणार धंदा बघायला, संसार करायला.' सावजीनें टाकलें सर्व अंगाबाहेर.

वाल्होबांना वाईट वाटलें. पण ते काय करणार? सावजीचें लक्षच नव्हतें संसाराकडे. देवाधर्माचें वेड होतें त्याला.

वाल्होबांनीं तुकारामाला बोलावलें. तुकोबाहि देवभक्त होता. पण त्यानें चटदिशीं वडिलांचें बोलणें मानलें. धंदा बघायचें ठरवलें. तुकाराम धंदा बघूं लागला. वाल्होबा देखरेख करूं लागले. तेरा वर्षांचा लहानगा तुकाराम. अन् म्हातारे वाल्होबा. छान जमलें होतें दोघांचें.

पण थोडेच दिवस लोटले नाहींत, तोंच वाल्होबा देवाघरीं निघून गेले. सतरा वर्षांचा होता तुका त्या वेळीं. सर्व भार त्याच्यावर पडला. तुकाराम धंदा पाहूं लागला.

तुकारामाचा धंदा मोठा गमतीचा. कुणीं म्हणावें, 'तुक्या, आज पैसे नाहींत.' कुणीं म्हणावें, 'तुकाराम, आज अडचण आहे.' अन् मग तुकारामाला त्यांची दया येई. तुकाराम त्यांना माल देई. पण कुणाला माल दिला त्याचें नांव ठाऊक नसे कीं गांव ठाऊक नसे.

माल खूप खपला तुकारामाचा. पण पैसे मात्र मिळेनात. धंदा नुकसानींत आला. असा काय कुठें धंदा चालतो? तुकारामाचें निघालें दिवाळें. धंदा बंद पडला.

अन् याच वेळीं (इ. स. १६३०) देशांत दुष्काळ पडला. त्या दुष्काळांत तुकारामाचे फार हाल झाले. घरीं माणसें आजारी पडलीं. त्यांना नीट औषध मिळालें नाहीं. त्याची पहिली बायको रखमाबाई अन् मुलगा देवाघरीं गेलीं. आईनें अन् वहिनीनें तीच वाट धरली. अवघें बाविसावें वर्ष होतें तुकोबाला त्या वेळीं.

तुकारामाला धक्का बसला. त्याचें मन दुःखानें करपलें. त्याला संसाराचा वीट आला. त्याचें संसारांतलें चित्त उडालें. त्याला देवाची ओढ लागली. हा तुकोबा म्हणजेच आपले 'तुकाराममहाराज'. त्यांनींच आपल्याला 'अभंग-संपत्ति' दिली.

★

## जिजाई

आतां तुकाराममहाराजांनीं संसार टाकलाच जवळ जवळ. त्यांचें लक्ष देवाकडे लागलें. त्यांना देवाशिवाय सुचत नव्हतें. विठ्ठलाशिवाय दिसत नव्हतें.

सकाळीं उठत, आंघोळ करीत अन् जाऊन बसत भंडारा डोंगरावर ग्रंथाध्ययन करीत. नामस्मरण करीत. ना जेवणाची शुद्ध, ना बायकोमुलांची आठवण.

तुकाराममहाराजांच्या बायकोचें नांव होतें जिजाई. आवली म्हणत असत तिला. तिला त्यांचा खूप राग येई. घरीं दोन मुलें होतीं ना,—महादा अन् काशी. त्यांचें नको का नीट व्हायला? महाराजांना कांहीं सांगावें, तर ते म्हणत—पांडुरंग! पांडुरंग!

मग जिजाई कातावे. वैतागे. आदळआपट करी. पण महाराज आपले शांत.

एकदां तुकोबा घरांतून बाहेर पडले. डोंगरावर जाऊन बसले. अन् तेथेंच गुंगले ते. देवाचें ध्यान करण्यांत ते घर विसरले. संसार विसरले. सगळें सगळें विसरले ते.

एक दिवस झाला. दोन दिवस झाले. पण तुकाराम-महाराज कांहीं घरीं फिरकले नाहींत. जिजाईला काळजी वाटूं लागली. तिला जेवण देखील जाईना. तिनें ठरवलें, "आपण जावें डोंगरावर. तिथें असतील ते भजन करीत बसलेले"

जिजाईनें मुलांचीं जेवणें उरकलीं. एका हातीं भाकऱ्यांची शिदोरी घेतली. दुसऱ्या हातीं पाण्याचा तांब्या घेतला. अन् निघाली डोंगरावर.

जिजाई डोंगर चढूं लागली. ऊन खूप झालेलें. पायाला चटके बसत होते. पण ती तसाच डोंगर चढत होती. इतक्यांत एक भला मोठा कांटा तिच्या पायांत बोंचला. भळदिशीं रक्त वाहूं लागलें. ती खालीं बसली! घेरी आल्यासारखें झालें तिला.

अन् त्याच वेळीं जिजाईला विठ्ठलाची मूर्ति दृष्टीसमोर दिसली. "ह्याच ह्याच विठ्यापायीं महाराज वेडे झाले. त्यांचं संसारांतलं लक्ष उडालं. घरादाराकडे दुर्लक्ष झालं."

जिजाईनें डोळे झांकले. पण विठ्ठलमूर्ति तिच्या नजरेआड होईना. तिनें मान दुसरीकडे फिरवली. पण विठूरायाची मूर्ति तिला तिकडेहि दिसूं लागली.

खूप संतापली जिजाई. काय करावें? कांहीं सुचेना तिला. हळूहळू ती मूर्ति अंतर्धान पावली. अन् त्याच वेळीं आपला पाय हातांत धरून कुणीतरी कांटा काढीत असल्याचा जिजाईला भास झाला.

जिजाईनें पाहिलें, एक म्हातारा शेतकरी तिच्या पायांतला कांटा काढीत होता. त्यानें हळूच कांटा काढला. जिजाईच्या पायावर हात फिरवला. अन् तो झाडींत दिसेनासा झाला.

कशानें कोण जाणे, जिजाईला खूप बरें वाटलें. ती उठली. शिदोरी अन् पाणी घेऊन ती पुन्हा डोंगर चढूं लागली. तुकाराममहाराजांजवळ येऊन पोहोंचली.

तुकाराममहाराजांचें जिजाईकडे लक्ष गेलें.

"आवले, कशाला आलीस तूं येथें एवढा त्रास घेऊन? मी येणारच होतों घरीं."

"म्हणे येणार होतों! पण आम्हांला कसं चैन पडावं?

विठ्यापायीं तुम्ही वेड्यासारखे बसलांत. पण मुलांचीं तोंडं सुकून गेलीं तिकडे."

जिजाईनें त्यांच्यापुढें शिदोरी ठेवली. पाण्याचा तांब्या ठेवला.

तुकाराममहाराजांचे डोळे पाण्यानें डबडबले. त्यांनीं शिदोरी सोडली अन् म्हणाले,

"आवले, तूंहि खा ना माझ्याबरोबर!"

"नको! नको! मीं खूप खाल्लंय्. पोट भरलंय् माझं."

"अस्सं! खोटं नको बोलूं. मी जेवलों नाहीं तर तुला मुळीं जेवण जायचंच नाहीं. चल कर आतां सुरुवात."

★

## काम मिळालें

एक दिवस आवली खूपच चिडली. तुकोबांना वाटलें, "आपल्या पायीं घरांत खूप त्रास होतो. आवलीला कष्ट पडतात." त्यांनीं ठरवलें कीं, 'कांहीं तरी कामधंदा करावा.' ते बाहेर पडले. काम देणार कोण? 'त्यांचं कामांत लक्ष नसायचं' हें सर्वांना ठाऊक.

पण एक शेतकरी होता. त्याला तुकाराममहाराजांची दया आली. त्याला शेतराखणीला मनुष्य पाहिजे होता. त्यानें विचार केला. 'द्यावं तुकोबाला हें काम! इथं बसेल. पांखरं वारील. गुरं हाकलील. मग करीना का बिचारा देवाचं स्मरण.'

तो तुकाराममहाराजांना भेटला. अन् म्हणाला,

"तुकोबा, काय? काम करावयाचा विचार आहे का?"

"आहे ना! पण काम देतो कोण मला?"

"मी देतों काम. माझ्या शेताची राखण करायची. दोन शेर जोंधळे देईन रोज. आहे कबूल?"

"हो, आहे कबूल."

शेतकऱ्यानें तुकाराममहाराजांना काम दिलं. ते शेतराखणे बनले. हातांत गोफण घेतली अन् बसले शेतांत जाऊन माच्यावर.

पांखरें आलीं. दाणे खाऊं लागलीं. पण तुकाराममहाराज त्यांना हाकलीनात. देवाचीं लेकरें. त्यांच्यावर कसे दगड मारायचे. लागेल कीं त्यांना. पांखरें शांतपणें दाणे खाऊं लागलीं.

गांवांत कांहीं दुष्ट लोक होते. ते तुकाराममहाराजांचा फार द्वेष करीत. कारण काय? महाराज अभंग करतात. ढोंगी लोकांवर टीका करतात. ते म्हणाले, "ठीक आहे. चांगली संधि आहे ही."

त्यांनीं पाहिलें, तुकोबा भजन करीत आहेत. अन् दिलीं गुरं सोडून शेतांत. गुरांनीं अन् पांखरांनीं धान्याचा पार फडशा पाडला.

शेतकऱ्याला ही बातमी कळली. तो धांवतच तेथें आला. त्यानें शेताची अवस्था पाहिली. कसें सोळा आणे पीक आलें होतें. पण आतां काय होतं तिथें? सगळी नासाडी केली होती गुरा-पांखरांनीं एक कणीस कांहीं धड नव्हतें. तो चिडला. त्यानें तुकोबांना शिव्या दिल्या. अन् म्हणाला,

"तुक्या, तुला काम नव्हतं म्हणून काम दिलं. तर माझी नुकसानी केलीस. तुझं घर विकून पैसे घेईन नुकसानीचे."

अन् दुसऱ्याच दिवशीं शेतकऱ्यानें झोडणी-मळणीला सुरुवात केली. धान्याचा ढीग जमला. मोजणी सुरू झाली. दरवर्षीच्या दुप्पट झाला धान्याचा ढीग.

शेतकरी वरमला. आपण तुकारामाला शिव्या दिल्या याचें त्याला वाईट वाटलें. त्यानें दरवर्षीचें धान्य ठेवून घेतलें. अन् उरलेलें धान्य गाडीवर घालून तुकारामाकडे निघाला.

दुष्ट लोक वाट बघत होते कीं, धान्य कमी भरेल. तुक्याची छान जिरेल. त्यांनीं तें धान्य पाहिलें. अन् खेटर मारल्यागत तोंडें झालीं त्यांचीं.

शेतकरी धान्य घेऊन आला. तुकाराममहाराजांच्या पायां पडला. अपशब्द बोलल्याबद्दल त्यानें त्यांची क्षमा मागितली. त्यांना सर्व हकीगत सांगितली. अन् म्हणाला,

"तुकोबा, आतां हें सर्व धान्य तुमचं. देवानं तुम्हांला दिलं आहे हें."

"देवा, पांडुरंगा! किती रे कष्ट घेतलेस तूं माझ्यासाठीं!" असें म्हणून तुकाराममहाराजांनीं तें सर्व धान्य गोरगरीबांना वांटून टाकलें.

धान्य आल्याचें जिजाईला कळलें. अन् ती बाहेर येऊन पाहते तों काय? लोकांनीं सर्व धान्य लुटून नेलें होतें.

★

## देव पावला

'देव आपल्या पाठीशीं उभा राहिला. सगळं नुकसान पंढरीरायानं भरून दिलं.' तुकोबांच्या डोळ्यांतून आंसवें

आलीं. त्यांनीं ठरवलें, 'आपण आतां भजन करायचं, कीर्तन करायचं.'

तुकाराम कीर्तन करीत. अभंग म्हणत. खूप गर्दी जमे त्यांच्या कीर्तनांना. मग इतर लोक त्यांच्या नांवानें बोटें मोडीत. त्यांच्या कीर्तनाला मुळीं कुणी बसेनाच.

झालें! ते तुकारामांचा दुःस्वास करूं लागले. त्यांनीं महाराजांचा छळ सुरू केला. पण महाराज त्यांना दाद देत ना. त्यांची शांति कांहीं ढळेना.

त्या काळीं रामेश्वर भट्ट नांवाचे एक शास्त्री होते. ते धर्माधिकारी होते. लोक त्यांचा शब्द मानीत. त्यांच्याकडे हे लोक गेले. अन् त्यांना म्हणाले,

"शास्त्रीबोवा, तुकाराम कीर्तन करतो."

"वा! छान कीर्तन करतो असं ऐकलं मीं. चांगला माणूस आहे तो."

"शास्त्रीबोवा, तसं नव्हे. तो वेद मराठींतून सांगतो. स्त्रिया-शूद्र तेथें असतात. धर्मबाह्य वागतो तो. त्यानं अभंग देखील केले आहेत."

रामेश्वरभट्ट चांगले सज्जन गृहस्थ. पण दुष्ट लोकांनीं त्यांच्या मनांत भरवून दिलें कीं, तुकाराम वाईट आहे, धर्माविरुद्ध वागतो. ते चिडले. त्यांनीं तुकोबांना बोलावणें पाठवलें.

तुकोबा रामेश्वरशास्त्र्यांकडे गेले. त्यांनीं त्यांना नमस्कार केला. अन् म्हणाले,

"मी तुकाराम! आपण बोलावलं म्हणून आलों."

"अस्सं! तूंच का कीर्तन करतोस? अभंग करतोस?"

७७४८ ... ... ...

"हो—"

"हो काय? धर्माविरुद्ध आहे हें तुझं वागणं. यापुढं तूं कीर्तन करायचं नाहीं. अभंग रचायचे नाहींत. समजलं."

"जशी आपली आज्ञा!"

"शास्त्रीबुवा, पण आधींचे अभंग–" कुणी तरी मध्येंच म्हणालें.

"हो, बरी आठवण केलीत. हें बघ, पूर्वींचे तुझे सर्व अभंग! स्वतःच्या हातांनीं ते इंद्रायणी नदींत आतांच्या आतां बुडवून टाक."

धर्मगुरूंनीं निर्णय दिला. तुकोबांना मनस्वी दुःख झालें. ते जड पावलांनीं घरीं आले. त्यांनीं थरथरत्या हातानीं वह्या उचलल्या. हृदयाशीं घट्ट धरल्या. अन् आंसवांचा अभिषेक त्यांच्यावर करीत ते इंद्रायणीच्या कांठीं गेले. पांडुरंगाचें नामस्मरण करीत त्यांनीं वह्या इंद्रायणी नदींत सोडल्या.

कुटाळांचें काम झालें. त्यांना आनंद झाला. ते नाचले. कुदले. त्यांनीं टाळ्या पिटल्या.

पण तुकोबांचें सर्वस्व हरपलें होतें. त्यांच्या पायांत शक्ति राहिली नव्हती. ते मटकन् खालीं बसले. त्यांनीं ठरवलें कीं, "अभंगांच्या वह्या गेल्या, आतां कशाला जगायचं?"

तुकोबा तेथेंच बसले. इंद्रायणीच्या तीरावर त्यांनीं उपोषण आरंभलें. देवाचा धावा मांडला.

पोटांत अन्न नाहीं कीं पाणी नाहीं. शक्ति हळूहळू जात चालली. भोवळ येऊं लागली. पण तुकोबांचा निश्चय ढळला नाहीं. याप्रमाणें तेरा दिवस गेले.



चौदावा दिवस उजाडला. पांडुरंगानें तुकोबांना दृष्टान्त दिला, "तुकोबा, तुझ्या अभंगांच्या वह्या मीं सुरक्षित ठेवल्या आहेत. त्या आतां परत घे."

तुकोबांनीं डोळे उघडून पाहिलें. अभंगांच्या वह्या पाण्यावर वर येत होत्या. तुकोबा चटदिशीं उठले.

हा चमत्कार गांवांत कळला होताच. तुकाराममहाराजांजवळ सगळा गांव इंद्रायणीकांठीं लोटला होता. त्यांपैकीं कोणीं तरी त्या वह्या त्यांच्याजवळ आणून दिल्या. अन् मग हरीच्या विठ्ठलाचा एकच गजर उठला.

इकडे काय झालें, रामेश्वरभट्ट एका विहिरींत अंघोळीसाठीं उतरले होते. पाणी अंगाला लागतांच त्यांच्या अंगाची लाही लाही होऊं लागली. कशा कशानें त्यांची आग थांबेना. ते देवाला शरण गेले. देवानें सांगितलें, "रामेश्वरा, तूं तुकारामाला शरण जा."

रामेश्वरशास्त्री धावत निघाले. लोक तुकोबांना वाजत गाजत घरीं नेत होते. त्या गर्दींत ते घुसले. तुकोबांजवळ गेले. अन् म्हणाले,

"तुकोबा, आग आग होत्येय् अंगाची. मला वांचवा."

तुकोबांनीं अभंग म्हटला. रामेश्वरशास्त्र्यांचा दाह थांबला. ते तुकारामाचे शिष्य झाले.

★

## मागणें तें मागों देवा

तुकाराममहाराजांची कीर्ति शिवछत्रपतींच्या कानीं गेली. आपल्या राज्यांत असा साधुपुरुष आहे, याचा त्यांना अभिमान वाटला. त्यांनीं मोरोपंत पेशव्यांना बोलावलें. अन् त्यांच्याबरोबर महाराजांसाठीं नजराणा पाठवला.

मोरोपंत तुकोबांच्या घरीं आले. तुकोबा बाहेर गेले होते त्या वेळीं. जिजाई पुढें आली. मोरोपंतांनीं तिच्यापुढें नजराणा ठेवला. अन् म्हणाले,

"शिव-छत्रपतींनीं भेट पाठविली आहे महाराजांसाठीं."

जिजाईनें दागदागिने पाहिले. भरजरी कपडे पाहिले. ती

हुरळली. तिनें महाद्याला बोलावलें. काशीला बोलावलें. अन् तिघेंहि छान छान कपडे ल्याली, अलंकारांनीं नटलीं.

तोच तुकाराममहाराज तेथें आले. त्यांना पाहून महाद्या धावला. अन् म्हणाला,

" बाबा, शिवाजीराजांनीं भेट पाठवली आहे ही आपल्याला."

मोरोपंत पुढें झाले. त्यांनीं तुकोबांना सर्व हकीकत सांगितली.

विठ्ठल ! विठ्ठल ! महाद्या, काशी, उतरा ते कपडे अन् दागिने. हें विष नको आपल्याला."

जिजाई, काशी अन् महाद्या सगळ्यांचा आनंद मावळला. त्यांचीं तोंडें उतरलीं. मुकाट्यानें त्यांनीं कपडे काढले, दागिने उतरले. तुकाराममहाराजांनीं तें सर्व गोळा केलें. मोरोपंतांपुढें ठेवलें अन् म्हणाले,

"पेशवे, विठ्ठल आमच्या सर्व कांहीं गरजा पुरवतो. आम्हांला सोनें काय आणि माती काय सर्व सारखंच. तुम्ही नजराणा परत न्या. राजांना म्हणावं, रागावूं नका."


★

## विठ्ठलाची कृपा

मोरोपंत शिवछत्रपतींकडे परत गेले त्यांनीं छत्रपतींना सर्व हकीकत सांगितली. शिवबांना कौतुक वाटलें. त्यांनीं ठरवलें, आपण जावं तुकाराममहाराजांच्या भेटीला.

शिवछत्रपति तुकाराममहाराजांच्या भेटीला गेले. तुकोबांची देवभक्ति पाहून त्यांना वैराग्य आलें. ते म्हणाले,

" महाराज, मी तुम्हांला शरण आलों आहें. मला आतां पैसा नको, घरदार नको, राज्य नको. कांहीं कांहीं नको मला. तुम्ही मला आपला शिष्य करा. गुरूपदेश द्या. हरीचा दास करा. "



" शिवराया, ज्यानं त्यानं आपला धर्म पाळावा. आपलं कर्तव्य करावं. त्यानंच मोक्ष मिळतो, राज्य चांगल्या प्रकारं चालवणं हें तुमचं कर्तव्य. तें तुम्हीं टाकलंत तर त्यानं काय फायदा ? रामदास तुमचे गुरु. ते योग्य सल्ला देतील तुम्हांला. "

तुकोबांनीं उपदेश केला. अन् शिवरायांनाहि पटला तो. आपली गल्लत त्यांच्या ध्यानीं आली.

रात्रीं तुकाराममहाराजांचें कीर्तन होतें. शिवबा कीर्तनासाठीं थांबले. कीर्तन ऐन रंगांत आलें अन् आवई उठली–"चाकणचा किल्लेदार शिवरायांना पकडण्यासाठीं येतो आहे."

लोकांनीं आग्रह केला, "महाराज, आपण इथून चलावं."

पण शिवराय उठेनात. तुकाराममहाराजांनीं पांडुरंगाचा धांवा केला, "विठ्ठला, सत्त्व पाहतोस का तुझ्या भक्ताचं ! पांडुरंगा, कीर्तन चालू असतांना तुझ्या भक्तावर असा प्रसंग यावा का !"

विठ्ठलमूर्तीतून प्रभा फाकली. शिवरायांची दुसरी मूर्ति प्रकटली. ती मूर्ति मंडपाबाहेर गेली. अन् थोड्याच वेळांत गिल्ला झाला, "पकडो शिवाजी को ! पकडो काफर को ! भागा ! भागा ! दौडो ! दौडो !" अन् घोड्यांच्या टापांचा आवाज दूर दूर ऐकूं येऊं लागला. ऐकूं येईनासा झाला.

शिवबा कीर्तन ऐकत होते. संकट टळलें. पांडुरंगानें भक्ताचें रक्षण केलें. कीर्तन शांतपणें पार पडलें.

तुकोबांनीं हात जोडले, अन् म्हणाले, "देवा, भक्ताची लाज राखलीस तूं."

## तुका जातो वैकुंठाला

तुकोबांची चाळिशी उलटली होती. गांवकुटाळांचीं तोंडें बंद झालीं होतीं. त्यांचे चाळे थांबले होते. तुकोबांचें कीर्तन सर्व गांव ऐके. भक्तिरसानें न्हाऊन निघे.

शके १५७३ ची फाल्गुन वद्य द्वितीया उजाडली. सोमवार होता तो. आवली काम करीत होती. तुकाराम-महाराज तिला म्हणाले,

" आवले, आज आतां मी जाणार. देवाचं बोलावणं आलं आहे मला."

" चला, कांहींतरीच नका घाणेरडं बोलूं रामप्रहरीं."

" आवले, खरंच! ती बघ हरीची मूर्ति. सांवळी, शंख-चक्रधारी."

महाराजांनीं अभंग म्हटला.

आम्ही जातों अमुच्या गांवा। अमुचा रामराम घ्यावा।
तुमची अमुची हेच भेटी। येथुनियां जन्मतुटी।
आतां असो द्यावी दया। तुमच्या लागतसें पायां।
येतां निजधामीं कोणी। विठ्ठल विठ्ठल बोला वाणी।
रामकृष्ण मुखीं बोला। तुका जातो वैकुंठाला॥

आवली न बोलतां कामाला लागली. तुकाराममहाराजांनीं सगळ्यांचा निरोप घेतला.

इंद्रायणीतीरावर ते गेले. सगळा गांव लोटला कीर्तनाला. कीर्तन संपलें. आकाशातून गरुड-विमान खालीं आलें. तुकाराममहाराजांनीं ' विठ्ठल! विठ्ठल!' म्हटलें. ते विमानांत बसले. विमान दिसेनासें झालें. लोकांचा नामगजर चालू होता.

पांडुरंग! पांडुरंग! विठ्ठल! विठ्ठल! विठ्ठल!

★

# ९ : रांका कुंभार

************

रांका कुंभार सगळ्यांना ठाऊक होता पंढरपुरांत. रांक्याचा धंदा कुंभाराचा. मडकीं तयार करायचीं. अन् विकायचीं.

पुष्कळ कुंभार होते पंढरपुरांत. पण रांक्याचा माल चांगला अन् स्वस्त. मालांत कधीं लबाडी नाहीं कीं लुच्चाई नाहीं. सचोटीचा व्यवहार होता त्याचा. खूप मडकीं खपत त्याचीं.

रांका म्हणे, "मी पांडुरंगाचं नांव घेतों. देवाचं नांव घेतों. विठ्ठलाचं भजन करतों. अन् मी खोटं बोललों, खोटा धंदा केला, तर देव नाहीं भेटणार मला."

रांका सकाळीं लवकर उठे. काम करूं लागे. हातानें काम अन् तोंडानें देवाचें नाम! असें काम चालें रांक्याचें. कधीं कंटाळा नाहीं कीं आळस नाहीं.

रांक्याच्या बायकोचें नांव होतें बांका. अन् मुलीचें नांव होतें बंका. त्याहि आपलें काम आटोपलें कीं, रांक्याला मदत करीत.

एकदां रांक्यानें कच्चीं मडकीं तयार करून ठेवलीं होतीं. तीं मडकीं भाजून पक्कीं करायचीं होतीं.

रांका काम करूं लागला. बांका अन् बंका त्याला मदत करूं लागल्या. तोंडानें देवाचें नांव घेत त्यांनीं भराभर मडकीं रचलीं.


आवा रचून झाला. पाल्या-पाचोळ्यावर रांक्यानें ठिणगी टाकली. अन् थोड्याच वेळांत विस्तव धगधगला. ज्वाला उफाळल्या.

तोंच कुठूनशी रांक्याची मांजर उडी मारून तेथें आली. तिनें इकडे तिकडे पाहिलें. अन् ती आव्याभोंवतीं घिरट्या

घालूं लागली. केविलवाण्या नजरेनें तिनें रांका-बांकाकडे पाहिलें. अन् व्याकुळ सुरानें ओरडूं लागली. म्यांव! म्यांव!

रांका समजला. त्याला आठवलें कीं, मांजरीनें एका मडक्यांत आपलीं पिलें ठेवलीं होतीं. आपण तें मडकें मुद्दाम बाजूला ठेवलें होतें. पण काम करतां करतां विसरलों. अन् तेंहि मडकें आपण इतर मडक्यांबरोबर रचलें.

पण आतां काय करणार? तें मडकें कसें काढणार? त्या पिलांचे जीव कसे वांचणार? रांक्याला काळजी लागून राहिली.



आतां पंढरीनाथानें कृपा केली तरच तीं पिलें वांचतील. आपल्यावरचं अपेश टळेल. रांक्याला वाटलें. त्यानें हात जोडले. अन् पंढरीनाथाचा धावा केला.

"हे पंढरीराया! पांडुरंगा! तूं भक्तांची लाज राखतोस.

हे देवा, मांजरीचीं पिलं वांचव. जर त्या पिलांचा जीव वांचला, तर मी संसार सोडीन, अन् तुझं नांव घेईन. ”

देवाची प्रार्थना करून रांका तेथें बसला. त्यानें ठरवलें, “ पिलें जर वांचलीं नाहींत तर आपण अन्न घ्यायचें नाहीं. पाणी घ्यायचें नाहीं. आपल्या हातून अपराध घडला आहे. आपण त्याचें प्रायश्चित्त घेतलें पाहिजे. ”

हळू हळू ज्वाला मंदावल्या. अग्नि थंडावला. रांका उठला. त्यानें भरभर मडकीं पाहिलीं. एका मडक्यांत मांजरीचीं पिलें होतीं. जिवंत होतीं तीं.

तीं पिलें रांक्यानें पाहिलीं. तो आनंदानें नाचूं लागला. बांका अन् बंका तेथेंच होत्या. त्याहि आनंदल्या. विठोबा-रायानें त्यांच्यावर कृपा केली होती. त्यांच्या हांकेला ओ दिली होती. त्यांना अपेश दिलें नव्हतें.

रांक्यानें संसार टाकला. गोरगरिबांना बोलावलें. आपलें घर त्यांच्याकडून लुटवलें. अन् सगळें देऊन टाकलें त्यांना. तो नवस बोलला होता ना ! तो त्यानें फेडला.

* * *

मग रांका घराबाहेर पडला. बांका अन् बंका त्याच्याबरोबर निघाल्या. नेसत्या वस्त्राशिवाय कांहीं घेतलें नाहीं त्यांनीं बरोबर. तीं अरण्यांत गेलीं. अन् तेथेंच राहूं लागलीं.

जंगलांत मिळतील तीं फळें खावीं. थोडीफार भिक्षा मागावी. झऱ्याचें पाणी प्यावें अन् देवाचें नांव घ्यावें, असा कार्यक्रम होता रांक्याचा.

एकदां रांक्याची मुलगी बंका पाण्यावर गेली होती. तेथें नामदेवांची मुलगी आली. आपले कपडे धुऊं लागली. कपडे

धुतां धुतां कपड्यांचें पाणी बंकाच्या अंगावर उडूं लागलें, ती म्हणाली,

"माझ्या अंगावर पाणी उडतें आहे. जरा जपून धू."

"हो हो तर! म्हणे पाणी उडतंय्! जरा बाजूला हो तूं!"

हळू हळू त्यांचें चांगलेंच भांडण जुंपलें. त्यांनीं एकमेकींच्या उखाळ्यापाखाळ्या काढल्या. त्या भांडल्या-तंडल्या. अन् शेवटीं घरीं गेल्या.

नामदेवाच्या मुलीनें ही गोष्ट नामदेवाला सांगितली. 'आपल्या मुलीला रांक्याची मुलगी बोलली!' नामदेवांना बोचलें तें.

नामदेव मंदिरांत गेले. अन् पांडुरंगाला म्हणाले, "देवा! रांका कुंभार तुझा भक्त ना?"

"होय, नामदेवा! रांका माझा भक्त आहे. विरागी आहे तो."

मग नामदेवाचें अन् पंढरीरायाचें कांहीं बोलणें झालें. पंढरीरायानें रांक्याची परीक्षा घ्यायचें ठरवलें. मग नामदेव, पंढरीराय अन् रखुमाई तिघंहि रांका रहात होता तिथें गेलीं गुप्त रूपानें.

त्या वेळीं रांका, बांका अन् बंका तिघंहि अरण्यांत लांकडें गोळा करीत होतीं. बंकानें एक लांकूड उचललें. त्या लाकडाखालीं एक सुवर्णकंकण होतें. पंढरीरायानें ठेवलें होतें तें.

बंका कंकणाकडे पाहूं लागली.

"बंका, काय ग पाहत्ये आहेस !" रांकानें विचारलें.

"बाबा ! सुवर्णकंकण पडलं आहे."

"बंका ! आपल्या भजनांत विघ्नं आणण्याचा डाव दिसतो आहे हा. त्या कंकणाकडे बघूं नको. त्या कंकणावरील लांकूड देखील घेऊं नको. चल पुढें."

बंका पुढें निघाली. पांडुरंग प्रसन्न झाले. त्यांनीं रांका, बांका अन् बंकाला दर्शन दिलें. धन्य धन्य वाटलें रांक्याला.

★

## ६ : नरहरी सोनार

******************

एक दिवस एक सावकार पंढरपुरीं आला. त्यानें विठोबाची श्यामसुंदर मूर्ति पाहिली. विटेवरील सांवळा हरी त्यानें पाहिला.

सावकाराला वाटलें, "कशी राजस अन् सुकुमार मूर्ति आहे देवाची! कसं सुंदर ध्यान आहे विठूरायाचं. आपण पंढरीनाथाला एक रत्नजडित कंबरपट्टा अर्पण करूं. शोभून दिसेल तो पंढरीरायाला. आपल्या पैशाचें सार्थक होईल."

सावकारानें पुजाऱ्याला आपली इच्छा सांगितली. अन् म्हणाला,

"पुजारीबाबा, कुणी चांगला सोनार आहे का तुमच्या ओळखीचा? कुशल अन् प्रामाणिक हवा तो."

"सावकार, तुम्ही नरहरी सोनाराकडे जा. अगदीं मनपसंत काम करील तो."

सावकारानें नरहरीचें नांव ऐकलें होतें. 'फार चांगला कारागीर आहे तो,' कुणींतरी यापूर्वी सांगितलेलें त्याला आठवलें.

सावकारानें नरहरीकडे जायचें ठरवलें. त्यानें पुजारीबाबाला विचारलें,

"पुजारीबाबा, तुम्ही नरहरीकडे येतां का?"

"हो! चला! आतांच जाऊं या आपण."

मग सावकार अन् पुजारीबाबा दोघेही नरहरीकडे गेले.

नरहरी सोनार महादेवाची पूजा करीत होता. त्याची महादेवावर परम निष्ठा होती. महादेवाची पूजा करायची. त्याचें

तीर्थ घ्यायचें. अन् मग आपल्या उद्योगाला लागावयाचें, असा नेम होता त्याचा. कधीं चुकूं दिला नाहीं आपला नेम त्यानें.

नरहरीनें त्यांना नमस्कार केला. बसण्यास सांगितलं. पुजारीबाबांनीं सावकारांची ओळख करून दिली. सावकार म्हणाले,

"नरहरी, एक रत्नजडित कंबरपट्टा करावयाचा आहे विठूरायाला. करणार ना?"

"कां नाहीं करणार सावकार? काम काय कोणाला नको असतं?"

अन् पुजारीबाबांकडे वळून म्हणाला,

"पुजारीबाबा, माझं एक काम करायचं. कमरेचं माप आणून द्यायचं तुम्ही."

"कां नरहरी, तुम्ही नाहीं जाणार?"

"सावकार, कांहीं कारणासाठीं मला जातां येत नाहीं माप घ्यायला. तुम्ही पंधरा दिवसांनीं या कंबरपट्टयासाठीं."

पुजारी हंसला. त्यानें सावकाराला चलण्याची खूण केली. त्यांनीं नरहरीचा निरोप घेतला.

* * *

पंधरा दिवसांनीं सावकार नरहरीकडे गेले. कंबरपट्टा तयार होता. सावकारांनीं कंबरपट्टा पाहिला. ते प्रसन्न झाले. नरहरीनें मापाची पट्टी अन् कंबरपट्टा सावकाराच्या हातीं दिला. बरोबर मापाचा होता कंबरपट्टा. फार कुशलतेनें केला होता तो. त्याच्या तेजानें डोळे दिपत होते. अन् मोहकतेनें मन मोहून जात होतें.

सावकार मंदिरांत गेले. ‘आपल्या हातांनीं आपण कंबरपट्टा पंढरीनाथाला चढविणार—’ त्यांना आनंद झाला. उल्लसित वृत्तीनें त्यांनीं पंढरीरायाला कंबरपट्टा बांधला.

अन् काय आश्चर्य, कंबरपट्टा पंढरीरायाच्या कंबरेला बसेना. दोन बोटें लहान पडत होता. हें काय झालें ? मोजक्या मापाचा होता कंबरपट्टा. आपण मापाच्या पट्टीला लावून पाहिला होता. बरोबर होता.

त्यांनीं पुजारीबाबांना ही हकीगत सांगितली. अन् म्हणाले,

“पुजारीबाबा रागावूं नका. पण माप घेण्यांत तर कांहीं चूक नाहीं ना झाली ?”

“सावकार, तीनदां नीट पाहून घेतलं होतं माप मीं. अगदीं बरोबर होतं.”

मग त्यांनीं दोघांनीं मिळून पुन्हां माप घेतलें. ते नरहरी सोनाराकडे गेले. त्याला सर्व गोष्ट सांगितली. अन् म्हणाले,

“नरहरी, कंबरपट्टा दोन बोटं कमी पडतो आहे. तेवढा वाढवून द्या.”

“बरं आहे!” नरहरी म्हणाला. त्यानें कंबरपट्टा ठेवून घेतला.

दुसऱ्या दिवशीं सावकार आले. नरहरीनें कंबरपट्टा त्यांच्या स्वाधीन केला. आणलेल्या मापाबरोबर सावकारांनीं पट्टा तीन तीन वेळां मोजून पाहिला. बरोबर हाता.

समाधानानें सावकार मंदिरांत गेले. त्यांनीं मूर्तीला नमस्कार कला. अन् कंबरपट्टा चढवूं लागले.

आजहि पुन्हां तोच चमत्कार झाला. कंबरपट्टा पुन्हां तोकडा पडूं लागला. सावकार गोंधळले. खिन्नहि झाले ते. त्यांना शंका

वाटूं लागली—'देवाला आपली सेवा पसंत येत नाहीं का? देव रागावला का आपल्यावर?'

त्यांनीं पुजारीबोवांना ती हकीकत सांगितली. पुजारीबोवांनीं प्रयत्न केला. पण त्याचाहि कांहीं उपयोग झाला नाहीं.

शेवटीं सावकार अन् पुजारी दोघेहि नरहरीकडे आले. त्यांना पाहून नरहरीला आश्चर्य वाटलें. सावकार म्हणाले,

" नरहरी, पुन्हां कंबरपट्टा तोकडा पडला. देवाचं काम! अर्धवट टाकून कसं चालेल? तूं चल. अन् विटोबाला कंबरपट्टा बसवून दे."

नरहरी कबूल झाला. त्यानें शिवाला वंदन केलें. अन् तो मंदिरांत निघाला. सावकार, पुजारी अन् नरहरी तिघेहि मंदिराजवळ आले.

* * *

मंदिराच्या आवारांत पाऊल टाकतांच नरहरीनें आपले डोळे बांधून घेतले. तो शंकराचा भक्त होता. शंकर त्याचें आराध्यदैवत होतें. शंकराशिवाय इतर दैवतांना मानण्याची त्याची तयारी नव्हती. अन् म्हणूनच त्यानें कंबरपट्टयाचें माप पुजाऱ्याला आणावयाला सांगितलें होतें.

नरहरीनें डोळे बांधलेले पाहून इतर लोकांना आश्चर्य वाटलें.


स्वाभाविकच होतें तें. कारण इतर लोक लांबलांबून मुद्दाम देवाच्या दर्शनासाठीं येतात. अन् हा येथें देवळांत येऊन डोळे बांधून घेतो. काय मनुष्य आहे?

पुजारी अन् सावकार दोघांनीं नरहरीला गाभाऱ्यांत नेलें. विठ्ठलमूर्तीजवळ उभें केलें. नरहरीनें कंबरपट्टा हातांत घेतला अन् तो मूर्ति चाचपूं लागला.

हळू हळू नरहरीचा चेहरा बदलूं लागला. हें कसें झालें, त्याला कोडें पडलें. भगवान् शंकराची फणीधारी मूर्ति त्याच्या हाताला भासत होती. हातांतील डमरू अन् त्रिशूळ ! मस्तका-वरील जटाभार अन् नाग! त्यानें तीन-तीनदां चाचपलें. अन् त्याच्या मनांत विचार आला,

" देवा, काय केलें हें मीं ? तुझ्याजवळ आलों अन् मूर्ख-पणानें डोळे बांधून घेतले."

त्यानें डोळ्यांवरील पट्टी दूर केली. अन् डोळे उघडून समोर पाहूं लागला. विठ्ठलाची मूर्ति त्याच्या नजरेस पडली.



'आपला घोटाळा झाला !' नरहरीला वाटलें. त्यानें पुन्हां डोळे झांकून घेतले. अन् तो परत चाचपूं लागला. अन् काय

आश्चर्य ! पुन्हां तोच चमत्कार त्याच्या अनुभवास आला. त्यानें मूर्तीवरून पुन्हां पुन्हां हात फिरविला. त्याची पुन्हां खात्री झाली कीं, महादेवाचीच मूर्ति आपण चाचपीत आहों.

नरहरीनें डोळे सोडले. अन् मूर्तीकडे पाहिलें. विठ्ठलाचीच मूर्ति होती त्याच्यासमोर. नरहरी गोंधळला. त्यानें डोळे मिटले. भगवान् शंकराचें ध्यान केलें. अन् डोळे उघडले.

विठ्ठलमूर्तीतून भगवान् शंकराची मूर्ति प्रकट होत होती.

नरहरि समजला. त्यानें देवाला साष्टांग नमस्कार घातला अन् म्हणाला.

" देवा, चुकलों मी. क्षमा करा ! तुमचींच हीं सर्व रूपं आहेत. तुमचींच हीं सर्व नांवं आहेत. मीं मात्र मनांत उगाच द्वैतभाव धरला. "

भगवंतांनीं नरहरीला हृद्दयाशीं धरलं. अन् ते गुप्त झाले. पुन्हां विठूरायाची मूर्ति तिथें शोभूं लागली.

नरहरी कंबरपट्टा बसवूं लागला. तो नीट बसला. त्याचें समाधान झालें. कंबरपट्टा नीट बसलेला पाहून सावकार आनंदला.

✶

# ७ : संत दामाजी

देवपूजा आटोपली. दामाजीपंतांनीं देवाला नैवेद्य दाखविला. निरंजन-कापूर-उदबत्ती ओवाळलीं. अन् हात जोडून देवाची प्रार्थना केली.

" हे जगन्नाथा, तुझ्या कृपेनें सर्व लोक निरोगी असूं देत. सर्व लोक सुखी होऊं देत. त्यांचें सदैव कल्याण होऊं दे."

प्रार्थना संपली. दामाजीपंतांनीं देव देव्हाऱ्यांत ठेवले. अन् विष्णुसहस्रनाम म्हणत ते देवघराबाहेर आले.

" महाराज कोणीतरी ब्राह्मण आपली वाट पाहात बसले आहेत. आपल्याला ते भेटूं इच्छितात." नोकरानें वर्दी दिली.

" जा, घेऊन ये त्यांना."

नोकर बाहेर गेला. ब्राह्मणाला घेऊन परत आला.

दामाजीपंत मंगळवेढ्याचे सुभेदार होते. अधिकार त्यांच्या हातीं होता. लक्ष्मीची त्यांच्यावर कृपा होती. अन् तरीहि ते मनाचे मोठे उदार होते. सदोदित लोकांच्या उपयोगीं पडत.

कितीतरी लोक दामाजीपंतांकडे येत. त्यांच्याजवळून कामें करून घेत. त्यांच्याजवळ कांहींतरी याचना करीत. दामाजी कोणालाच विन्मुख पाठवीत नसत.

हा ब्राह्मण दामाजींच्या तोंडओळखीचा होता. पण त्यानें दामाजींकडे कधींहि याचना केली नव्हती. त्यांच्याकडे तो सहसा येतहि नसे. मोठा सच्छील होता तो.

ब्राह्मणानें दामाजीपंतांना नमस्कार केला.

पंतांनीं ब्राह्मणाचा नमस्कार स्वीकारला, अन् ते म्हणाले, “पंढरपुराहून आलांत ना आपण? खूप दमलेले दिसतां, एवढ्या लांबचा आठ-नऊ मैलांचा प्रवास पायींच केलात, होय ना?”

ब्राह्मणानें मान डोलावली.

“मग आपण असं करूं या. जेवण तयार आहे. अगोदर आपलीं जेवणें उरकून घेऊं. अन् नंतर स्वस्थपणें बोलूं. फार घाई नाहीं ना तुम्हांला?”

“ नाहीं. ”

“ तुमचं स्नान उरकून घ्या. तोंवर सर्व तयारी होईल.” दामाजीपंतांनीं नोकराला बोलावलें. ‘ब्राह्मणाच्या स्नानाची तयारी कर’ म्हणून त्याला सांगितलें. नोकर ब्राह्मणाला घेऊन गेला. ब्राह्मणानें आपलें स्नान उरकलें, आणि तो परत आला.

पानें मांडलीं होतीं. दामाजीपंत ब्राह्मणाची वाटच पाहात होते, त्यांनीं त्याला आंत नेलें. आपल्या शेजारीं बसवलें,

सर्वजण पानावर बसले. रुक्मिणीबाईनीं पानें वाढलीं पुरोहितानें संकल्प सांगितला. पानें प्रोक्षण केलीं. अन् मग अन्नाहुती घालून, प्राणाहुती घेऊन सर्वजण जेवायला बसले.

जेवणें सुरू झालीं. “सावकाश होऊं द्या जेवण.” दामाजीपंतांनीं सर्वांना सांगितलें. अन् त्याच वेळीं त्यांची नजर ब्राह्मणाच्या पानाकडे गेली.

अरे! त्याच्या पानांतील सर्व अन्न शिल्लक होतें! अन् जेवणाकडे त्याचें लक्ष लक्षहि नव्हतें!

“ कां? जेवत कां नाहीं तुम्ही?” दामाजींनीं विचारलें.

ब्राह्मण ओशाळला. कांहींहि उत्तर न देतां तो जेवूं लागला. दोन-चार घास त्यानें घेतले, आणि मग काय झालें कोणास

ठाऊक, एकाएकीं त्याचे डोळे पाझरूं लागले.

भर पंक्तींत त्या ब्राह्मणाला रडतांना पाहून दामाजींना फार वाईट वाटलें. ' आपलं कांहीं चुकलं तर नाहीं ना ? ' अशी शंका त्यांच्या मनाला चाटून गेली.

" काय झालं तुम्हांला ? माझं कांहींचुकलं तर नाहीं ना ? कोणतं दुःख तुम्हांला बोचतं आहे ?

दामाजींच्या प्रश्नांतील ओलावा जाणवून ब्राह्मणालाच जोराचा उमाळा आला. दामाजी तर गोंधळून गेले. कोणाला कांहीं सुचेना. जरा वेळानें ब्राह्मणानें आपले डोळे पुसले अन् तो दामाजींना म्हणाला,

"सुभेदार, रागावूं नका, मी मूर्ख. तुमच्या सर्वांच्या जेवणाचा मी गोंधळ केला. पण मी तरी काय करूं ? पानावर बसलों आणि सारखी टोचणी लागून राहिली मनाला, ' मी जेवतों आहें, पण घरीं बायको उपाशी आहे. मुलं उपाशी आहेत. गेल्या चार दिवसांत त्यांच्या पोटांत अन्नाचा कण नाहीं. "

" काय म्हणतां तुम्हीं ? "

" होय सुभेदार ! पंढरपूरला दुष्काळानं नुसतं थैमान घातलं आहे. घरून बाहेर पडलों तो काहीं तरी अन्न आणीन म्हणूनच"

दामाजींनीं ब्राह्मणाचें सांत्वन केलें. सर्वांचीं जेवणें उरकलीं. ब्राह्मणाला घरीं जाण्याची घाई होती. दामाजींनीं एक गोण धान्य एका बैलाच्या पाठीवर घातलें, एक नोकर त्याच्याबरोबर दिला.

ब्राह्मणानें दामाजीपंतांना आशीर्वाद दिला अन् त्यांचा निरोप घेऊन ब्राह्मण पंढरपुराकडे निघाला.

मंगळवेढ्याची हद्द सोडून तो ब्राह्मण थोडासा पुढें गेला. तोंच किती तरी लोक त्याच्या भोवतीं गोळा झाले. त्याच्याजवळ धान्य होतें. अन लोक भुकेले होते. ब्राह्मण भांबावून त्यांच्याकडे पाहूं लागला. अन् तो पाहात असतांनाच त्या लोकांनीं सर्व धान्य लुटून नेलें.

बिचारा ब्राह्मण! रडत रडत तो दामाजींकडे परत निघाला. त्यानें कुठून धान्य आणलें म्हणून त्याच्याबरोबर इतरहि लोक निघाले.

★

## बादशहाचीं कोठारें

ते सर्वजण दामाजीपंतांच्या वाड्याजवळ आले. कसला गलबला होतो आहे, तें पाहण्यासाठीं दामाजीपंत बाहेर आले.

ब्राह्मण पुढें झाला. डोळ्यांतून पाझरणारे अश्रु पुशीत पुशीत त्यानें दामाजीपंतांना सर्व हकीकत सांगितली.

" सुभेदार, आम्हांला धान्य द्या. आमचे प्राण वांचवा. "

इतरांनींहि विनवणी केली. दामाजींपंतांनीं घरांतलें सर्व धान्य त्यांना वांटून दिलें.

लोकांनीं धान्य घेतलें. दामाजीपंतांना दुवा दिला अन् ते निघून गेले.

सुभेदार धान्य वांटतात ही बातमी कळली मात्र. लोकांच्या झुंडीच्या झुंडी सुभेदारांच्या वाड्यापुढें जमल्या. घरांतलें सर्व धान्य वांटून संपलें. पण लोकांची रीघ कमी होईना.

आतां काय करावें ? ह्यांचें समाधान कसें करावें ? अन् यांना तसेंच उपाशी तरी कसें राहूं द्यावें ? " दामाजींच्या पुढें प्रश्न उभा राहिला. ते विचार करूं लागले. विचार करतां करतां

एक कल्पना त्यांच्या मनांत चमकली. ते तसेच रुक्मिणीमाईजवळ गेले अन् म्हणाले, " बादशहाचीं धान्याचीं दोन मोठीं कोठारं भरलेलीं आहेत. आपण तीं कोठारं उघडूं. गोरगरीबांना—या भुकलेल्यांना अन्न देऊं."

" पण बादशहाला कळलं तर ? "

" कळलं तर ? तो फार तर काय करील ? जिवें मारील. पण आपलं जिणं देवाकरणीं लागेल. आपण कांहीं चोरी करीत नाहीं. लबाडी करीत नाहीं. लोकांचे जीव वांचावे म्हणून आपण धान्य वांटणार आहों. भुकेनें तडफडणाऱ्या जिवांना अन्नाहुती देणार आहों. अन् त्यासाठीं आपल्याला मरण आलं तरी सुद्धां तें भूषणावह आहे. आणि माझी खात्री आहे कीं, तसं कांहीं होणार नाहीं. दीनांचा दयाळू आपल्याला कांहीं विसरणार नाहीं. "

रुक्मिणीमाईनीं अनुमति दिली. दामाजीपंत बाहेर आले. त्यांनीं सरकारी धान्याचीं कोठारें उघडलीं. सर्वांना धान्य दिलें. त्यांचे आत्मे शांत झाले. त्यांनीं दामाजींना आशीर्वाद दिले.

★

## दामाजींना पकडून आणा

दामाजींच्या पदरीं एक मुजुमदार होता. अगदीं वाईट मनुष्य होता तो. दुसऱ्याचें वाईट झालें कीं, त्याचें मन सुखावे. त्याला आनंद होई.

दामाजींनीं धान्य वांटलेलें त्यानें पाहिलें. त्यानें विचार केला, " दामाजींनीं सरकारी कोठारें लुटवलीं. आतां आपण

बादशहाला पत्र लिहूं. बादशहा दामाजींना शिक्षा करील. आपल्याला बक्षीसहि पण मिळेल."

झालें! त्याच्या मनांत आलें मात्र, लगेच त्यानें पत्र लिहिलें देखील.

"दामाजींनीं सरकारी कोठारं लुटवलीं. मी आपली आज्ञा घ्या म्हणून सांगत होतों. पण त्यांनीं कांहीं माझं ऐकलं नाहीं. वरिष्ठांविरुद्ध तक्रार करूं नये. पण काय करणार? हुजूरांचं नुकसान पहावत नाहीं!"

पत्र बादशहाला मिळालें. तो रागावला. त्यानें लगेच शिपायांना आज्ञा केली, "जा! दामाजीला असेल तसा पकडून आणा."

शिपाई निघाले. मंगळवेढ्याला आले. दामाजीपंत देवपूजा करीत होते. नोकरानें शिपाई आल्याची त्यांना वर्दी दिली.

"त्यांना देवपूजा होईपर्यंत थांबायला सांग." दामाजी म्हणाले.

नोकरानें शिपायांना दामाजींचा निरोप सांगितला. शिपाई थांबले. गांवांत आल्यावर त्यांना खरी हकीकत कळली होती. त्यांना वाटत होतें, दामाजींना न नेतां त्या चहाडखोर मुजुमदारालाच पकडून न्यावें.

पण दामाजींनीं गुन्हा केला होता. बादशहाचा 'त्यांनाच पकडून आणा' म्हणून हुकूम होता.

दामाजीपंत बाहेर आले. त्यांनीं रुक्मिणीमाईचा निरोप घेतला. एवढा वेळ माईनीं मन आवरून धरलें होतें, पण आतां मात्र त्यांचा धीर सुटला. रुक्मिणीबाई रडूं लागल्या! आतां येथून जाणार. ते पुन्हां कांहीं येणार नाहींत हें त्यांना

पक्कें समजून चुकलें होतें. मोठ्या कष्टानें दामाजींनीं त्यांची समजूत घातली. अन् ते शिपायांबरोबर निघाले.

दामाजींना घेऊन शिपाई बेदरला निघाले. वाटेंत पंढरपूर लागलें. "देवाचें दर्शन घेऊं का ?" दामाजींनीं विचारलें.

शिपाई काय अशा देवमाणसाला 'नको दर्शन घेऊं' म्हणून सांगणार ?

दामाजी देवळांत गेले. त्यांनीं विठूरायाला नमस्कार घातला. रखुमाईला नमस्कार घातला, अन् म्हणाले, "विठ्ठला, ही तुझी ह्या लोकींची शेवटची भेट ना ? देवा, परलोकीं तरी तुझ्या चरणांपासून अंतर देऊं नको."

दामाजीपंतांनीं डोळे भरून ती विटेवरील विठूरायाची सांवळी मूर्ति पाहून घेतली, पण त्यांची तृप्ति होईना. त्यांनीं मन आवरलं. विठ्ठल-रखुमाईला नमस्कार केला. गरुड-हनुमंताला नमस्कार केला.

नंतर ते बाहेर आले आणि शिपायांना म्हणाले, 'चला !'

★

## विठू महार

बादशहा दरबारांत बसला होता. एक माणूस दरबारांत आला. त्याच्या हातांत काठी होती. खांद्यावर घोंगडी होती. नेसूं होती साधी लंगोटी. अन् पाठीवर कसलीशी पिशवी होती.

तो एकदम दरबारांत आला कसा ? पहारेकऱ्यांनीं त्याला दरबारांत कसें शिरूं दिलें ? आश्चर्यच होतें तें !

तो मनुष्य बादशहासमोर गेला. त्यानें बादशहाला राम राम केला. आणि म्हणाला,

"राम राम, मी दामाजी सुभेदारांचा नोकर. वि. महार! सुभेदारांनीं पत्र दिलं आहे आपल्यासाठीं."

त्यानें पत्राची थैली बादशहापुढें टाकली. बादशहाला राग आला. 'अस्सं! एकूण हा दामाजी एवढा उद्दाम झाला आहे तर! आमच्या शिपायांबरोबर न येतां पत्र पाठवतो काय! चांगलीच शिक्षा केली पाहिजे त्याला.' त्यानें विचार केला.

आतां बादशहा आपल्या शिपायांना कांहीं आज्ञा करणार तोंच त्याची नजर विठूच्या नजरेला भिडली. बादशहा चमकला. त्या नजरेंत कांहीं तरी जादू होती. आगळें तेज होतें.



बादशहाचे विचार मनांतच विरले. त्यानें थैलीची मोहर फोडली. लखोटा बाहेर काढून वाचला—

"सुभ्यांत दुष्काळ पडला होता. लोक भुकेनें मरत होते. सरकारी-कोठारांतलें धान्य एक रुपया पायलीप्रमाणें विकलें. लोकांना धान्य दिलें नसतें तर हुजुरांना अपेश दिलें असतें लोकांनीं. धान्याची रक्कम विठू महाराबरोबर पाठविली आहे. रक्कम मोजून पावती देण्याची कृपा व्हावी."

बादशहाचें पत्र वाचून झालें. विठूनें पाठीवरील पिशवी उतरली. तिचें तोंड मोकळें केलें. अन् खळखळा मोहरा जमिनीवर पडूं लागल्या. मोहरांच्या ढिगावर सर्वांच्या नजरा खिळून राहिल्या.

वझीर उठला. खजिनदार उठले. मोहरा मोजतां मोजतां त्यांचे हात दुखले. त्यांनीं पावती तयार केली. बादशहानें शिक्कामोर्तब केलें.

बादशहाजवळून पावती घेऊन विठू महार दरबारांतून निघून गेला.

बादशहाला फार वाईट वाटलें. दामाजीसारख्या प्रामाणिक आणि सज्जन मनुष्यावर आपण उगाचच आळ घेतला ह्याचें त्याला दुःख झालें.

पण बादशहाला राग आला तो मुजुमदाराचा. त्यानेंच दामाजींना अन् आपल्याला एवढा त्रास दिला. त्याला शिक्षा दिलीच पाहिजे असा त्यानें विचार केला. शिपायांना आज्ञा दिली.

"जा, दामाजींना सोडून द्या. त्यांना घरीं पोंचवा. आणि मुजुमदाराला पकडून आणा."

बादशहाचा निरोप घेऊन शिपाई निघाले. त्याच्या निरोपा-प्रमाणें शिपायांनीं दामाजींना सन्मानानें घरीं पोहोंचविलें.

दामाजींना घरीं परत आलेले पाहून सर्वांना आनंद झाला. रुक्मिणीबाईंचा आनंद तर गगनांतहि मावेना.

बादशहानें आपल्याला का सोडलें, हें प्रथम दामाजींना मुळीं कळेनाच. त्यांनीं शिपायांना विचारलें. तेव्हां त्यांनीं सांगितलें. "विठू महाराबरोबर पाठविलेल्या मोहरा बादशहांना मिळाल्या. त्यांचा गैरसमज दूर झाला. अन लगेच त्यांनीं तुम्हांला सोडून देण्याची आज्ञा देऊन आम्हांला पाठवलं."

हा विठू महार कोण? त्याला पैसे कुणी दिले? हें गूढ दामाजींना उकलेना. अन् ह्याच गूढ समस्येचा विचार करीत त्यांनीं आपलें स्नान उरकलें. नंतर ते देवघरांत गेले. त्यांनीं पठणासाठीं पोथी उघडली.

पोथीच्या पहिल्याच पानावर रकम मिळाल्याची पावती होती, गूढ उकललें.

दामाजींनीं देवाच्या पायीं डोकें ठेवलें. अन् म्हणाले, "देवा पंढरीराया, माझ्यासाठीं महार झालास ना रे!"

★

नरसीला चौदावें संपून पंधरावें वर्ष लागलें. पण नरसीच्या स्वभावांत मुळींच बदल झाला नव्हता. पूर्वींइतकाच हूड अन् उनाड होता तो अजून. त्याच्या हट्टी आणि हेकट स्वभावांत मुळींच फरक पडला नव्हता.

नरसीचे आईवडील वारले, त्यावेळीं नरसी अगदीं लहान होता. कांहीं कळत नव्हतें त्याला. पोरक्या नरसीचा सर्व भार त्याच्या चुलत भावानें घेतला. त्याच्यावर प्रेमाची पांखर घातली. त्याला आई-वडिलांची आठवण देखील होऊं दिली नाहीं.

दादाच्या नरसीचे खूप लाड झाले. त्याला कोणाच धाक राहिला नाहीं. बरें, कुणी बोललें तरी दादा नरसीचीच बाजू घेई अन् मग तर नरसीला चेव येई. सबंध दिवस गांवभर मित्र घेऊन तो धिंगाणा घाली, हुदडे, आपली कुणी चहाडी केली असेल त्याचें नुकसान करी. अन् मग जेवायची वेळ झाली कीं घरीं येऊन जेवे. अन् मग झोपे.

नरसीची वहिनी रागावे, कातावे. नरसीच्या दादाजवळ त्याच्या तक्रारी करी.

" तुम्हीं नरसीला लाडावून ठेवलंत आहां. तो कुणाच कांहीं ऐकत नाहीं. कांहीं काम-धंदा करीत नाहीं तो. "

" तो लहान आहे अजून. थोडा मोठा झाला कीं, त्याला शहाणपण येईल. तो स्वाभाविकपणें ताळ्यावर येईल. आणि तूं तरी काय त्याला कमी चढवून ठेवला आहेस. "

मग काय करणार ? नरसीची वहिनी गप्प बसे. भावा-भावांचें प्रेम तिला ठाऊक होतें. अन् तिलाहि पण नरसीची ओढ होती.

एकदां काय झालें—वहिनीचें डोकें दुखत होतें. वहिनीनें नरसीला सांगितलें, " भावोजी, वैद्याकडून औषध घेऊन या."

'हूं' म्हणून नरसी घरांतून बाहेर पडला. आणि मित्र-मंडळ गोळा करून आपल्या खेळांत दंग झाला.

वहिनी वाट पाहून पाहून थकली. पण नरसीचा कांहीं पत्ता नाहीं. बिचारी स्वतःच वैद्याकडे गेली. औषध घेऊन आली. अन् स्वयंपाकाला लागली. काम करतां करतां ती अगदीं थकून गेली. आणि मग मात्र खूपच चिडली ती नरसीवर.

अन् नेमका याच वेळीं नरसी घरांत आला. अन् म्हणाला, " वहिनी पान वाढ लवकर ! भूक लागयलीय् मला !"

" अस्सं ! तुमचीं पानं वाढा. मग घरीं कशाला येतां ? इकडे वहिनी मेली कीं जगली तरी तुम्हांला त्याची पर्वा नाहीं. मित्र गोळा करून तुमचे खेळ चालू द्यात. भावानं मिळवायचं आणि तुम्हीं खायचं. त्यापेक्षां आणखी थोडा वेळ बाहेर काढावा. भीक मागावी आणि गिळावं. "

वहिनी मधून मधून नरसीला बोलत असे. पण इतकें टाकून ती कधींच बोलली नव्हती. नरसीला तें बोलणं फार लागलें. त्यानें मान खालीं घातली. आणि तो मुकाट्यानें घराबाहेर पडला.

नरसी घरांतून बाहेर पडला. त्याला आपल्या चुकीची जाणीव झाली होती. त्याला पश्चात्ताप झाला. कांहीं तरी करून दाखविल्याशिवाय घरीं जायचें नाहीं असें त्यानें मनाशीं ठरवलं.

पण मग जायचें तरी कुठें? त्याच्यापुढें प्रश्न उभा राहिला. मित्रांकडे जायचं? छे! त्याच्यांत कांहीं अर्थ नव्हता. त्याला आठवण झाली कीं, येथून खूप लांब असलेल्या जंगलांत एक शिवालय आहे. आपण त्या शिवालयांत जाऊं. देवाची भक्ति करूं. त्याची सेवा करूं. आपण देवाला प्रसन्न करून घेऊं.

नरसी शिवालयाकडे निघाला. घरची ओढ मागें खेचीत होती. मित्र परत बोलावीत होते. पण त्याचा निश्चय अटळ होता. त्यानें मागें वळून देखील पाहिलें नाहीं. वाटेंत झाडांचीं फळें खावीं. झऱ्याचें-नदीचें पाणी प्यावें. थोडी विश्रांति घ्यावी. अन् पुढें चालूं लागावें.

याप्रमाणें मार्ग आक्रमीत नरसी देवालयाजवळ येऊन पोहोंचला. देवालयांत जाऊन त्यानें शिवाला वंदन केलें. तेव्हां संध्याकाळ झाली होती, तो देवालयांत झोपीं गेला.

दुसऱ्या दिवशीं नरसी पहाटे उठला. त्यानें प्रातर्विधि उरकले. नंतर स्नान करून त्यानें मंदिर स्वच्छ झाडलें. देवाची पूजा केली आणि त्याला येत असलेलीं स्तोत्रें, आरत्या म्हणत तो महादेवासमोर बसून राहिला.

दुपारीं तो रानांत गेला. त्यानें फळें आणलीं. त्यांचा देवाला नैवेद्य दाखविला. तो प्रसाद त्यानें खाल्ला आणि पुन्हां देवाच्या उपासनेला आरंभ केला. त्याची प्रार्थना संपली तीं तो झोपला तेव्हां.

★

## श्रीकृष्ण-दर्शन

याप्रमाणें कांहीं दिवस गेले. एक दिवस एक बैरागी तेथें आला. धिप्पाड अन् तेजस्वी. त्यानें नरसीला विचारलें, "कोण रे तूं? आणि येथें काय करतो आहेस?"

नरसीनें आपली सर्व हकीकत बैराग्याला सांगितली. त्यानें कांहीं सुद्धां लपवून ठेवलें नाहीं.

बैरागी हसला. अन् म्हणाला, “ छान ! नरसी, तुला मोठा मनुष्य व्हायचंय् तर? पण त्यासाठीं खूप प्रयत्न करावे लागतात. नुसतं आळशासारखं बसून नाहीं देव प्रसन्न होत. मोठं होण्यासाठीं अभ्यास करावा लागतो.”

“ हो बुवाजी, मी करीन अभ्यास. पण मला शिकवणार कोण ? तुम्ही शिकवाल मला ? ”

बैरागी पुन्हां हसला. त्यानें नरसीला शिकवण्याचें कबूल केलें.

नरसीचा अभ्यास सुरू झाला. अगदीं मन लावून त्यानें अभ्यास केला. बुवाजींनीं शिकवावें, अन् नरसीनें तें आत्मसात् करावें. अगदीं थोड्या अवधींत नरसी पंडित झाला.

एक दिवस बुवा त्याला घेऊन गाभाऱ्यांत गेले. अन् एकदम दिसेनासे झाले. नरसी चकित झाला. बुवाजी गेले तरी कोठे ? त्याच्यापुढें प्रश्न पडला.

डोळे विस्फारून तो इकडे तिकडे पाहूं लागला. भगवान् शंकराची त्रिशूलधारी मूर्ति त्याच्यापुढें उभी होती. नरसीनें भगवंतांना वंदन केलें. त्यांनीं नरसीला हृदयाशीं धरलें. अन् विचारलें,

“ नरसी, काय इच्छा आहे तुझी ? ”


भगवंताच्या दर्शनानें नरसी वेडावला. तो कांहींच बोलेना. भगवंतांनीं नरसीच्या मस्तकावर हात ठेवला.

नरसी सावध झाला. अन् म्हणाला, “भगवन्, आपणाला जी गोष्ट प्रिय असेल ती आपण मला द्यावी.”

नरसीच्या चतुराईनें भगवान् प्रसन्न झाले. त्यांनीं त्याला

२०५९६

श्रीकृष्णपरमात्म्याचें दर्शन घडविलें. अन् आपण अंतर्धान पावले.
श्रीकृष्ण-श्रीशंकरांच्या दर्शनानें नरसी समाधान पावली.



श्रीकृष्णलीलांनीं त्याचें मन मोहून गेलें. अन् दुसऱ्या दिवशीं देवपूजा करतांना, त्याच्या मुखीं देवी सरस्वती प्रकटली. नरसीच्या कृष्णलीला—'रासमंडळ'—फार प्रसिद्ध आहेत. आतां देवपूजा करतांना नरसी स्तोत्रें म्हणे, आरत्या म्हणे रासमंडळहि म्हणे.

देवालयाच्या जवळच एक तळें होतें. अन् सभोंवार खूप मोठें कुरणहि पण होतें. तेथें एकदां गुराखी गुरें चारायला आले होते. त्यांनीं नरसीचें गायन ऐकलें. त्यांना आनंद झाला. त्यांनीं आपल्या मित्रांना ही बातमी सांगितली.

हळू हळू ती गोष्ट सर्वत्र फैलावली. अन् एक दिवस नरसी-च्या भावाला कळलें कीं, जंगलांतल्या शिवालयांत आपला नरसी देवाचें कीर्तन करतो.

नरसी घरांतून निघून गेला. वहिनीनें त्याची वाट पाहिली. पण तो कांहीं परत आला नाहीं. तिचें तोंड उतरलें. नरसीचा दादा घरीं आल्यावर तिनें सर्व गोष्ट त्याच्या कानीं घातली.

दादा-वहिनींनीं सर्वत्र खूप तपास केला. पण व्यर्थ! कुठें कुठेंहि नरसीचा पत्ता लागला नाहीं. तीं दोघं दुःखी झालीं अन् नरसीची वाट पाहूं लागलीं.

आज त्यांना नरसीचा पत्ता लागला. त्यांचें मन आनंदानें फुललें. तीं लगेच शिवालयांत गेलीं. त्यांनीं नरसीला परत घरीं आणलें.

नरसी गांवांत आला. हरि-कीर्तन करूं लागला. त्याच्या कीर्तनांना सगळा गांव येऊं लागला. त्याची सर्वत्र वाहवा होऊं लागली. दादा-वहिनींना आकाश ठेंगणें झालें. नरसीला एक मुलगी सांगून आली. दादा-वहिनींनीं मुलगी पाहिली. चांगली सुरेख अन् कुलीन मुलगी. पसंत पडली त्यांना. अन् मग एका सुमुहूर्तावर नरसीचें लग्न झालें.

'नरसीचं लग्न झाल्यावर तरी नरसी संसारांत लक्ष घालील, असें दादा-वहिनींना वाटत होतें. पण ती आशा व्यर्थ ठरली. नरसीचा देव सुटेना. त्याचें संसारांत लक्ष लागेना.'

नरसीला दोन मुलें झालीं. एक मुलगा न् एक मुलगी. मोठीं गुणी अन् सुरेख मुलें होतीं. तीं नरसीचीं फार फार लाडकीं होतीं. पण तरीहि सर्वांपेक्षां नरसीला हरि-कीर्तनच प्रिय होतें.

★

सांवता'ला नमस्कार केला. अन् म्हणाले, " द्वारकाधीशा, भक्ताची लाज तूंच राखलीस बरं."

★

## तो. विळा सांवता

नरसींच्या साधुवृत्तीची लोक स्तुति करूं लागले. त्यांना सान्मान देऊं लागले. पण सगळ्यांनाच कुठें चांगल्या गोष्टींची आवड असते ?

गांवांत कांहीं कुटाळ लोक होते. त्यांचा आपला एकच धंदा होता. तो म्हणजे कुणाला तरी नांवें ठेवायचीं. कुणाची तरी चेष्टा करायची. सदोदित कुटाळक्या करायच्या. अन् त्यांतच आनंद मानायचा.

एकदां ते कुटाळ लोक असेच बसले होते. इतक्यांत एक द्वारकेचा यात्रेकरू त्यांच्याकडे आला. अन् म्हणाला.

मी द्वारकेला जातों आहें. प्रवासांत चोरांचीं भीति असते. माझ्याजवळचे पैसे मी येथें कोणा सावकाराजवळ ठेवीन. अन् त्यानें मला द्वारकेची हुंडी द्यावी, म्हणजे मी तेथें पैसे घेईन."

लोकांनीं विचार केला. आपण गंमत करूं या. ते म्हणाले, " गांवांत नरसी नांवाचा मोठा सावकार आहे; तुम्हीं त्याच्याकडे जा. तो तुम्हांला त्याच्या द्वारकेच्या पेढीवर हुंडी देईल."

बिचाऱ्या यात्रिकरूला त्यांचें सांगणें खरेंच वाटलें. त्या लोकांनीं दिलेल्या पत्त्याप्रमाणें तो नरसींच्या घरीं गेला. त्यानें नरसींना सर्व हकीकत सांगितली. अन् म्हणाला, " नरसीशेट, देतांना द्वारकेच्या पेढीवर हुंडी ?"

नरसींनीं ओळखलें कीं, कुटाळ लोकांनीं आपली फजिती

व्हावी म्हणून हें कारस्थान रचलें आहे. त्यांनीं यात्रेकरू-जवळून सातशें रुपये घेतले. हुंडी लिहिली—

" द्वारकाधीशा, या यात्रेकरूजवळून सातशें रुपये घेतले आहेत. भक्तवत्सला, तूं त्याचे पैसे त्याला दे. भक्तांचं सर्वस्व तूंच नव्हे का? तुझ्याशिवाय आम्ही कुणाला शरण जाणार?"

अन् ती हुंडी पाकिटांत बंद करून वर पत्ता लिहिला, ' सांवळा सांवता, द्वारका. '

हुंडी घेऊन यात्रेकरू निघाला. जातांना त्याला कुटाळ लोकांनीं विचारलें, "मिळाली हुंडी?" त्यानें हुंडी दाखविली आणि तो निघून गेला.

नरसींनीं ते सर्व पैसे गोरगरिबांना वांटून टाकले. तें कुटाळांनीं पाहिलें. अन् म्हणाले, " आतां यात्रेकरूला कांहीं पैसे परत मिळणार नाहींत मग तो राजाकडे फिर्याद करील. आणि आपल्याला गंमत पाहायला मिळेल.

यात्रेकरू द्वारकेला पोहोंचला. त्यानें ' सांवळा सांवता ' सावकाराचा खूप तपास केला. पण ' सांवळा सांवता ' सावकार कोणालाच ठाऊक नव्हता.

' असं! एकूण त्या नरसीनं मला फसवलं तर? आतां त्याच्याविरुद्ध मी फिर्यादच करतों राजाकडे—' असा विचार करून तो राजाकडे निघाला.

वाटेंत त्याला एक मनुष्य भेटला. ते दोघे बरोबर चालले. बोलतां बोलतां यात्रेकरूनें सहज त्याला विचारलें, " तुमचं नांव काय?"

" सांवळा सांवता. मी येथें गुमास्ता आहें."

यात्रेकरू वरमला. त्याला वाटलें आपली चूक झाली. आपण नीट चौकशी केली नाहीं. नरसींना नावें ठेवलीं. त्यानें आपल्याजवळील हुंडी काढून त्याला दिली.

'सावळा सांवता 'नें हुंडी वाचली अन् म्हणाला, "नरसी शेटची हुंडी आहे ही ! मी पैसे देतों तुमचे."

'सांवळा सांवता 'नें यात्रेकरूला पैसे दिले अन् आपण निघून गेला. यात्रेकरू पैसे मोजूं लागला. रक्कम मोजतां मोजतां त्याचे हात थकले. पण पैसे संपेनात.

यात्रेकरूनें आकाशाकडे पाहून हात जोडले अन् म्हणाला, "देवा मी आज धन्य झालों. नरसींची कृपा म्हणून मला तुमचं दर्शन घडलं."

★

## तुळशीची माळ

नरसींची मुलगी श्रीमंताकडे दिली होती. एकदां त्यांच्या-कडे कांहीं कार्य निघालें. नरसींना त्यांच्या बायकोनें सांगितलें.

"आपल्या व्याह्यांकडे कार्य आहे. आपण त्यांना अहेर द्यायला हवा."

नरसी मुलीकडे निघाले. त्यांना रिकाम्या हातांनीं येतांना पाहून सर्व लोक हसले. "दरिद्री मुलखाचा !" ते म्हणाले.

नरसींनीं तें ऐकलें. ते आपल्या मुलीला भेटले. मुलीनें त्यांचें स्वागत केलें. अन् नंतर ती म्हणाली, "बाबा तुम्ही कांहीं अहेर आणला नाहींत. त्यामुळें सर्वजण हसतात तुम्हांला."

"अस्सं का ! मग त्यांना विचार कोणाला काय पाहिजे तें ? म्हणजे मी त्यांना त्यांच्या पसंतीप्रमाणें अहेर आणून देईन."

नरसींच्या मुलीनें एका कारकुनाला बोलावलें. नरसी त्याला घेऊन सर्वांना भेटले त्यांनीं प्रत्येकाला विचारलें. "तुम्हांला काय अहेर देऊं ?"

कुणाला खरें वाटलें, कुणाला खोटें वाटलें, त्यांनीं आपल्याला काय पाहिजे तें सांगितलें. कांहींनीं तर खूपच मोठी यादी सांगितली. कारण देणें नाहीं घेणें नाहीं, मग उगाच सांगण्यांत तरी कमतरता कशाला हवी ?

याद्या लिहितां लिहितां कारकुनाचा हात दुखून आला. तो मनांत म्हणाला, 'काय चक्रम मनुष्य आहे हा ! सगळ्यांना काय एवढा अहेर देणार आहे ? याच्या घरीं काय आहे तें ठाऊक आहे आम्हांला.'

तेवढ्यांत नरसी त्याला म्हणाले, "का हो तुम्हांला काय पाहिजे तें लिहा तुम्ही. सगळ्यांना देणार, मग तुम्हांलाच कां वगळा ?"

कारकून रागावला. त्यानें आपलें नांव लिहिलें. अन् त्यापुढें लिहिलें : 'दगड'.

नंतर नरसी बाहेर गेले. जरा वेळानें परत आले. त्यांच्या बरोबर त्यांचा गुमास्ता 'सांवळा सांवता' अन् चार नोकर होते.

नोकरांनीं आपल्या डोक्यावरचीं ओझीं उतरवलीं. 'सावळा सांवतानें' आपल्या हातानें सर्वांना याद्यांप्रमाणें अहेर दिले. सर्वजण चकित झाले. मग त्यानें एक छानसा दगड काढला. अन् कारकुनाच्या डोक्यावर व्यवस्थित ठेवून दिला.

सर्वांना अहेर देऊन झाला. 'सांवळा सांवता' म्हणाला, "नरसीशेट, तुम्हांला घ्या ना कांहीं तरी."

"काय सांगूं मी! आतां दिलंत तें सगळं मलाच मिळालं. तुम्ही असतांना मला काय कमी आहे?"



"हो! आणि सर्व वस्तु संपल्याच कीं!" ओझ्यांच्या फडक्यांकडे पहात सांवळा सांवता म्हणाला.

"पण तुम्हांला कांहीं न देतां जाणं बरं नव्हे!" असं म्हणून सांवळ्यानें आपल्या गळ्यांतील तुळशीची माला नरसींच्या गळ्यांत घातली. आपली शत-जन्मांची पुण्याई फळाला आली. आपण धन्य झालों, असें वाटलें नरसींना.

★

## १ : संत प्रेमनिधि

‘ हे रामराया, तूं मला दर्शन दे. तूं दर्शन दिलंस तरी मी तुझ्याजवळ कांहीं मागणार नाहीं. मला धन नको. दौलत नको. पैसा नको. अडका नको. कांहीं कांहीं नको मला.

‘ हे पतितपावना श्रीरामा, तूं फक्त मला दर्शन दे. किती अंत पाहतोस रे माझा ! तूं दर्शन देशील म्हणून चातकासारखी मी तुझी वाट पाहतों आहें. ’

प्रेमनिधीनें श्रीरामाची प्रार्थना केली. अन् मग देवपूजा उरकून तो कामाला लागला.

प्रेमनिधीची श्रीरामावर निस्सीम भक्ति होती. राघवाची पूजा करावी, उपासना करावी, त्याचें ध्यान करावें, हा त्याचा छंद होता. रघुनंदन आपल्या उपासनेनें प्रसन्न व्हावे, त्यांनीं आपल्याला दर्शन द्यावें, ही त्याची मनीषा होती.

श्रीरामप्रभूंच्या सुंदर मूर्तीची प्रेमनिधि रोज पूजा करी. आईच्या हळुवार ममतेनें त्या मूर्तीला स्नान घाली. ती नीट पुसून जाग्यावर ठेवी. तिला नैवेद्य दाखवी. हें सर्व मनासारखें झालें म्हणजे त्याला मोठें समाधान वाटे.

प्रेमनिधि श्रीरामाची रोज आळवणी करीत होता. पण त्याला रामदर्शन घडलें नव्हतें. एकदां त्याला वाटे, ‘रामराया आपल्यावर रागावला तर नसेल ना? आपलं कांहीं चुकलं तर नसेल ना ? ’

म्हणून तर आपल्याला रामदर्शन घडत नाहीं. मग आपल्याला कधींच का रामदर्शन घडणार नाहीं ?' तो निराश होई.

पण तो पुन्हा विचार करी. अन् मग त्याला विश्वास येई कीं, 'रामप्रभु आपल्यावर रागावणार नाहींत. आपल्याला ते निश्चित दर्शन देतील. ते आपली परीक्षा घेत आहेत. आपल्याला वाट पाहिली पाहिजे.

एक दिवस प्रेमनिधीची मनीषा पूर्ण झाली. तो परम भाग्याचा दिवस उजाडला. प्रेमनिधीचें भाग्य उजळलें. त्याची उपासना फळाला आली. त्या दिवशीं तो पूजा करीत होता. आपल्या श्रीरामाला फुलें वाहत होता. मूर्तींतून तेज फाकलें. लक्ष्मण अन् सीतेसह श्रीराम प्रकटले.

प्रेमनिधि संतोषला. त्यानें भगवंतांना साष्टांग नमस्कार घातला. भगवंतांनीं त्याला वर उठवलें. त्याच्या मस्तकावर हात ठेवला. प्रेमनिधीनें भगवंतांची श्यामसुंदर मूर्ति डोळे भरून पाहिली. त्याची मनीषा पूर्ण झाली. श्रीरामप्रभु अंतर्धान पावले.

'रामरायाचं दर्शन घडलं. आपलं जीवन सार्थ झालं.' असें प्रेमनिधीला वाटलें. त्याच्या सर्व आशा सफल झाल्या होत्या. आधीं रामप्रभूच्या चिंतनाशिवाय त्याला कांहीं सुचतच नव्हतें. आतां तर त्यानें दुसरें कांहींच करायचें नाहीं असें ठरविलें. रामरायानें दर्शन दिलें आतां अन्य कांहींच मिळावयाचें राहिलें नाहीं. आतां तेवढी देवाची कृपा राखायची, देवाचें ध्यान करायचें. त्याची सेवा करायची.

★

## देवाला काळजी

प्रेमनिधि पहाटे लवकर उठे. नदीवर जाई. स्नान करी. नदीच्या पाण्यानें भरलेला कलश घेऊन घरीं येई. त्या पवित्र पाण्यानें रामरायाची पूजा करी.

एक दिवस खूप पाऊस पडला. सर्व रस्त्यांत चिखल झाला. झाडें उन्मळून वाटेवर पडलीं. त्या दिवशीं प्रेमनिधि नेहमींप्रमाणें पहाटे उठला. कलश घेऊन नदीवर निघाला. त्याच्या मनांत विचार देखील आला नाहीं कीं, ' अशा चिखलांतून आपण जावें कसें ? मार्ग देखील नीट नाहीं. जरा वेळानें उजाडल्यावर गेलं तर ? पण नियम कसा चुकवायचा ? '—

प्रेमनिधि निघाला. त्याला स्वत:ची काळजी नव्हती. पण रामरायाला आपल्या भक्ताची काळजी होती.

प्रेमनिधि घरांतून बाहेर पडून रस्त्याला लागला. अन् त्याच वेळीं एक मशालजी त्याच्यापुढें थोडया अंतरावर चाललेला त्याला दिसला. त्याच्या हातांतील मशालीच्या प्रकाशानें मार्ग उजळत होता.

त्या मशालीच्या प्रकाशांत प्रेमनिधि नदीवर गेला. मशालजी पुढें निघून गेला. प्रेमनिधीनें आपलें स्नान उरकलें. त्यानें स्वच्छ पाण्यानें कलश भरून घेतला. अन् तो घरीं परतला.

त्या मशालजीचेंहि काम त्याच वेळीं आटोपलें होतें. तोहि परत फिरला होता, पुन्हां त्याच रस्त्यानें तोहि निघाला.

प्रेमनिधि घरीं पोहोंचला. मशालजी कुठें जातो ? हें पाहाण्यासाठीं त्यानें सहज मागें वळून पाहिलें. पण मशालजी दिसेना.

प्रेमा.।ये दोन पावलें मागें गेला. त्यानें सर्व मार्ग नीट न्याहाळला. पण मशालजी कोठेंच नव्हता. 'कुठें गेला तो?' प्रेमनिधीला प्रश्न पडला.

अन् लगेच त्याला उत्तरहि मिळालें. तो घरांत गेला. त्यानें श्रीरामाच्या मूर्तीला वंदन केलें. 'रामप्रभु, माझ्याकरितां एवढे कष्ट घेतलेत?' असें म्हणून त्यानें रामचरणीं मस्तक टेकलें.

★

## राजाला शिक्षा

प्रेमानिधि रोज रामकीर्तन करी. आपल्या रसाळ वाणीनें रामचरित्र कथन करी. प्रेमनिधीच्या तोंडून रामचरित्र ऐकायला मिळतें, म्हणून किती तरी लोक त्याच्या घरीं जमत. भक्तिभावानें रामचरित्र ऐकत. रामाचें भजन करीत. अन् मोठ्या समाधानानें घरीं परत जात.

सर्वांना रामचरित्र ऐकून आनंद होई. त्यांना वाटे, 'आपलं भाग्य थोर म्हणून आपल्याला प्रेमनिधीचं कीर्तन ऐकायला मिळतं.'

पण कांहीं दुष्ट लोक होते. त्यांचा माल मस्तकशूळ उठे प्रेमनिधींचें कीर्तन ऐकून. त्यांच्यापैकीं एकाची राजाजवळ ओळख होती. त्यानें राजाकडे तक्रार केली कीं, "प्रेमानिधि रोज कांहीं तरी गडबड करतो. लोक जमवतो. अन् श्रीरामाच्या नांवाखालीं त्यांना हव्या तशा थापा मारतो."

राजानें शिपायांना आज्ञा केली, "प्रेमनिधीला पकडून आणून तुरुंगांत ठेवा. मग आपण त्याची चौकशी करूं."

राजाच्या आज्ञेप्रमाणें शिपायांनीं प्रेमनिधीला पकडून आणलें, अन् तुरुंगांत ठेवलें.

प्रेमनिधि तुरुंगांत भजन करीत बसला. 'आपण तुरुंगांत आहों' याची त्याला जाणीव देखील नव्हती. जणुं कांहीं तो घरींच होता.



रात्र पडली प्रेमनिधीला आठवण झाली कीं, 'अरे, आपण रघुवीराला रोज संध्याकाळीं पाणी ठेवतों. आज आपण तुरुंगांत

आहों. आतां आपण रघुरायाला पाणी कसं ठेवणार ? रघुरायाला तहान लागेल. अन् मग कुठलं पाणी पिईल तो ?'

प्रेमनिधि तळमळूं लागला. काय करावें त्याला सुचेना.

राजा आपल्या महालांत झोपला होता. 'राजा, ऊठ ! मला तहान लागली आहे ! ऊठ लवकर.' राजाच्या कानीं शब्द पडले.

राजा दचकून उठला. एक धिप्पाड अन् तेजःपुंज साधु त्याच्यासमोर उभा होता.

राजा घाबरला. त्याच्या अंगाला दरदरून घाम सुटला. थरथर कांपत त्यानें विचारलें.

"काय—काय पाहिजे तुम्हांला ? तहान लागलीय् ना ? मग मी देतों तुम्हांला पाणी." असं म्हणून राजा उठूं लागला.

"बस खालीं. मला तूं दिलेलं पाणी नको आहे. मला रोज पाणी देतो त्याला तूं तुरुंगात ठेवलं आहेस. त्यानेंच पाणी द्यायला हवं मला."

"कोण ? प्रेमनिधि तुम्हांला पाणी देतो ? मी सोडून देतों त्याला."

"बरं आहे. लवकर सोडूनन दे त्याला. अन् घरीं पोंचव."

साधु गुप्त झाला. राजानें पहाऱ्यावरील शिपायाला बोलाविलें. "जा, प्रेमनिधीला लवकर सोडून द्यायला अन् गाडींत बसवून नीटपणें घरीं पोचवायला सांगितलंय् म्हणून सांग तुरुंगाधिकाऱ्याला."

शिपाई पहातच राहिला. "जा ! जा सांगितलं ना ?" राजा ओरडला.

शिपाई गेला. त्यानें तुरुंगाधिकाऱ्याला राजाचा निरोप सांगितला. तुरुंगाधिकाऱ्यानें प्रेमनिधीला सोडून दिलें. गाडींत बसवून घरीं पोहोंचवलें.

प्रेमनिधि धांवतच घरांत गेला. त्यानें घाईनें स्नान उरकलें. अन् श्रीरामाच्या मूर्तीपुढें पाणी ठेवून तो म्हणाला, "रामराया, आज पाणी ठेवायला उशीर झाला. तुला तहान लागली असेल. पण श्रीरामा, माझ्यावर रागावूं नको. मला क्षमा कर."

प्रेमनिधीनें डोळे मिटले. देवापुढें मस्तक नमवलें. जरा वेळानें डोळे उघडून तो बघूं लागला. भांड्यांत पाणी नव्हतें. रामप्रभूची श्यामल सुंदर मूर्ति मात्र त्याच्याकडे बघून हसत होती.

IRBK-0107146